




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार ३१ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## थोडक्यात

### आसारामला 6 महिन्यांचा जामीन

**जोधपूर-**अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसारामला हायकोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. उच्च न्यायालयाने आसारामला वैद्यकीय



कारणास्तव सहा महिन्यांचा अंतरिम जामीन मंजूर केला. आसारामच्या याचिकेत त्याची प्रकृती, आजार आणि त्याने तुरुंगात घालवलेल्या १२ वर्षांचा उल्लेख होता. कार्यवाहक मुख्य न्यायाधीश संजीव प्रकाश शर्मा आणि न्यायमूर्ती संगीता शर्मा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. ज्येष्ठ वकील देवदत्त कामत आणि वकील यशपाल राजपुरोहित यांनी आसारामची बाजू मांडली. त्यांनी सांगितले की, २०१८ मध्ये बलात्कार प्रकरणात त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. जोधपूर मध्यवर्ती कारागृहात तो सलग शिक्षा भोगत आहे. तथापि, यावर्षी त्याला उपचारांसाठी सुमारे सहा महिन्यांचा अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला. अंतरिम जामीन न्यायालयीन अभिरक्षेत असल्याने स्वच्छंदता नव्हती. त्यामुळे मोकळ्या हवेत उपचार केल्यास त्याचा फायदा होउ शकतो. हायकोर्टात सरकारचे प्रतिनिधित्व करणारे अतिरिक्त महाधिवक्ता दीपक चौधरी यांनी सांगितले की, तुरुंग प्रशासन वेळोवेळी आसारामला सर्वोत्तम उपचार देत आहे. तो सध्या आरोग्य आयुर्वेद रुग्णालयात उपचार घेत आहे. त्यामुळे नियमित जामीन मंजूर करणे योग्य ठरणार नाही. उच्च न्यायालयाने ७ जानेवारी रोजी सुप्रीम कोर्टाने लादलेल्या अटींमधून फक्त तीन कॉन्स्टेबल हटवण्यासह उर्वरित अटी कायम ठेवल्या. आसाराम धार्मिक मेळाव्यांमध्ये सहभागी होणार नाही. गर्दी जमवणार नाही. भारताबाहेर जाउ शकणार नाही.

### दाउद दहशतवादी नाही- ममता

**गोरखपूर**-अभिनेत्री-संत ममता कुलकर्णी पुन्हा एकदा चर्चेत आली



आहे. गोरखपूरमध्ये अंडरवर्ल्ड डॉन दाउद इब्राहिमबद्दल ती म्हणाली, 'त्याने कोणतेही बॉम्बस्फोट केले नाहीत; तो दहशतवादी नाही.' तिने असेही स्पष्ट केले की ती कधीही दाउदला भेटली नव्हती. ती म्हणाली, 'मी आता पूर्णपणे अध्यात्माच्या मार्गावर आहे. माझा राजकारणाशी किंवा चित्रपट उद्योगाशी कोणताही संबंध नाही.' ममता कुलकर्णी गोरखपूरच्या तीन दिवसांच्या दौ-यावर आहे. मंगळवारी तिने एका हॉटेलमध्ये हे वक्तव्य केले. बुधवारी तिने गोरखनाथ मंदिरात जाउन देवतेचे दर्शन घेतले, संतांची भेट घेतली आणि एका भजन संध्याकाळी भाग घेतला. ममता कुलकर्णी यापूर्वी महाकुंभमेळ्यात महामंडलेश्वर झाल्यावर चर्चेत आली होती.

### महिलांना आता केवळ तीनच दागिन्यांची परवानगी!

**डेहराडून/वृत्तसंस्था-**सोन्याच्या वाढलेल्या दरांवरून आता सोने केवळ करोडपतींच्याच आवाक्यात आले आहे. सामान्य, मध्यम वर्गाच्या



खिशाला न परवडणारी किंमत झाल्याने खासकरून महिला वर्गाचा हिरमोड होत आहे. याचा सर्वाधिक फटका येत्या लग्नसराईत बसणार आहे. आधीच दागिने करून ठेवलेले असले तर ठीक नाहीतर अनेकांना काही ग्रॅमचेच दागिने करावे लागणार आहेत. अशातच उत्तराखंडमधील जौनसार-बावर या आदिवासी क्षेत्रातील एका ग्राम पंचायतीने नवा आदेश पारीत केला आहे. कंदाड आणि इद्रोली या दोन गावांच्या ग्रामपंचायतीने सामाजिक सुधारणेच्या दिशेने एक अत्यंत महत्त्वाचा आणि अनोखा निर्णय घेतला आहे. लग्नसमारंभ आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये महिलांना सोन्याचे दागिने घालण्यावर सक्तमर्यादा घालण्यात आली आहे. आता महिलांना केवळ तीनच सोन्याचे दागिने परिधान करण्याची परवानगी असणार आहे. यामध्ये कानातील कर्णफुले, नाकातील नथ आणि मंगळसूत्र एवढेच दागिने महिला घालू शकणार आहेत. याव्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त किंवा जादा सोन्याचा दागिना घातल्यास, संबंधित महिलेला रु.५०,००० इतका मोठा दंड भरावा लागणार आहे. तसेच या निर्णयाला विरोध करणा-यासही तितकाच दंड भरावा लागणार आहे.

### ऑस्ट्रेलियाला हरवून भारत विश्वचषकाच्या अंतिम फेरीत

**मुंबई/प्रतिनिधी :**महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाने भारतासमोर ३३९ धावांचे लक्ष्य ठेवले. नवी मुंबईतील



डीवाय पाटील स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने फलंदाजीचा निर्णय घेतला. ७ वेळा विजेता संघ ४९.५ षटकांत ३३८ धावांत सर्वबाद झाला.भारत महिला संघाने ३९ षटकांत ३ गडी गमावून २४९ धावा केल्या आहेत. जेमिमा राड्रिग्ज आणि दीप्ती शर्मा क्रीजवर आहेत. हरमनप्रीत कौर ८९ धावा काढून बाद झाली. ॲशले गार्डनरच्या चेंडूवर ॲनाबेल सदरलँडने तिला झेलबाद केले. सदरलँडने १६७ धावांची भागीदारी तोडली. स्मृती मानधना २४ धावा काढून बाद झाली आणि शफाली वर्मा १० धावा काढून बाद झाली. दोघांनाही किम गार्थने पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले. भारताकडून फिरकीपटू श्री चरणी आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. क्रांती गौड, अमनजोत कौर आणि राधा यादव यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. २ फलंदाजही धावबाद झाले. आजच्या उपांत्य फेरीत विजय मिळवणारा संघ २ नोव्हेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अंतिम सामना खेळेल.

### पुन्हा स्वस्त झाले सोने

**जळगाव :** दिवाळीनंतर सोन्याच्या दरात सातत्याने घसरण होताना दिसतेय. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोन्याचे दर घसरले होते. त्यानंतर आज (३० ऑक्टोबर) रोजी पुन्हा एकदा सोन्याचे भाव उतरले आहेत. त्यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.मागील दहा दिवसांत सोन्याचे दर तब्बल १० हजारांनी घसरले आहेत. तर एक किलो चांदीच्या दरात १३००० रुपयांची घसरण नोंदवली आहे. ३० ऑक्टोबर रोजी सोन्याच्या किमतीत पुन्हा एकदा घसरण झाली आहे. आपण जर मागच्या १० दिवसांचा आलेख पाहिला तर २१ ऑक्टोबर रोजी प्रतितोळा २४ कॅरेट सोन्याची किंमत १३०५८० रुपये प्रति १० ग्रॅम इतकी होती. तर, आज सोन्याची किंमत १२०४९० रुपये प्रति १० ग्रॅम आहे.

# समिती नेमली, कर्जमाफी लांबली

## महाएल्गार



## कर्जमाफी धोरण ठरवण्यासाठी प्रवीण परदेशींच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती

**मुंबई/प्रतिनिधी :** सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे होणा-या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी संपूर्ण पीक कर्जमाफीची मागणी होत असताना राज्य सरकारने या मागणीवर समितीची मात्रा दिली आहे. शेतक-यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून शेतक-यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी आणि त्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक सल्लगार तसेच 'मित्र' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चधिकार समिती नेमली आहे. सहकार विभागाने गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतक-यांच्या प्रश्नांवर नागपूरमध्ये आंदोलन छेडले असताना सरकारने आंदोलनाची धार कमी समिती नेमली आहे. कडू यांच्या समवेतच्या बैठकीला काही तास शिल्लक असताना सरकारने आज समिती नेमली आहे. या समितीत सदस्य म्हणून महसूल, वित्त, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, सहकार आणि पणन खात्याचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष, बँक ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी, माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे संचालक यांचा समावेश आहे. तर सहकार आयुक्त आणि निबंधक, सहकारी संस्था पुणे हे या समितीचे सदस्य सचिव आहेत. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने शेतक-यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता करण्याची मागणी विरोधी पक्षाकडून वारंवार होत आहे. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात राज्याच्या अनेक भागात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले. या नुकसानीची माहिती घेताना विरोधी पक्षाने शेतक-यांचा सातबारा कोरा करण्याची मागणी केली आहे. बच्चू कडू यांनीही शेतक-यांच्या प्रश्नावर आंदोलन छेडले आहे. आज सरकारने कडू यांना बैठकीसाठी मुंबईत निमंत्रित केले होते. ही बैठक सुरु होण्याच्या काही तास अगोदर सरकारने शेतक-यांचे जीवनमान कसे उंचावता येईल. याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी समिती नेमली आहे. आजच्या घडीला राज्यात कृषी पीक कर्जाची जवळपास २० हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. यापूर्वी २०१७ मध्ये फडणवीस सरकारने शेतक-यांना दीड लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली होती. तर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कर्जमाफीची मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत वाढवली होती.

## १७ लहान मुलांना ओलीस ठेवणारा रोहित आर्यचा पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील पवई येथे रोहित आर्य नामक इसमाने १७ अल्पवयीन मुलांना डांबून ठेवल्याची घटना समोर आली होती. या घटनेनंतर पोलिसांनी १७ मुलांची सुखरूप सुटका केली. तसेच रोहित आर्यने पोलिसांवर हल्ला केल्यामुळे त्याच्यावर गोळीबार करण्यात आला. छातीत गोळी लागल्यानंतर त्याच्यावर उपचार करण्यात येत होते. उपचारादरम्यान रोहित आर्यचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. पोलिसांच्या वतीने अद्याप यावर अधिकृत भाष्य करण्यात आलेले नाही.



चांदिवली येथील रॉस्टुडिओ नावाच्या एका बंदिस्त इमारतीत आरोपीने १५ वर्षांखालील १७ मुलांना वेबसीरीजचे ऑडिशन घेण्याच्या नावाखाली बोलावले होते. मात्र आज दुपारी त्यांना जेवणासाठी बाहेर पाठविण्याऐवजी सर्वांना डांबून ठेवण्यात आले. दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर पवई पोलीस, साकीनाका पोलीस व अग्निशमन दलाने या मुलांची सुटका केली. दरम्यान मुलांना ओलीस ठेवल्यानंतर रोहित आर्य नामक इसमाने एक व्हिडीओ प्रसिद्ध केला होता. यात तो म्हणाला, आत्महत्या करण्याऐवजी मी एक योजना आखली आहे. मी काही मुलांचे अपहरण करून त्यांना ओलीस ठेवले आहे. माझ्या काही साध्या मागण्या आहेत. माझे काही प्रश्न आहेत, त्यांची उत्तरं हवी आहेत. मला काही लोकांशी बोलायचे आहे. त्यांना प्रश्न विचारायचे आहेत. त्यावर जी उत्तरे मिळतील त्यावर प्रतिप्रश्न विचारायचे आहेत. त्याशिवाय मला काहीच नको. मी कोणी दहशतवादी नाही. माझी पैशांची मागणी देखील नाही. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांच्या गोळीबारात रोहित आर्यच्या छातीला दुखापत झाली. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र तिथे उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. सह पोलीस आयुक्त (कायदा आणि सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी यांनी म्हटले की, प्रथमदर्शनी, मुलांना ओलीस ठेवण्यामागे काही प्रलंबित कामामधील थकबाकी कारणीभूत असल्याचे दिसत आहे. दुपारी १.४५ वाजता या घटनेची माहिती आम्हाला मिळाली. त्यानंतर पवई येथे पोलिसांचे पथक पोहोचले आणि त्यांनी मुलांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे प्रयत्न केले.

## 26 लाख अपात्र महिला, 4 हजार कोटींची खैरात

**मुंबई-**अदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार २६.३ लाख अपात्र महिलांना योजनेतून वगळण्यात आले. तोपर्यंत १० महिने या महिलांना दर महिला दीड हजार रुपयांचा लाभ मिळत होता. पडताळणी प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी सरकारने ३ हजार



७८० कोटी ते ४ हजार ३३८ कोटी दरम्यानची रक्कम अपात्र अर्जदारांना वितरित केली असण्याची शक्यता आहे. महायुतीसाठी गेमचेंजर ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरुवातीपासूनच वादात राहिली. ही योजना जाहीर झाल्यापासूनच विरोधकांनी टीका केली. यातच या योजनेबाबत नवनवीन माहिती मिळत आहे. माहितीच्या अधिकारातून काही धक्कादायक आकडेवारीही समोर येत आहे.

## एमबीबीएस, बीडीएसच्या प्रवेशातून 200 च्यावर विद्यार्थी बाद

### महाराष्ट्र सीईटी सेलने दिली माहिती

**नागपूर/प्रतिनिधी :**राज्यातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेसाठी महाराष्ट्र राज्य सामान्य प्रवेश परीक्षा (सीईटी) सेलने एमबीबीएस आणि बीडीएस अभ्यासक्रमांसाठी तिसरी गुणवत्ता यादी जाहीर केली आहे. तिस-या फेरीत राज्य-भरातील एकूण



१,७६४ रिक्त जागांसाठी प्रवेशाची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, चुकीची किंवा अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यामुळे २२० विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतूच बाहेर करण्यात आल्याची धक्कादायक माहिती आहे. सीईटी सेलकडून मिळालेल्या माहितीनुसार १,७६४ रिक्त जागांमध्ये ७८९ एमबीबीएस आणि ९७५ बीडीएस जागांचा समावेश आहे. त्यापैकी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये १६८ एमबीबीएस आणि ६० बीडीएस जागा रिक्त आहेत, तर खासगी संस्थांमध्ये ६२१ एमबीबीएस आणि ९१५ बीडीएस जागा उपलब्ध आहेत. या १,७६४ जागांसाठी राज्यभरात तिस-या फेरीची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. तिस-या फेरीत ज्यांना प्रवेश मिळाला आहे, त्यांनी ३१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान संबंधित महाविद्यालयांमध्ये हजर राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करायची आहे. याच प्रक्रियेदरम्यान सीईटी सेलने २२० विद्यार्थ्यांना प्रवेशातूनच बाद केले आहे. सीईटी अधिका-यांच्या माहितीनुसार, १७० विद्यार्थ्यांनी चुकीची कागदपत्रे अपलोड केली, तर ५० विद्यार्थ्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत, त्यामुळे त्यांना सध्याच्या तसेच आगामी प्रवेश फे-यांतून बंदी घालण्यात आली आहे. १७१ विद्यार्थ्यांनी चुकीची कागदपत्रे सादर केली होती.

## विदर्भाला बसला 'मोंथा'चा फटका

**नागपूर :** दक्षिण भारतात घोंगावणा-या मोंथा चक्रीवादळाने संपूर्ण महाराष्ट्रात अवकाळीचे संकट ओढवले आहे. या मोंथाचा विदर्भालाही जोरदार तडाखा बसला. बुधवारी रात्री विदर्भात सर्वत्र अवकाळीच्या धो-धो सरी बरसल्या. गडचिरोली, चंद्रपूर, अमरावतीत तीव्रता अधिक होती. गुरुवारी दिवसा जोर मंदावला असला तरी दिवसभर पावसाळी रिपरिप सुरू होती. या अवकाळीने शेतक-यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची स्थिती आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या मोंथा चक्रीवादळाची सक्रियता आता दक्षिण भारतात तामिळनाडूच्या किणारपट्टीकडे वळली आहे. या प्रभावाने विदर्भात आर्द्रता वाढल्याने पाच-सहा दिवस अवकाळीचा पाउस सक्रिय होण्याचा अंदाज हवामान विभागाने तीन दिवसापूर्वी वर्तवला होता.

## राज्यसेवा 2024 परीक्षेचा निकाल जाहीर

# विजय लमकणे राज्यात पहिला

**नागपूर/प्रतिनिधी :**महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे(एमपीएससी) घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या निकालानंतर मुलाखती घेण्यात आल्या. १ हजार ५१६ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले होते. ३० ऑक्टोबरपर्यंत या मुलाखती चालल्या असून रात्री निकाल जाहीर करण्यात आला. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील विजय नागनाथ लमकणे राज्यात पहिला आला आहे. तर हिमालय घोरपडे राज्यातून दुसरा आला आहे. एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर केली. निकालासह पात्रतागुणही प्रसिद्ध करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे विजय नागनाथ लमकणे यांची यापूर्वीही एमपीएससीमधून विविध सेवांसाठी निवड झाली आहे. विजय लमकणे सध्या गटविकास अधिकारी या पदावर ते कार्यरत आहेत.एमपीएससीतर्फे २७ ते २९ मे या कालावधीत राज्य सेवा मुख्य परीक्षा घेण्यात आली होती. त्यानंतर मुलाखती घेण्यात आल्या. मुख्य परीक्षेमधून



मुलाखतीकरीता अर्हताप्राप्त न ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपुस्तिकेतील गुणांची फेरपडताळणी करायची असल्यास संबंधित उमेदवारांनी गुणपत्रके प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत आयोगाकडे ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक होते. परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या समांतर आरक्षणाच्या, तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध न्यायालयात, न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला असल्याचे एमपीएससीने स्पष्ट केले. मुख्य परीक्षेच्या कट ऑफ जाहीर झाल्यावर विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड प्रश्नचिन्ह निर्माण झालेला आहे. आजपर्यंतचा सर्वाधिक कट ऑफ या परीक्षेत लागल्याने विद्यार्थ्यांना चांगलाच घाम फुटला आहे. या परीक्षेत ओपनचा कट ऑफ ५०७.५० लागला आहे. अनुसूचित जातीचा ४४७ तर अनुसूचित जमातीचा ४१५ कट ऑफ लागला होता. मुख्य परीक्षेच्या अर्ज प्रक्रियेमध्ये काही तांत्रिक अडचणीही निर्माण झाल्या होत्या. तांत्रिक अडचणीमुळे अर्ज सादर करण्यास अडथळा निर्माण असल्यामुळे परीक्षा पुढे ढकलण्यासंदर्भात काही उमेदवारांकडून विविध माध्यमातून मागणी होत असल्याचे आयोगाच्या कार्यालयाच्या निदर्शनास आले होते.






## शिवरायांच्या गडकिल्ल्यांवर मोदींच्या नावाने उघडणार 'नमो पर्यटन केंद्र'; राज ठाकरेंचा तीव्र विरोध

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रातील पर्यटन खाते काही गड किल्ल्यांवर नमो पर्यटन केंद्र उभारणार आहे. शासनाने काढलेल्या जीआरविरोधात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शिवाय एकनाथ शिंदे यांच्याकडे हे खाते असल्याचे सांगत त्यांच्याविरोधातही राज ठाकरे यांनी जहरी टीका केली आहे.मनसे मेळाव्यात राज ठाकरे म्हणाले की, आज काही वृत्तपत्रात एक बातमी आली आहे. शासनाने एक जीआर काढलाय. हा जीआर वाचला तर तुमच्या तळपायाची आग मस्तकात जाईल. एकनाथ शिंदे यांच्याकडे हे खाते आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र सरकार पर्यटन केंद्रे काढत आहेत. त्याला नमो पर्यटन केंद्र असे नाव दिले आहे. ही नमो पर्यटन केंद्रे शिवनेरी, रायगड, राजगड,




प्रतापगडावर काढण्यात येत आहे. ज्याठिकाणी फक्त आमच्या महाराजांचे नाव असले पाहिजे तिथे ही नमो पर्यटने केंद्र उभारली जाणार आहेत. सत्ता असो, नसो, वर नाही, खाली नाही आजूबाजूला कुठेही नाही. ही पर्यटन केंद्र उभे केले की फोडून टाकणार असा इशारा त्यांनी दिला.

तसेच मला स्वतःला मुख्यमंत्री करा म्हणून किती लाचारी करायची? बरं हे वर पंतप्रधानांनाही माहिती नसेल, खाली काय चाटूगिरी चालू आहे..सत्ता डोक्यात गेली ना आम्ही वाट्टेल ते करू त्यातून हे डोक्यात येते. शिवाजी महाराजांचे गडकिल्ले असो नाहीतर दुसरे काही...मला मुख्यमंत्रिपद मिळाले पाहिजे. मला सत्ता मिळाली पाहिजे. जे समोर दिसेल ते मिळाले पाहिजे. यासाठी ज्यांना ज्यांना खुश करायचे असेल त्यांना खुश करावे लागेल. मुंबईतल्या जागा अदानीला द्यायच्या आहेत देउन टाका..बोट ठेवेल तिथे जागा दिली जातेय. हे सगळं येते सत्तेतून आणि सत्ता ईव्हीएममधून आणली जाते असं सांगत राज ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर घणाघात केला. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी मुलभुत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत सन २०२५-२६ अन्वये राज्यातील ७५ पर्यटन स्थळी पर्यटकांसाठी आधुनिक मुलभुत सोयीसुविधायुक्त 'नमो पर्यटन माहिती व सुविधा केंद्र' स्थापन करण्यात येणार आहे. त्याबाबत शासन निर्णय काढून प्रथम टप्यात किल्ले प्रतापगड, रायगड, शिवनेरी आणि साल्हेर या ठिकाणी केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या ४ ठिकाणी 'नमो पर्यटन माहिती व सुविधा केंद्र' उभारण्यासाठी सरकारने २० कोटी निधीला मान्यता दिली आहे.




# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची खर्च मर्यादा वाढली

## इच्छुक उमेदवारांसाठी आनंदाची बातमी

**अमरावती/ प्रतिनिधीः**-आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी राज्य निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. उमेदवारांच्या निवडणूक खर्च मर्यादेत मोठी वाढ केली आहे. बदलत्या आर्थिक परिस्थिती, वाढती महागाई आणि प्रचार खर्चातील प्रचंड वाढ लक्षात घेता आयोगाने ही मर्यादा दीडपट पर्यंत वाढवली आहे. या निर्णयामुळे उमेदवारांच्या प्रचारासाठी अधिक निधी मिळणार आहे. कायदेशीर चौकटीत राहून प्रभावी प्रचार करण्याची संधी उमेदवारांना मिळेल. गेल्या काही वर्षात डिजिटल माध्यमातून प्रचार खर्च ,वाहन भाडे, बॅनर, सभा आयोजन या सारख्या बाबींचा खर्च वाढल्याने आयोगाकडे मर्यादेत बदल करण्याची सातत्याने मागणी होत होती. अखेर आयोगाने ती मागणी मान्य केली आहे. महापालिका निवडणुकीसाठी आतापर्यंत सदस्य संख्येच्या आधारे खर्च मर्यादा ठरवली जात होती. मात्र आयोगाने ती वर्गवारीनुसार निश्चित केली आहे. नव्या नियमानुसार अ वर्ग महापालिकेसाठी नगरसेवक उमेदवारांना १५ लाख रुपये खर्च करण्याची परवानगी मिळणार आहे. अमरावती सारख्या ड वर्गातील महापालिकेतील उमेदवारांना ९ लाख रुपयांचा खर्च करण्याची परवानगी देण्यात आली आहे. ही सुधारित मर्यादा महागाई आणि आर्थिक वास्तव लक्षात घेऊन निश्चित करण्यात आली आहे. नगरपरिषद, नगरपंचायतसाठी खर्च मर्यादा नुसार बदलविण्यात आल्या आहेत.

अमरावती जिल्ह्यातील नगरपरिषदा मध्ये नगरसेवकासाठी अडीच लाख आणि नगराध्यक्षांसाठी साडेसात लाख रुपये खर्चाची मर्यादा ठरवण्यात आली आहे. नगरपंचायतीमध्ये नगरसेवकांसाठी सव्वा दोन लाख आणि नगराध्यक्षसाठी सहा लाख रुपये अशी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयावर स्थानिक स्तरावरील उमेदवारांना प्रचारांचे नियोजन वास्तवशी सुसंगत ठेवण्यात येणार असून पारदर्शक व खर्च कमी होण्यास मदत मिळेल. आयोगाच्या या निर्णयाचे सर्वच राजकीय पक्षांनी स्वागत केले आहे. वाढत्या खर्चाच्या काळात जुन्या मर्यादा अप्रासंगीक झाल्या होत्या.

मागील काही निवडणुकांमध्ये उमेदवारांनी अधिक खर्च केला होता.कार्यकर्त्यांचे मानधन, वाहन भाडे यावर उमेदवारांना मोठा खर्च करावा लागत होता. त्यामुळे वाढिव मर्यादेमुळे उमेदवारांना निवडणूक लढवणे सुलभ होईल. गेल्या पाच वर्षापासून राज्यात कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे आगामी निवडणुकाचे संकेत मिळताच इच्छुक उमेदवारांनी आपला प्रचार, जनसंपर्क वाढवला आहे. या निवडणुका टोकाची ईर्षा निर्माण करण्याची चिन्हे आहेत.



अमरावतीः महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अमरावती आगमन प्रसंगी माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील यांनी बेलोरा विमानतळावर स्वागत केले.

## ६ लाखांचे दागिने लंपास

**परतवाडा** - खुल्या घरातून सहा लाखाचे दागिने लंपास करण्यात आल्याची घटना कांडली परिसरातील द्वारका नगरमध्ये समोर आली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार अरुणा अजयपंत नवले (६१ द्वारका नगर, कांडली) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली की त्यांच्या घरातून अज्ञात आरोपींनी दिवानाखाली ठेवलेले ३३ ग्रॅम सोन्याच्या बांगड्या ३ लाख ३० हजार, दोन अंगठ्या १ लाख, कानातले सात ग्राम ७० हजार, काळ्या मनीची पोत १० ग्राम १ लाख असे एकूण ६० ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत ६ लाख रुपये चोरून नेले. अरुण नवले यांनी सांगितले की १२ ऑक्टोंबर रोजी त्यांच्या घराचा दरवाजा उघडा होता. त्यावेळी आरोपींनी घरात घुसून बेडरूम मध्ये ठेवलेल्या दिवानाच्या खालून दागिन्याची पर्स लंपास केली.

## १ व १० वरिल उर्वरित

### स्मारक, संदर्भग्रंथाने रा. सू.

जयस्वाल, न्या. भूषण गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई, खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, आमदार किरण सरनाईक, संजय खोडके, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश उर्फ चंदू यावलकर, गजानन लवटे, चरणसिंग ठाकूर, चैनसूख संचेती, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्र फडणवीस पुढे बोलतांना म्हणाले, रा. सू. गवई यांच्या कार्यकर्तृत्वाचा सार्थ गौरव करणारे स्मारक उभे राहिले आहे. स्मारक उभे करताना याचा उपयोग विद्यापिठातील विद्यार्थ्यांना व्हावा, तसेच नव्या पिढीला मार्गदर्शक ठरेल, असा दृष्टीकोन ठेवण्यात आला आहे. येत्या काळात याच परिसरात मोठे प्रेक्षागृह साकारल्या जाणार आहे. त्यामुळे हे स्मारक युवकांच्या जडणघडणीत निर्णायक भूमिका निभावेल. स्मारकामध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेच्या उपयोगाने रा. सू. गवई यांची दृकश्राव्य भाषणे ऐकण्यास मिळणार आहेत. किऑक्स, डिजीटल वॉल, अशा अत्याधुनिक सोयीने स्मारक उभे राहिले आहे.

रा. सू. गवई यांचे जीवन हे अजातशत्रू होते. त्यांनी समाजाच्या समस्या सोडवून आपली एक विशिष्ट ओळख निर्माण केली. त्यामुळे त्यांची दीर्घ राजकीय वाटचाल महत्वाची ठरली आहे. राज्यपाल पद भूषविताना त्यांनी जैन आणि बौद्ध तिर्थस्थळे विकसित करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. तसेच शैक्षणिक सुधारणांवर भर दिला. भारतीय संविधानाप्रति त्यांना नितांत आदर होता. त्यांनी संविधान बदलाबाबत केलेले 'नख आणि दाताने विरोध करतो' हे वाक्य अजरामर आहे. प्रत्येक प्रश्न हा संविधानाच्या माध्यमातून सोडविला जावू शकतो, अशी त्यांची धारणा होती, असेही फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजीत पवार म्हणाले, येत्या कालावधीत रा. सू. गवई यांचे जन्मशताब्दी वर्ष येणार आहे. यानिमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात यावेत, अशी सूचना त्यांनी केली. स्मारकाचे काम दर्जेदार झाले आहे. येत्या काळात स्मारकाच्या विस्तारासाठी निधी देण्यात येईल. पूर्णाकृती पुतळाही हुबेहुब साकारला गेला आहे. दादासाहेबांनी त्यांच्या कारकिर्दीत सर्वांशी उत्तम समन्वय साधला. आमदार, खासदार, राज्यपाल म्हणून त्यांची राजकीय वाटचाल दीर्घकाळ राहिली. उत्कृष्ट वक्तृवाने त्यांनी नेतृत्व आणि कर्तृत्व घडविले असल्याचे पवार म्हणाले.

स्मारकाच्या कामात विशेष लक्ष देऊन बांधकाम उत्कृष्टरित्या केल्याबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याची सरन्यायाधिश भूषण गवई यांनी स्तुती केली. स्मारकाचे काम गतीने पूर्ण होण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. तसेच यावेळी कंत्राटदार नितीन गभने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी, वास्तूविषारद प्रशांत सातपुते, मुर्तीकार प्रज्ञानंद मूर्ती, पुरूषोत्तम पाटणकर, उमेश रोडे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी स्मारकाच्या दर्शनी भागावरील दादासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी स्मारकाची पाहणी केली. कार्यक्रमात दादासाहेब गवई यांच्या जीवनावरील चित्रफित दाखविण्यात आली. तसेच स्मारकाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रास्ताविक केले. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले.

**स्मारकाविषयी**-केरळ आणि बिहारचे माजी राज्यपाल तसेच रिपब्लिकन चळवळीचे ज्येष्ठ नेते दिवंगत रा. सू. (दादासाहेब) गवई यांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी उभारण्यात आलेल्या भव्य स्मारकामध्ये दादासाहेब गवई यांचे जीवन कार्य दर्शवणारे स्मृतीसभागृह (म्युझियम) आणि अत्याधुनिक श्रोतगृह (ऑडिटोरियम) यांचा समावेश आहे. स्मारकाच्या दर्शनी भागावर दादासाहेबांचा १५ फूट उंचीचा ब्राँझ धातूचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. तसेच दादासाहेब गवई यांच्या जीवनाचा आणि कार्याचा प्रवास दर्शविणारे सभागृह तयार करण्यात आले आहे. या स्मारकासाठी ३५ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

स्मारकाच्या दर्शनी भागात दादासाहेबांचा २.५ फूट उंचीचा ब्राँझचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. त्यांचा जीवनपट, दुर्मिळ छायाचित्रांसह, भिंतीवरील १६ डिजिटल पोस्टर्सच्या माध्यमातून प्रदर्शित केला जाणार आहे. अभ्यागतांना त्यांच्या कार्यबद्दल सखोल माहिती मिळावी यासाठी दृकश्राव्य कियॉस्क आणि व्हीडीओ वॉलची सोय उपलब्ध आहे. यासोबतच स्मारकात स्मरणिका दालन देखील उभारण्यात आले आहे. तसेच स्मारकाच्या पहिल्या माळ्यावर २०० आसनी क्षमतेचे अद्ययावत श्रोतगृह तयार करण्यात आले आहे. याशिवाय श्रोतगृहाच्या तळ मजल्यावर अभ्यागतांसाठी आणि कार्यक्रमांसाठी लागणाऱ्या सुविधा म्हणून एक सुसज्ज किचन आणि उपहारगृहाचा समावेश आहे.

### अभिनंदन बँकेच्या 'अभिनंदन

सहकाराच्या माध्यमातून समाजकल्याणाचे कार्य करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महसूल मंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके, बडनेराचे आमदार रवी राणा आणि विशेष पाहुण्यांमध्ये भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथा आणि प्रसिद्ध उद्योगपती आणि नागपूर येथील पगारिया ग्रुपचे अध्यक्ष उज्ज्वल पगारिया यांची उपस्थिती होती.

बँकेचे संस्थापक हुकमचंद डागा, अध्यक्ष अ?डव्होकेट विजय बोथरा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र बरडिया, सुदर्शन गांग, राजेंद्रकुमार सिंघई, कंवरीलाल ओस्तवाल, राजेंद्र भन्साळी, किशोर बोकारिया, अ?डव्होकेट गौरव लुनावत, नवीन चौरडिया, अरुण कडू, सुनील सरोदे, शंकर शिंदे, सरला भन्साळी आणि किरण जैन हया सर्व संचालकासह शिवाजी देठे,अनिल उगले आदिंनी कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

### तहसिल कार्यालयात जप्त केलेल्या

बोलल्या जात आहे. एकीकडे तलाठी व अधिकारी यांचे पथक जिवाची आटापिटा करून प्रसंगी जिव मुठीत धरून होणाऱ्या संभाव्य धोक्याची तमा न बाळगता अवैध रेती तस्करांवर कार्यवाही करतात. परंतु त्यांनी केलेल्या मेहनतीवर वरिष्ठ अधिकारी संगणमत करून रेती तस्करांना सहकार्य करत असल्याचे आढळत असून त्यामुळे लाखोंचा महसूल मात्र पूर्णता बुडविला जात आहे.

मिनी ट्रक लंपास झाल्यानंतर २८ ऑक्टोबर पर्यंत कोणतेही ठोस कार्यवाही न करता टाळाटाळ करण्यावरून वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असल्याच्या चर्चेला दर्यापूर मध्ये उधाण आलेले आहे. वरिष्ठ अधिकारी व पोलिस कर्मचारी तहसिल कार्यालयातून लंपास झालेल्या वाहनांचा शोध लावतील का हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

### दर्यापूर नगर परिषदेच्या मतदार

त्यांनी घराघरांत जाऊन पंचनामे करून माहिती प्रशासनाकडे सादर केली आहे. मतदार याद्यांतील गोंधळामुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली असून, अनेकांनी आपले नाव आणि पत्ता तपासण्याची विनंती केली आहे. प्रशासनाने देखील घराघरांत जाऊन सत्यापनाची प्रक्रिया सुरु केली आहे. या चौकशीमुळे चुकीची नोंद, पुनरावृत्ती (दोन ठिकाणी नाव ) समोर येणार आहेत. अंतिम अहवालानंतरच मतदार यादी ठरवली जाईल, ज्यामुळे आगामी नगर पालिका निवडणुकीत मतदानाची प्रक्रिया योग्य आणि न्याय्य होईल. नागरिक आणि राजकीय पक्ष दोन्ही याकडे लक्ष ठेवून आहेत.

**कोणत्या प्रभागात किती मतदार-**

मतदार याद्या निश्चित झाल्यानंतर कोणत्या प्रभागात किती मतदार असणार आहेत. हे निश्चित झाल्यानंतर प्रभागात कोणत्या उमेदवाराचे प्राबल्य असणार आहे हे समजणार आहे, त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाचे मतदारांचे अंतिम याद्यांमध्ये लक्ष लागून आहे.

**अंतिम यादी प्रसिद्ध होण्यापूर्वी सर्व त्रुटी दूर होतील-**

नगर पालिका प्रशासन मात्र सर्व आक्षेपांचा आढावा घेत असल्याचे सांगत आहे. तसेच अंतिम यादी प्रसिद्ध होण्यापूर्वी सर्व त्रुटी दूर केल्या जातील, असा दावा केला जात आहे. आता हा गोंधळ कितपत आणि किती वेळात दूर होतो, तसेच मतदार यादीवरील विसंगती हा आगामी निवडणुकीतील वादग्रस्त मुद्दा ठरतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### नांदगाव केंद्रावर शासकीय

क्रमांक तसेच मोबाईल नंबर, अर्ज नोंदणी करतेवेळी ज्या नावाने अर्ज आहे ती व्यक्ती प्रत्यक्ष हजर राहून थम दिल्याशिवाय ऑनलाइन नोंदणी होणार नाही याची सुद्धा शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी. अर्ज प्राप्त झाल्यानंतर नोंदणी करिता संस्थेकडून शेतकऱ्यांना मोबाईलवर मेसेज देण्यात येईल. तरी शेतकऱ्यांनी ५३२८ रुपये या शासकीय हमी दराने सोयाबीन विक्रीकरिता ऑनलाइन नोंदणी करून घ्यावी असे आवाहन खरेदी विक्री संस्थेचे व्यवस्थापक अमोल खंडार यांनी शेतकऱ्यांना केले.

### शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य

शेतकरी बच्चू कडू , कॉ . राजन क्षीरसागर , कॉ . अजित नवले , राजु शेट्टी यांच्या नेतृत्वात नागपूरच्या रस्त्यावर आंदोलन करित असून देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील भाजपचे सरकार न्यायालयाच्या आडून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करीत आहे असा आरोप यावेळी करण्यात आला. किसान सभेने सरकारच्या या दडपशाहीचा निषेध केला . ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या हाती सोयाबिन कापसाचे अल्प उत्पादन आले. परंतु हाती आलेला हा शेतमाल कवडीमोल भावाने विकण्याची पाळी शेतकऱ्यांवर सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे आली आहे . घोषणा करूनही नाफेडचे सोयाबिन खरेदी केंद्र व सिसिआय चे कापूस खरेदी केंद्र सुरू झालेले नाही . सरकारचे हे धोरण अगोदरच संकटग्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम करित असल्याने शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला . यावेळी शेतकऱ्यांनी हेक्टरी ७० हजार रुपये ओला दुष्काळ अनुदान दया, पिकविमा काढलेल्या शेतकऱ्यांना पिक विमा भरपाई द्या , सरकारी सोयाबिन व कापूस खरेदी केंद्र सुरू करा , सरसकट संपूर्ण कर्जमाफी करा , नागपूर येथे सुरू असलेल्या महाएल्गार शेतकरी आंदोलनाच्या सर्व मागण्या मान्य करा . या मागण्याचे निवेदन तहसिलदार यांचे मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले . यावेळी शेतकऱ्यांनी सरकार विरोधात प्रचंड घोषणा दिल्या . आंदोलनात किसान सभेचे राज्य कौंसिल सदस्य सुनिल मेटकर , किसान सभेचे तालुकाध्यक्ष हरिदास राजगिरे , तालुका सचिव विनोद तरेकर , संतोष सुरजुसे , बाजार समिती संचालक ओमप्रकाश सावळे , हरिदास देशमुख , विजय मंडवधरे , योगेश अवझाडे , निळकंठ ढोके , ओंकार ढोके , मंगेश जिरापुरे ,वासुदेव चौधरी , बाबारावजी इंगळे , सुहास चौधरी, लिलेश्वर आगळे , उमेश मंदुरकर, राजकुमार ठाकरे, गजानन गंधे , मुरलीधर वैदय, कृष्णाजी नंदेश्वर , वासुदेवराव ढोके , पंकज जवळकार सह अनेक शेतकऱ्यांची उपस्थिती होती .

### सुजात आंबेडकर यांच्या संदर्भात

चांदूर रेल्वे येथील शेंद्रीपुरा येथील रहिवाशी उत्तमराव ठाकरे (वय ६५) यांनी २५ ऑक्टोबर रोजी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात प्रकाश आंबेडकर यांना फेसबुकवर अश्लिल शिवीगाळ करून सामाजिक शांतता व सुव्यवस्था भंग करणारी पोस्ट टाकली. याविरूध्द चांदूर रेल्वे तालुक्यातील वंचित बहूजन आघाडीचे कार्यकर्ते आक्रमक झाले आणि चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनवर धडकले.तरीपण पोलिसांनी त्यांची तक्रार नोंदवून घेतली नाही.त्यामुळे पोलिस स्टेशन कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. तसेच कार्यकर्त्यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक यांना फोन केल्यानंतर बीएनएस २०२३ चे कलम ३५६(२) व्दारे गुन्हा नोंदविण्यात आला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष भास्कर बनसोड,मिनीश शिंदे,चंदू उके,अजय राऊत, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा बेबीनंदा लांडगे ,शहर अध्यक्षा उषा मेश्राम, बाली जवंजाळ,अश्विन पाटील, रोशन बनसोड,आशा गवई,आशा वानखडे यांच्यासह मिलिंद नगरातील महिला व तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

### नुकसान भरपाईसाठी जिल्ह्याला

करण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातील ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ४ लाख ८१ हजार ५०३ हेक्टर जमीन बाधीत झाली होती. यासाठी ४९० कोटी रूपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच दोन हेक्टरवरून तीन हेक्टर मर्यादा वाढ केल्यामुळे ५५ हजार २१२ शेतकऱ्यांना ६६ हजार ३७३ हेक्टरसाठी ७९ कोटी रूपयांचा निधी प्राप्त होईल.

राज्यातील विविध जिल्ह्यात खरीप हंगामात अतिवृष्टी, पूर यामुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता विशेष मदत देण्यात येणार आहे. यात सप्टेंबर २०२५ मधील कालावधीमध्ये ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ५ लाख ४७ हजार८७६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यासाठी जिल्ह्याला ५४७ कोटी रूपयांची मदत मिळणार आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामामध्ये १० हजार रूपये प्रति हेक्टरी मदत, अर्थसहाय देण्याचा निर्णय १० ऑक्टोबर रोजी घेण्यात आला आहे. ही मदत ३ हेक्टरपर्यंतच्या मर्यादेत करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी तातडीने प्रस्ताव सादर केले. त्यानुसार आज जाहिर झालेल्या दोन शासन निर्णयामध्ये नुकसानीपोटी जाहिर झालेली मदत आणि रब्बी हंगामाकरीता देण्यात येणारी विशेष मदतमध्ये राज्यातून एकमात्र अमरावती जिल्ह्याला मदत जाहिर झाली आहे.

### किरीट सोमय्यांची महानगरपालिकेत

माहिती दिली. यावर त्यांनी समाधान व्यक्त केले आणि ज्या लोकांवर गुन्हे दाखल झाले आहे. त्यांचा जर १० दिवसात पत्ता नाही लागला तर त्यांना फरार घोषित करण्याची मागणी केली. त्यांनी सांगितले की यासंदर्भात विशेष पथक गठीत करण्यात आले आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये असे प्रकरण समोर येत आहे. शहर आणि जिल्ह्यात पण असे काही प्रकरण उघड झाले आहे. जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी, अचलपूर ,गाडगे नगर पोलीस ठाण्यात तहसीलदारांकडून बोगस प्रमाणपत्र संदर्भात तक्रार देण्यात आलेली आहे. मनपाच्या वतीने दिलेल्या तक्रारीवर त्यांनी समाधान व्यक्त केले आणि कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी केली. त्यांनी सांगितले की देशात पहिल्यांदाच मनपा प्रशासनाच्या वतीने बोगस दाखल्या संदर्भात तक्रार दाखल केली आहे. महानगरपालिका आणि पोलिसांच्या वतीने केली जाणारी कार्यवाही योग्य आहे. ज्या ५०५ लोकांवर गुन्हे दाखल झाले आहे त्यामधून ४८५ विशिष्ट समुदायाचे आहे. यामध्ये २५ ते ६५ वर्षीय लोकांचा समावेश आहे. यावरून हे एका प्रकारचे षडयंत्र असल्याचे भासत आहे, पोलिसांनी योग्य तपास करून कार्यवाही करावी,असेही ते म्हणाले.

### पोलीस हेड कॉन्स्टेबलला लाच

यासाठी आरोपी हेड कॉन्स्टेबल अब्दुल रहीम अब्दुल करीम यांनी तक्रारदारा कडे गुन्ह्याच्या तपास मध्ये मदत करण्याकरिता व फायदा करण्यासाठी ५० हजार रुपयाची मागणी केली होती. तेव्हा १० हजार रुपये तक्रारदार यांनी दिले होते. परंतु त्यांना उर्वरित लाच रक्कम द्यायची नसल्याने त्यांनी यांची ११ ऑगस्ट २०२५ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी हेड कॉन्स्टेबल अब्दुल रहीम अब्दुल कदिर यांनी गुन्हयात मदत करण्याकरिता २० हजार रुपयाची लाच मागण्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अप्पर अधीक्षक सचिद्र शिंदे ,उपअधीक्षक सुनील किनगे, मिलिंदकुमार बहाकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रवीण वेरुळकर, हवालदार दिगंबर जाधव, अविनाश पाचपोर, किशोर पवार, गोपाल किरडे, सलीम खान यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला. नागरिकांना कोणत्याही शासकीय अधिकारी कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने शासकीय काम करून देण्यासाठी लाच मागणी केल्यास तत्काळ लाचलूचपत विभागाकडे तक्रार देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**नगर परिषद कार्यालय, अचलपूर**
**जाहीरनामा**

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **नितिन देविदास भुसाटे**, पत्ता-महेराबपुरा, अचलपूर, जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड नं.३० संगणक मालमत्ता क्र.**ACHA00026560/26561** जुना मालमत्ता क्र.**30000573/479/300005741480** नझूल शिट नं.नझुल जागा, नझुल शीट नं.**5C,** प्लॉट नं.**15** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **सुशिला उत्तमराव मलवार व इतर ३ व्यक्ती** या नावाने असून वरील अर्जदार यांनी मुळ मालकाचे नाव कायम ठेवून **नितिन देविदास भुसाटे** हे नाव समाविष्ट करण्याकरिता **खरेदीखत व नझुल,पीआर कार्ड अन्वये** या कार्यालयामध्ये दिनांक २८.१०.२०२५ रोजी अर्ज सादर केलेला आहे. या विषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे.अन्यथा या मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा-**

| | | |
|---|---|---|
| पुर्व | - | सरकारी जागा |
| पश्चिम | - | खुली नझुलची जागा व मातंगपुरा |
| उत्तर | - | यातीलच मुळमालकाचे उर्वरित घर |
| दक्षिण | - | दिनेश रामदास मलवारे यांचे घर |

स्वाक्षरी/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, अचलपूर
शिक्का

**सायटेशन/जाहीरनामा**
**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.६६२/२०२५ ने.ता.०४/१२/२०२५

अर्जदार -
१. **श्री शरद साहेबराव राऊत,** वय ५६ वर्षे, धंदा - शेती
२. **श्री किशोर साहेबराव राऊत,** वय ४८ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा. निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.वर्षा प्रमोदराव पोहोकार (पाटील),** वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.नारायण नगर खंडवा, ता.जि.खंडवा (मध्यप्रदेश)
४. **सौ.प्रतिभा अनिल वाटाणे,** वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.हिवरा, पो.आसेगांव पूर्णा, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांची **आई कमलाबाई साहेबराव राऊत** ही **दिनांक ३१/०८/२०२५ रोजी निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे.** तिचे मृत्यूनंतर तिचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत.तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ३०.१०.२०२५**

शिक्का
आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**
किरकोळ अर्ज - २३८०/२०२५
श्री योगेश्वर अधिक तिन विरुध्द निरंक
पुढील तारीख २५.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Yogeshwar Khushalrao Kongale,**
Age 64 yrs., Occu.- Pvt. Job
R/o. Plot No.6, Sai Krupa, Shirbhate Nagar,
Near Pundlikbaba Colony, Rukhmini Nagar, Amravati,
Tq. & Dist. Amravati
2) **Kishor Kushalrao Kongle** , Age 53 yrs., Occu.- Pvt. Job
R/o. Near Pundlikbaba Colony, Shirbhate Layout,
Rukhmini Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
3) **Manjusha Pravin Matrekar**, Age 53 yrs., Occu.- Household
R/o. Balkeshwar Mandir, Malipura,Tajnapeth, Akola
Tq. & Dist. Akola
4) **Dakur Mahendra Rajani**, Age 57 yrs., Occu.- Household
R/o. 13-3-506/B.No.29, M.C.H. Colony,
Jiyaguda, Asifnagar, Hyederabad (Andra Pradesh)

-- विरुध्द -

**गैरअर्जदार : - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत खुशालराव लक्ष्मणराव कोंगले हया दि.०६/१०/२००६ रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार योगेश्वर अधिक तिन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री.योगेश्वर अधिक तिन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**श्रीमती ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**
किरकोळ अर्ज क्र.२३५९/२०२५
गिता विरुध्द निरंक
पुढील ता.२७.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
१. **गीता नामदेवराव बावनकर,** वय ७४ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.पिंपळखुटा, ता.जि.अमरावती
२. **हरिचंद्र नामदेवराव बावनकर,** वय ६४ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.पिंपळखुटा, ता.जि.अमरावती
३. **पुष्पा सुनील धानोरकर,** वय ५७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.अकोली रोड, साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. **मालती सहदेव कोसरे,** वय ५४ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.सरीग्राम, ता.गुंरुगाम, जि.वलासाड
५. **छाया नानाभाऊ मेश्राम,** वय ४६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. **मंगला रविंद्र मेश्राम,** वय ४५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.बोरगाव, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार : - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत नामदेव डोमाजी बावनकर दि. २१.१२.२०१८** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार गीता नामदेवराव बावनकर व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **गीता नामदेवराव बावनकर व इतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, ३१ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# गोर बंजारा समाजाने समृद्धी महामार्गावर केले रास्ता रोको

## मागणी: एस टी प्रवर्गात आरक्षण; हेद्राबाद गॅझेट लागु करा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**गोर बंजारा समाजाला एस टी.दर्जाचे आरक्षण मिळावे, हैदराबाद गॅझेट लागू करुन सेवा सवलती उपलब्ध करून देण्यात याव्यात यामागणीसाठी गोर बंजारा महाराष्ट्रभरातून समृद्धी महामार्गावर उतरुन सतगरु सेवालाल अन् याडी मरियामाला भोग लावून जवळपास एक तास रास्ता रोको आंदोलन केले.**



पोहरागडचे महंत कबीरदास महाराज यांनी विंती आरदास बोलून प्रा संदेश चव्हाण, महंत संजय महाराज, जानू महाराज, प्रा डॉ अनिल राठोडसह हजारो गोर बंजारा आंदोलकांनी यात सहभाग घेतला.सुरुवातीला पोलीस प्रशासनाने संदेश चव्हाण यांना वारंगी फाट्यावर जवळपास दोन तास अडवून ठेवले तेव्हा खवळून पोलीस बंदोबस्ताचे कठडे तोडून धाव घेतली.तेव्हा संदेश चव्हाण आणि आंदोलकांनी थेट समृद्धी महामार्ग गाठले व तिथे आंदोलन केले.हैदराबाद अकोला महामार्गावर थांबलेले आंदोलक काही वेळातेच समृद्धी महामार्गावर एकवटला.व जवळपास एक तास ठिय्या मांडून आंदोलन केले.यावेळी समृद्धी महामार्गावर पोहरागडचे महंत कबीरदास महाराज यांनी संबोधित केले.नंतर नामा बंजारा, राजू रत्ने, अनिल चव्हाण, कांतीलाल नायक प्रा डॉ अनिल राठोड, प्रा संदेश चव्हाण यांनी संबोधित केले.संदेश चव्हाण यांनी प्रशासनाने गोर बंजारा समाजाच्या सहनशिलतेचा अंत पाहू नये, महिनाभरात पंचावन्न महामोर्चे काढून शासन दखल घेत नाही म्हणून आम्हाला समृद्धी महामार्ग बंद पाडावे लागले.भविष्यात गोर बंजारा समाजाला हक्काचे एस टी आरक्षण साठी केंद्राकडे शिफारस न केल्यास रेल रोको, पोहरागड येथे साखळी उपोषण आमरण उपोषण करु आणि हिवाळी अधिवेशन नागपूरला लाखो गोरबंजारा उतरवू असा इशारा दिला.आतापर्यंत लाखोंच्या संख्येने पंचावन्न महामोर्चा, गोर बंजारा युवकांनी ९ ठिकाणी आमरण उपोषण केले तसेच चार युवकांनी आरक्षणाची मागणी करीत आपले जीवन संपविले मात्र सरकारने गोर बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला गांभीर्याने घेत नसेल तर राज्य सरकारला यांची किंमत चुकवावी लागेल असा गर्भित इशारा दिला बंजारा समाज हा आदीवासी समुदायाच्या वैशिष्ट्याची पुर्तता करत असताना विविध ठिकाणी नोंदीचे पुरावे सापडत असतांनाच, तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये अनुकूल नोंदी असतांनाही सुस्त निद्रिस्त सरकार गेल्या ७८ वर्षापासूनच्या मागणीकडे कानाडोळा करत आहेत.तेव्हा सुस्त निद्रिस्त मगरगठ्ठ सरकारला जागवण्यासाठी बंजारा आरक्षण कृती समितीच्या वतीने दि.३० आक्टोंबर गुरुवार रोजी मालेगांव पाॅइंट जवळ समृद्धी महामार्ग व हैदराबाद अकोला राष्ट्रीय महामार्ग रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते या आंदोलनात वाशीम जिल्हा सह अकोला बुलढाणा यवतमाळ हिंगोली जिल्ह्यातील किमान पाच हजार आंदोलकांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

# दिवाळी महोत्सवात ३१ लाखावर विक्री



**दिवाळी महोत्सव विक्री**

| तालुका | विक्री (लाखात) |
|---|---|
| कारंजा | ५.४६ |
| मालेगाव | ५.५० |
| मंगरूळपीर | ४.१७ |
| मानोरा | १.१२ |
| रिसोड | २.९८ |
| वाशिम | १२.४५ |
| एकूण विक्री | ३१.६८ लक्ष |

## 'उमेद'च्या बचत गटांच्या स्टॉलला वाशिमकरांचा प्रतिसाद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा अंतर्गत उमेद अभियानाच्या महिला बचत गटांनी लावलेल्या दिवाळी महोत्सव स्टॉल मधुन अवघ्या आठ दिवसात रु. ३१ लक्ष ६८ हजार एवढी विक्री झाली असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.

दिवाळीपुर्वी १५ ते २३ ऑक्टोबर दरम्यान मुख्यालयासह इतर पाच पंचायत समिती मध्ये दिवाळी महोत्सवांतर्गत एकुण ६ विक्री व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी वाशिम येथील क्रिडा मैदानात उमेद अभियानाच्या वस्तू विक्री व प्रदर्शनीचे उद्घाटन केले होते. जिल्ह्यातील अधिकारी- कर्मचारी व नागरिकांनी सदर स्टॉलला भेट देऊन दिवाळीनिमित्त खाद्यपदार्थ, दिव्यांची व इतर शोभेच्या वस्तूंची खरेदी करावी आणि बचत गटातील महिलांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहनही सीईओ चौहान यांनी केले होते. त्यांच्या आवाहनाला वाशिमकरांनी चांगलीच दाद दिली असुन ६ विक्री प्रदर्शनी स्टॉल्स मधुन तब्बल ३१ लाख ६८ हजार रुपयांची विक्री झाली आहे यातून अभियानातील बचत गट सदस्यांचे उत्पन्नही वाढले व प्रोत्साहन देखील मिळाले. उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.





# मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे कारंजा येथे जल्लोषात स्वागत

**कारंजा :** नागपूरहून आंतरवली सराटीकडे जात असताना मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे पाटील यांचे ३० ऑक्टोबर रोजी समृद्धी महामार्गावर कारंजा शहराजवळ सकल मराठा समाजबांधवांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले.


या स्वागत समारंभात माजी नगराध्यक्ष संजय काकडे, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर सुर्वे, प्रमोद गायकवाड, विजय गागरे, नितीन काळे आदींनी जरांगे पाटील यांचा पुष्पहार घालून सत्कार केला. यावेळी समाज बांधवांनी मराठा आरक्षणासह इतर मागण्यांबाबत चर्चा केली तसेच घोषणाबाजी करत उत्स्फूर्त समर्थन दर्शवले.

स्वागत करते वेळी दीपक काळे, विशाल दबडे, निलेश गायकवाड, अशोक शेंडे, चंदू खराडे, सचिन जाधव, श्रीकांत जाधव, सुरेश गिरमकार, अक्षय जगताप, रामेश्वर खराडे, अचिकेत जाधव, मनोज जाधव, रवि साटोटे, मोरे, अजय जाधव, आकाश राजगुडे, प्रीतम अवताडे, राजेश नवले, सतीश चव्हाण, सुनील जाधव, सागर सुर्वे, जय काळे, सावीज जगताप, श्रेयस कानकिरड, शिवाजी बांडे, अनु कवळे आदींसह अनेक मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवा महोत्सव हा तरुणाईतील कलागुणांना प्रोत्साहन देणारा आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा उपक्रम - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

युवा महोत्सव हा तरुणाईतील कलागुणांना प्रोत्साहन देणारा आणि समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा उपक्रम आहे.राज्यात सन २०२५-२६ या वर्षातील 'राष्ट्रीय युवा महोत्सव विकासीत भारत चॅलेंज ट्रॅकचे' आयोजन दि. १० ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. समिती यंत्रणांनी समन्वय राखून जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे नियोजन करून कार्यक्रम यशस्वी करावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात दि.२९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सव समितीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुंभेजकर बोलत होते. यावेळी आढावा बैठकीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, डॉ.शुभांगी दामले, प्रा.पाटील, प्राचार्य विजय भड ,पूजा भाटकर, प्राचार्य बाळासाहेब गोटे, प्राचार्य संजय शिंदे, प्रा. विजय जाधव, श्रीकांत जोशी, प्रा.अक्षय मानवतकर, तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी आणि आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.या अनुषंगाने राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये राज्याचा संघ पाठविण्यासाठी राज्य, विभाग व जिल्हास्तरीय स्पर्धा घेणे आवश्यक आहे. दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी वाटाणे लॉन, वाशिम येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या महोत्सवात सांस्कृतिक आणि नवोपक्रम उपक्रमाअंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. लोकनृत्य, लोकगीत, कथा लेखन, चित्रकला, वक्तृत्व (मराठी/हिंदी/इंग्रजी), कविता लेखन तसेच नवोपक्रम ट्रॅक (विज्ञान प्रदर्शन) अशा विविध स्पर्धांद्वारे तरुणाई आपले कौशल्य सादर करणार आहे.

स्पर्धकांचे वय १५ ते २९ वर्षांच्या दरम्यान असावे. प्रवेश अर्ज दि. ४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम येथे सादर करावेत.

अर्जासोबत ओळखपत्र, आधारकार्ड व जन्मतारीख पुरावा जोडणे आवश्यक आहे. मागील तीन वर्षांत राष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या स्पर्धकांना यावर्षी संधी दिली जाणार नाही. विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. ही संधी युवकांना त्यांच्या सुप्त प्रतिभेला वाव देणारे व्यासपीठ ठरणार आहे. बैठकीत महोत्सवाच्या नियोजन, स्पर्धांचे वेळापत्रक, स्थळ निश्चिती, नवोपक्रम ट्रॅक, प्रचार-प्रसार यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीला क्रीडा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# लिंगा गावाला कायमस्वरूपी तलाठी देण्याची ग्रामस्थांची मागणी

**रिसोड :** रिसोडपासून काही किलोमीटर अंतरावर असलेले लिंगा कोतवाल हे गाव गेल्या अनेक वर्षांपासून कायमस्वरूपी तलाठ्याविना आहे. दर आठवड्याला बदलणाऱ्या तलाठ्यांच्या फेरपालटामुळे लिंगा, किनखेडा आणि देगाव या तीन गावांतील शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थ प्रचंड त्रस्त झाले आहेत.

तलाठी बदलल्याने प्रत्येक वेळेस नागरिकांना आपली कागदपत्रे, मालमत्ता उतारे, शेतीचे नकाशे, हक्कपत्रे यांसाठी तहसील कार्यालयाचे चकरा माराव्या लागतात. तलाठी आठ दिवसांत बदलला की पुन्हा नवे नंबर, नवे संपर्क, आणि नवीन समस्यांचा सामना गावकऱ्यांना करावा लागतो. 'आमच्या गावाला कायमचा तलाठी नाही, प्रत्येक वेळी दुसऱ्या गावाचा चार्ज असतो,' अशी ग्रामस्थांची व्यथा आहे.ग्रामस्थांच्या मते, लिंगा गावाच्या समस्येबाबत तहसीलदारांना अनेकदा लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या, मात्र अद्याप कायमस्वरूपी तलाठी नेमण्यात आलेला नाही. परिणामी, गावकऱ्यांना शेतीसंबंधित महत्त्वाची कामे, प्रमाणपत्रे, जमीन मोजणी, हद्दनिशी यासाठी प्रचंड अडचणी निर्माण होत आहेत.

विशेषतः अतिवृष्टीच्या काळात नुकसान झाल्यानंतर पंचनामे करण्यासाठी तलाठी आवश्यक असतो, पण त्या वेळीही तलाठी गावात हजर नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. 'तलाठीला फोन लावला की तो म्हणतो — 'मी तुमच्या गावाचा नाही', दुसऱ्याला फोन केला की तो म्हणतो — 'माझ्याकडे चार्ज नाही',' असे शेतकरी सांगतात.न्या सर्व परिस्थितीमुळे लिंगा, किनखेडा व देगाव या तीन गावांतील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, जर लिंगा गावाला तातडीने कायमस्वरूपी तलाठी नेमण्यात आला नाही, तर ग्रामस्थ तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यास भाग पडतील.

# बालहक्क संरक्षणासाठी समित्यांच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी - जिल्हाधिकारी



## गाव बाल संरक्षण समिती सदस्यांचे कायदेविषयक प्रशिक्षण संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

बालकांचे संरक्षण, त्यांच्या हक्कांचे जतन आणि सामाजिक सुरक्षिततेसाठी गाव बाल संरक्षण समित्या प्रभावीपणे कार्यरत राहाव्यात, या उद्देशाने तालुकास्तरीय एकदिवसीय कायदेविषयक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

महिला व बाल विकास विभागांतर्गत आयुक्त, डॉ . नयना गुंडे महिला व बाल विकास, पुणे यांच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, वाशिम तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने दि.६ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सहाही तालुक्यांमध्ये हे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००५, बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००८, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ तसेच 'बेटी बचावो, बेटी पढाओ, अंत्योदय योजना, सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना' यांसह महिला व बालकांशी संबंधित विविध कायदे आणि शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

प्रशिक्षण सत्रांना यशदा प्रशिक्षक अश्विनी औताडे, निती आयोगाच्या निलीमा भोंगाडे, कायदा व परिविक्षा अधिकारी जिनसाजी चौधरी तसेच केसवर्कर दीपाली दळवी यांनी मार्गदर्शन केले. सहभागी सदस्यांना प्रशिक्षण साहित्यही वितरित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले, क्षेत्रीय कार्यकर्ता रामेश्वर वाळवे, एकनाथ राठोड, सामाजिक कार्यकर्ता रमेश वाघ, अनंता इंगळे, चाईल्ड हेल्पलाईन जिल्हा समन्वयक अविनाश सोनुने यांनी पुढाकार घेतला. समारोपप्रसंगी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी गाव बाल संरक्षण समित्यांना सक्रिय राहून गावातील बालकांच्या हक्कांचे आणि संरक्षणाचे कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडण्याचे आवाहन केले.

# जागर संविधानाचा : भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक सोहळा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 'जागर संविधानाचा' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे आयोजन महेश भवन, जुना नगरपालिका रोड, वाशिम येथे दि. ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी, गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध शाहिरा सीमा पाटील आणि संच संविधानावर आधारित संगीतमय नाट्यप्रयोग सादर करणार आहेत.




तर दुसऱ्या दिवशी, शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी 'जागर संविधानाचा' या शीर्षकाखाली संविधानावर आधारित सुमधुर संगीत सोहळा रंगणार आहे.

या कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका तनुश्री भालेराव, गायक श्रीकांत कांबळे, शाहीर संतोष खडसे तसेच संगीतकार विपुल गवई, यश कदम, विशाल इंगळे, पलाश भालेराव आणि राम देशपांडे यांसारखे सुप्रसिद्ध कलावंत सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली तसेच विभागाचे संचालक विभीषण चवरे यांच्या नियोजनाखाली करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी निःशुल्क असून, नागरिकांनी या अद्वितीय सांस्कृतिक सोहळ्याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाने केले आहे.

# दोन दुचाकींची धडक; तिघांचा मृत्यू

## एक गंभीर

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



नागपूर–छत्रपती संभाजीनगर महामार्गावर जऊळका रेल्वे जवळील चैत्रबन धाब्याजवळ दि. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी एकच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमी झाला आहे.प्राप्त माहितीनुसार, किसन नंदू भोकरे (वय २०, रा. सावरखेड, ता. पातुर) व त्याचा साथीदार राजू लठाड (वय २७, रा. कोळदरा) हे एमएच-३० बीजे-५४४५ क्रमांकाच्या स्प्लेंडर दुचाकीवरून शेलुबाजारकडे जात होते. दरम्यान समोरून येणाऱ्या एमएच-३७ एएल-५४८९ क्रमांकाच्या होंडा युनिकॉर्न दुचाकीची समोरासमोर धडक झाली.

या भीषण धडकेत दोन्ही दुचाकीवरील प्रवासी गंभीर जखमी झाले. घटनास्थळीच किसन भोकरे, तसेच दुसऱ्या दुचाकीवरील एक पुरुष व महिला यांचा मृत्यू झाला. तर कोळदरा येथील राजू लठाड गंभीर जखमी असून त्याच्यावर वाशिम जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.घटनेची माहिती मिळताच जऊळका पोलिस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल गजानन काटेकर, पंजाबराव घुगे, गणेश थोरात व निरंजन वानखेडे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेहांना शवविच्छेदनासाठी पाठवून वाहतूक सुरळीत केली.या अपघाताचा पुढील तपास जऊळका पोलिस स्टेशनचे ठाणेदार गणेश हिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## रब्बी हंगामात शेतकऱ्यांचे वीजअभावी होणारे हाल लक्षात घेऊन

# आ. शाम खोडे यांनी ऊर्जा राज्यमंत्र्यांना दिले निवेदन

**मंगरूळपीर : सध्या रब्बी हंगामाची सुरुवात झाली असून खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. खरीपातील अपयशानंतर रब्बी हाच हंगाम शेतकऱ्यांसाठी नव्या आशेचा किरण ठरणार आहे. मात्र, विजेच्या अपुऱ्या व खंडित पुरवठ्यामुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे पीकपाणी रखडले असून पिकांची वाढ खुंटत आहे. शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या या गंभीर समस्येची दखल घेत आमदार शाम खोडे यांनी ऊर्जाराज्यमंत्री श्रीमती मेघनाताई बोर्डीकर-साकोरे यांना निवेदन सादर करून शेतकरी हितासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.**

आमदार खोडे यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, अतिवृष्टीमुळे खरीपात शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी बांधव आता रब्बी पिकांवर अवलंबून आहेत. मात्र, सध्या वाढत्या विजेच्या मागणीमुळे व जादा भारमुळे काही ठिकाणी विजेचा दाब अत्यंत कमी होत असून शेतीपंप बंद पडतात किंवा सुरळीत चालत नाहीत. परिणामी शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी थंड वाऱ्यात वीज येण्याची वाट पाहत शेतात रात्र जागवावी लागते. अनेक ठिकाणी रोहित्र जळाल्यामुळे आठवड्यापासून पंप बंद आहे आणि पिकांचे नुकसान होते.

या पार्श्वभूमीवर आमदार खोडे यांनी वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी १०० के.व्ही.ए. क्षमतेचे ८० नवीन वितरण रोहित्र उपलब्ध करून देण्याची मागणी ऊर्जाराज्यमंत्री यांच्याकडे केली आहे. त्यांनी स्पष्ट नमूद केले आहे की, सध्या कृषी पंपांसाठी विजेची मागणी प्रचंड वाढली असून विद्यमान रोहित्रांवर अतिरिक्त भार आल्याने बिघाडाचे प्रमाण वाढले आहे. अशा वेळी नवीन रोहित्रांची उपलब्धता झाली तर रब्बी हंगामात अखंडित व स्थिर वीजपुरवठा राखणे शक्य होईल, ज्यामुळे शेतकऱ्यांचे पीक सुरक्षित राहील आणि उत्पादनात वाढ होईल.

या निवेदनावेळी सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग कोठाळे उपस्थित होते. आमदार खोडे यांच्या या पुढाकाराचे जिल्ह्यातील शेतकरी वर्गातून स्वागत होत असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमीच



भक्कम पणे आवाज उठविणाऱ्या आमदार खोडे यांच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना नव्या आशेची किरणे दिसत असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३१ ■ शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# १० एकर जागेत होणार व्यवसाय कौशल्य विकास केंद्र

**-पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकाराने वर्ध्यातील युवकांना मिळणार प्रशिक्षण, ग्रामीण भागासाठी निर्माण होणार कुशल मनुष्यबळ**

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील युवकांना व्यावसायिक क्षेत्रात अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारातून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे व्यवसाय कौशल्य विकास केंद्र वर्ध्यात स्थापन होत आहे. या केंद्रासाठी १० एकर जागेची मंजूरी मिळाली असून पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यासाठी एकूण १८५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून या केंद्रात आधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देऊन जिल्ह्यातील व विदर्भातील युवकांना कौशल्याधारित शिक्षणाचा लाभ मिळणार आहे. यामुळे शेती, शेतीपूरक उद्योग, कुटीर व्यवसाय तसेच तंत्रज्ञान क्षेत्रासाठी प्रशिक्षित कामगार तयार होतील.डॉ. भोयर यांनी सादर केलेल्या प्रस्तावाला विद्यापीठाने हिरवा कंदील दाखवला असून विभागीय स्तरावर शिक्षण आणि रोजगार निर्मितीचा नवा अध्याय सुरू होणार आहे.



विद्यापीठ या संकुलाचे पहिले टप्प्यात बांधकाम स्वयंनिधीतून करणार असून शासनाच्याही सहकार्याने हा प्रकल्प पूर्णत्वास नेला जाणार आहे.केंद्राचे ध्येय आणि विशेष प्रकल्पस्थानिक गरजा पूर्ण करणे, रोजगार निर्मिती, उद्योग-शिक्षण समन्वय, आदिवासी शिक्षण, संशोधन-विकास, कुटीरउद्योग प्रशिक्षण, ई-वाहन दुरुस्ती कार्यशाळा, लॉजिस्टिक पार्क, डिजिटल लर्निंग सेंटर आणि दिव्यांगांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येतील.

आधुनिक इमारतींची उभारणीपहिल्या टप्प्यात विभागीय कार्यालय, व्यावसायिक आणि उद्योजकता विकास केंद्र, शैक्षणिक इमारत, डिजिटल लॅब, आधुनिक ग्रंथालय, आणि स्वयंअध्ययन साहित्य भांडार उभारले जाणार आहे. यावर ११५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दुसऱ्या टप्प्यात दोन वसतिगृहे, इन्डोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, विद्यार्थी भवन आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या निवासस्थाने उभारली जातील.या प्रकल्पामुळे वर्धा जिल्हा आणि संपूर्ण विदर्भासाठी रोजगार व कौशल्यविकासाचे नवे केंद्र उभे राहणार असल्याचे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले. शेती आणि ग्रामीण उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ तयार झाल्यास स्थानिक अर्थकारणाला चालना मिळेल, असे ते म्हणाले.

## नायब तहसीलदार पदी राजेश झामरे यांची नियुक्ती

**वर्धा जनमाध्यम :** तालुक्यातील वर्धा येथील तहसील कार्यालयात कार्यरत असलेले मंडळ अधिकारी राजेश झांबरे यांची पदोन्नती द्वारे नायब तहसीलदार म्हणून आष्टी शहीद येथे नियुक्ती झालेली आहे. त्यांची निवडणूक शाखा नायब तहसीलदार म्हणून ते कार्यभार सांभाळणार आहेत. ते बरेच वर्ष वर्धा जिल्ह्यात तलाठी म्हणून त्यांनी २१ वर्षे पद सांभाळला आहे. तसेच मंडळ अधिकारी म्हणून सेलू व वर्धा येथील आंजी मोठी मंडळाचे मंडल अधिकारी म्हणून. त्यांनी २१ वर्ष पदभार सांभाळलेला आहे. ते बऱ्याच वर्षापासून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत होते. त्यांची नायब तहसीलदार म्हणून नियुक्ती करण्यात आल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. राजेश झामरे हे अतिशय कर्तव्यदक्ष कुशल अधिकारी म्हणून ओळखले जातात.



## बांधकाम कामगारांच्या न्यायहक्कांसाठी वर्ध्यात जिल्हास्तरीय मेळावा

### ३ नोव्हेंबरला चरखा भवन येथे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** बांधकाम क्षेत्रातील कामगारांना न्यायहक्क, सुरक्षा सुविधा आणि शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, या हेतूने स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेतर्फे सोमवार, ३ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा दुपारी १२ वाजता चरखा भवन, हुतात्मा स्मारक समोर, सेवाग्राम रोड येथे होणार आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील बांधकाम कामगार, महिला कामगार, तसेच सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांच्या नेतृत्वाखाली या मेळाव्याचे आयोजन होत असून, कामगारांना आरोग्य, विमा, शिष्यवृत्ती, पेन्शन व गृहअनुदान अशा योजनांचा



लाभ प्रत्यक्ष मिळावा यासाठी या मेळाव्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी संघटना गेली अनेक वर्षे सातत्याने संघर्ष करत आहे. मात्र अनेक ठिकाणी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कामगारांना आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा लागत आहे. शासनाने कामगारांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे, असे अग्निहोत्री म्हणाले.या मेळाव्यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासह आमदार राजेश बकाणे, आमदार समीर कुणावर, आमदार सुमित वानखेडे, विधान परिषदेचे सदस्य दादाराव केचे, माजी खासदार रामदास तडस, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे माजी अध्यक्ष ओमप्रकाश यादव तसेच विविध संघटनांचे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मेळाव्याच्या तयारीत कार्यकर्त्यांचा उत्साह असून, प्रत्येक बांधकाम कामगाराने आपल्या न्यायहक्कांसाठी सज्ज व्हावे. संघटित शक्तीच कामगारांच्या भविष्याचा पाया ठरेल, असे आवाहन स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक उमेश अग्निहोत्री यांनी केले आहे.

## आधी सोयाबीन जळालं, आता कापूस भिजला; बळीराजा दुहेरी संकटात

**-पांढ्या सोन्याच्या वाती, बाजारात कवडीमोल भाव; शासनाकडे तातडीचा मदतीचा सुर**

**आर्वी जनमाध्यम :** अवकाळी पावसाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांचा जीव घेतला. अतिवृष्टीने सोयाबीनचे पीक आधीच मुकले, आणि आता काढणीला आलेल्या कापसावर अस्मानी संकट ओसंडून वाहिले आहे. ओल्या कापसाच्या वाती झाल्या, रंग काळवटला आणि बाजारात गुणवत्ता घसरल्याची झळ शेतकऱ्यांच्या खिशाला बसली.शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे. एकीकडे उत्पादनखर्च वाढलेला, तर दुसरीकडे बाजारभाव घसरलेले. व्यापारी ओल्या कापसाला कवडीमोल दराने खरेदी करत आहेत. ओल्या कापसाचे वजन वाढल्यामुळे वेचणीचा खर्च किलोमागे १० रुपयांपर्यंत गेला असून, शेतकऱ्यांना दुहेरी तोटा सहन करावा लागत आहे. सोयाबीन गेलं, आता कापूस हातातून निसटला. घरात दिवाळीचा नाही, तर दिवाळं निघाल्याचा प्रसंग आहे, अशा शब्दांत शेतकरी आपली व्यथा मांडत आहेत. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे विदर्भातील पांढऱ्या सोन्याची गुणवत्ता घटली आहे. परिणामी, बऱ्याच शेतकऱ्यांना आर्थिक दिवाळखोरीचा प्रसंग ओढवला आहे. शेतकऱ्यांसाठी सध्या सर्वात मोठा प्रश्न म्हणजे शासनाच्या मदतीवरची अनिश्चितता. आधीच्या नुकसानीचे पंचनामेहोऊनही हिशोब अपूर्ण आहे, आणि आता पुन्हा नवीन संकट. शासनाने तातडीने पंचनामे करून ओल्या कापसाच्या नुकसानीची भरपाई करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे. कृषी विभागाने नुकसानीचा आढावा घेऊन सरसकट मदत धोरण जाहीर करावं आणि ओल्या कापसालाही किमान हमीभावात खरेदी करावी, अशी अपेक्षा बळीराजाकडून व्यक्त केली जात आहे.



### हातभट्टीवर हिंगणघाट पोलिसांची धडक

## वाघोली शिवारात मोहा दारू तयार करणारे तिघे जेरबंद; दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट जनमाध्यम :** वाघोली शिवारातील गावठी मोहा दारू हातभट्टीवर हिंगणघाट उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी धडक कारवाई करत तिघांना रंगेहात पकडले. या कारवाईत तब्बल एक लाख पंच्याऐंशी हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार मौजा वाघोली येथील शेतशिवारात हातभट्टी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी परिसरात सापळा रचला. त्यावेळी मनोज सुधाकर दुरुगवार, सुधाकर लक्ष्मण बोरकर आणि मंगेश अंकुश आमनेरकर (तिघे रा. वाघोली) हे गावठी मोहा दारू गाळताना आढळले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातील सर्व साहित्य, दारूसह साधनसामग्री मिळून १ लाख ८५ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त द्रव्याचा जागेवरच नाश करण्यात आला असून तिघांविरुद्ध दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिसांनी केली आहे.

## १८ Heartbeats'मधून हिंगणघाटच्या समर्था सोरटेचे चित्रपटसृष्टीत पहिले पाऊल

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील नवोदित बालकलाकार कु. समर्था सोरटे हिने आपल्या अभिनय प्रवासाची नवी सुरुवात केली आहे. श्रुती दुधलकर सोरटे आणि राहुल सोरटे यांच्या कन्या असलेल्या समर्थाची प्रमुख भूमिका असलेला हिंदी चित्रपट '१८ Heartbeats' आज ३१ ऑक्टोबर रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. कॉलेज परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली 'बुलीइंग' ही सामाजिक समस्या या चित्रपटाच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आली आहे. त्याचबरोबर एक कोवळी, मृदू प्रेमकथा या कथानकात गुंफली गेली आहे. स्कूल ऑफ स्कॉलर्स, हिंगणघाट येथील विद्यार्थिनी असलेल्या समर्थाने 'आन्या' ही भूमिका साकारली असून तिच्या नैसर्गिक अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन, निर्मिती आणि नायकाची भूमिका अनुराग झा यांनी केली आहे. चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या चित्रपटात अधिकतर कलाकार आणि तंत्रज्ञ हे विदर्भातीलच असून स्थानिक गुणवंतांना संधी मिळाल्याने परिसरात आनंदाचा माहोल आहे.'१८ Heartbeats' या चित्रपटाची तिकिटे 'बुक माय शो'वर उपलब्ध असून सर्व रसिक प्रेक्षकांनी स्थानिक कलावंतांचा सन्मान राखत हा चित्रपट थिएटरमध्ये पाहण्याचे आवाहन निर्मात्यांकडून करण्यात आले आहे.



### अमरावतीच्या संमेलनात वर्धेकरांचा सहभाग

## बहारी सायकलस्वारांचे पक्षीमित्र संमेलनासाठी प्रस्थान

**वर्धा जनमाध्यम** - अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सभागृहात आयोजित दोन दिवसीय महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाकरिता बहार नेचर फाउंडेशनच्या १२ सदस्यांनी सायकलने प्रस्थान केले.



पर्यावरण जनजागृतीसाठी निघालेल्या या सायकलवारीत बहारचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर वानखडे, अध्यक्ष डॉ. बाबाजी घेवडे, सचिव जयंत सबाने, कोषाध्यक्ष राजदीप राठौर, दर्शन दुधाने, अतुल शर्मा, सुषमा शर्मा, मनेशकुमार सज्जन, डॉ. लोकेश तमगिरे, अॅड. प्रसाद सोईतकर, हेमंत धानोरकर व अमोल मुनेश्वर हे सायकलपटू सहभागी झाले आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौकातून निघालेल्या या सायकलवारीला जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक संजय इंगळे तिगावकर, बहारचे उपाध्यक्ष दीपक गुढेकर, डॉ. आरती प्रांजळे घुसे, रवींद्र कडू, आशा घेवडे, विनोद सामक, अरविंद सरदार, निवास उरकुडे, याकूब शेख, अंजुमन शेख, सुरज बोदिले पल्लवी बोदिले, मनोज अस्वले यांच्यासह बहारचे सदस्य व पर्यावरणप्रेमी नागरिकांनी आगामी प्रवासाच्या सदिच्छा देत निरोप दिला.


या प्रवासादरम्यान पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत संवाद साधत ही चमू दि. १ नोव्हेंबरला संमेलनस्थळी पोचणार आहे. या संमेलनात बहारचे पदाधिकारी तथा युवा वैज्ञानिक दर्शन दुधाने हे पक्ष्यांचे प्रजनन जीवशास्त्र या विषयाची मांडणी करणार आहेत.

## देश एक, भारत श्रेष्ठ

## सरदार पटेल जयंतीनिमित्त आज 'वॉक फॉर युनिटी

**-वर्धा पोलिसांकडून भव्य आयोजन; नागरिकांना उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन**

**वर्धा जनमाध्यम :** देशाच्या एकता व अखंडतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त वर्धा पोलिस दलाच्या वतीने वॉक फॉर युनिटी या भव्य वोकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता पोलीस मुख्यालय परेड ग्राऊंड येथून सुरुवात होईल. कार्यक्रमाचा समारोप सकाळी ९ वाजता त्याच ठिकाणी होईल.




देशभक्तीपर संगीताच्या वातावरणात शहरात तीन तास ही एकतेची मिरवणूक निघणार आहे.वोकेथॉनचा मार्ग असा असेल : पोलिस मुख्यालय ग्राऊंड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, जिल्हाधिकारी निवासस्थान मार्गे आरती चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बढे चौक, सोशलिस्ट चौक, बजाज चौक, बसस्टँड, इतवारा चौक, पोस्ट ऑफिस चौक, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि परत आंबेडकर चौक मार्गे पोलीस मुख्यालय.या उपक्रमात सुमारे पाच हजार नागरिक, विद्यार्थी, युवक तसेच विविध संघटनांचे सदस्य सहभागी होणार असून सर्वांसाठी हा सहभाग खुला आहे. वाहतूक नियंत्रण शाखेच्या आवाहनानुसार या कालावधीत संबंधित मार्गांवर वाहने उभी न करता पर्यायी मार्गांचा वापर करावा. वाहन पार्किंगची सोय पोलीस मुख्यालयात करण्यात आलेली आहे.हा कार्यक्रम राष्ट्रीय एकता आणि देशभक्तीचा प्रतीक ठरणार असून पोलिस विभागाच्यावतीने सर्व नागरिकांना उत्साही सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे.

## आजीच्या घरातच नातीची हातचालाखी

**-सोन्याच्या दागिन्यांतून घेतली कार, दुचाकी आणि आयफोन**

**हिंगणघाट जनमाध्यम :** कुटुंबातला विश्वास पायदळी तुडवणारी आणि दिखाव्याच्या मोहाने वाहवत गेलेल्या पिढीचे दर्शन घडवणारी घटना हिंगणघाटात उघडकीस आली आहे.

स्वतःच्या आजीच्या घरातून नातीनेच चोरी करून सोन्याचे दागिने विकले आणि त्या पैशांत कार, दुचाकी व आयफोन खरेदी केल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे.हिंगणघाट येथील पौर्णिमा इंद्रनिल रंगारी यांच्या घरातून एखाद्याने ८० ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेल्याची तक्रार त्यांनी पोलिस ठाण्यात नोंदवली.

बांगड्या, अंगठ्या, नथ व टॉप्स असा ऐवज चोरीस गेला होता. तपास सुरू झाल्यावर पोलिसांनी चोरट्याचा शोध घेतला आणि या चोरीत पौर्णिमा यांची स्वतःची नात पूर्वा रंगारी हिचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

पूर्वाने गुन्ह्याची कबुली देत सांगितले की तिच्या मित्र वंश राऊत आणि रुपाली राऊत यांच्या मदतीने दागिन्यांची विक्री करण्यात आली. त्यातील पैशांतून तिने कार, दुचाकी आणि आयफोन घेतल्याचे तपासात समोर आले.

पोलिसांनी संबंधित सोनाराकडून सोन्याचा मुद्देमाल जप्त केला असून सर्व आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेने हिंगणघाटात आश्चर्याचा धक्का बसला असून नातवंडांच्या दिखावूप्रवृत्तीने आजी-आजोबांचे मस्तक हतबलतेने खाली झुकल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## तळेगावात 'वॉक फॉर युनिटी'चा देशभक्तीचा जल्लोष आज

**तळेगाव जनमाध्यम :** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त तळेगाव पोलीस दलाच्या वतीने आज शुक्रवार, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी 'वॉक फॉर युनिटी'चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामागे पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांची संकल्पना असून तळेगाव शहरातील सर्व नागरिक, विद्यार्थी, युवक आणि सामाजिक संघटनांना सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. बसस्टँड चौकातून सकाळी सहा वाजता सुरू होणारा वॉकेथॉन पी. आर. पाटील महाविद्यालयापर्यंत जाऊन पुन्हा बसस्टँड चौकात समाप्त होणार आहे. देशभक्तीपर संगीत, वाद्यधून आणि उत्साही वातावरणात हा कार्यक्रम रंगणार असून भारताची एकता आणि अखंडतेचा संदेश देण्याचे उद्दिष्ट यामागे आहे.या 'वॉक फॉर युनिटी'मध्ये प्रत्येक नागरिकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्याचे आवाहन तळेगाव पोलीस स्टेशनचे निरीक्षक मंगेश भोयर यांनी केले आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर N९३५५१८८ वरील माझे KALPANA MOTE असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील KALPANA SUDAM MOTE हे नाव नमूद असून, याआधार कार्ड नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-**
वॉर्ड नं २२ सुदामपुरी,वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी KANIJA BI SHEIKH ABBAS असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील KANIJA MAJID SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-**
वॉर्ड नं ५ बोरगाव मेघे,
वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर N९३५५१८७ वरील माझे SUDAM MOTE असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील SUDAM PURUSHOTTAM MOTE हे नाव नमूद असून, याआधार कार्ड नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-**
वॉर्ड नं २२ सुदामपुरी,वर्धा ४४२००१

**अप्पर तहसिलदार कार्यालय, पुलगांव तालुका देवळी. एस. टी. बसस्थानक च्या मागे, पुलगांव**

फोन नं. ०७१५८-२८४४२३ ई- मेल- ropulgaon001@gmail.com
क्रमांक/कलि/प्रस्तु-४/कावि ३११/२०२५ दिनांक २३/१०/२०२५

**जाहिरनामा**

अर्जदार श्रीमती/श्री. दिपाली सुधीर मानवटकर रा. वार्ड न.१६ भिमनगर पुलगांव ता. देवळी जि. वर्धा यांनी त्यांचा स्वतःचे जन्म वार्ड नं १६ भिमनगर पुलगांव ता. देवळी जि. वर्धा दिनांक ०८/०९/१९९३ रोजी येथे झाला जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी, नगर परिषद कार्यालय पुलगांव येथे जन्म मृत्यु नांद रजिस्टरला नोंद घेण्याकरीता जन्म/मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म नोंदणी नियम २००० चे नियम ९(३) नुसार जन्माची नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

संदर्भीय दिनांक १२ मार्च २०२५ रोजी जन्म-मृत्यु नोदी बाबत शासन निर्णय निर्गमीत झालेला आहे सदर शासन निर्णयात निर्देशित केल्यानुसार अर्जदार यांच्या जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप/हरकती असल्यास त्यांनी स्वतः किंवा त्यांचे प्रधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वजन जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे १५ दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणार किंवा नसणारे आक्षेप हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**ठिकाण :-** पुलगाव

शिक्का

**अपर तहसीलदार**
**पुलगाव**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# सहकारी बँकेमुळे स्थानिक भांडवल निर्मिती व विकास-मुख्यमंत्री







**मुंबई/प्रतिनिधी :** ज्या ठिकाणी चांगल्या बँका निर्माण होतात, त्या ठिकाणी आर्थिक सक्षमता वाढते. नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी या बँक महत्त्वपूर्ण ठरतात. सहकारी बँकेमुळे स्थानिक भांडवल निर्मिती व विकास साध्य होतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अमरावती येथील अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या नूतन इमारतीचे उद्घाटन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी त्यांनी 'अभिनंदन हाईट्स' या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांच्या सुविधेसाठी स्थापन करण्यात आलेल्या अत्याधुनिक सेवा-सुविधेबाबत त्यांनी बँकेचे अभिनंदन केले. सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, आमदार सुलभाताई खोडके, आमदार रवी राणा, आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर, प्रवीण पोटे-पाटील, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलालजी मुथ्था, बँकेचे संस्थापक हुकुमचंद डागा, अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष ॲड. विजय बोथरा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस म्हणाले, सहकारी बँकेमुळे तळागाळातील नागरिकांचा विकास होतो. शेतकरी व लघु उद्योगांना त्वरित कर्ज व बचत सुविधा मिळते. ज्यांना व्यवसाय, उद्योग स्थापन करावयाचा आहे, त्यांना सुरुवातीला कर्ज लागते. त्यावेळी बँकेंचे प्रोत्साहन व सहकार्य महत्त्वपूर्ण ठरते. राज्यात सहकारी बँकांनी कालानुरुप बदल केले आहेत. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांच्या स्पर्धेत त्या उत्तम स्थान टिकवून आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सहकाराचे महत्व जाणून 'सहकारिता मंत्रालय ' स्थापन केले आहे. यामुळे सहकार क्षेत्रात मोठे बदल होत आहे .यातून 'सहकारातून समृद्धीकडे' हा मार्ग आहे. गुणवत्तापूर्ण कार्य करून 'अभिनंदन सहकारी बँक' सहकार क्षेत्रात चांगले योगदान देत असल्याचे ते यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते बँकेचे संस्थापक हुकुमचंद डागा यांना शाल -श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष विजय बोथरा यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन प्राजक्ता चौधरी यांनी तर आभार संचालक मंडळाचे अध्यक्ष सुदर्शन गांग यांनी मानले.

# न्यायमूर्ती सूर्यकांत भारताचे 53 वे CJI बनले

## ■ 24 नोव्हेंबरला शपथ, 14 महिन्यांचा कार्यकाळ असेल; ■ पेगासस प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले होते

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ न्यायाधीश सूर्यकांत यांची भारताचे ५३ वे सरन्यायाधीश (CJI) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते २४ नोव्हेंबर रोजी शपथ घेतील, अशी घोषणा कायदा मंत्रालयाने गुरुवारी केली. ते विद्यमान सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांची जागा घेतील. सरन्यायाधीश गवई यांचा कार्यकाळ २३ नोव्हेंबर रोजी संपत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाच्या ६५ व्या वर्षी निवृत्त होतात. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा कार्यकाळ अंदाजे १४ महिन्यांचा असेल. ते ९ फेब्रुवारी २०२७ रोजी निवृत्त होतील. सरन्यायाधीश गवई यांनी सोमवारी केंद्र सरकारकडे त्यांच्या नावाची शिफारस केली. न्यायव्यवस्थेच्या २० वर्षांच्या कारकिर्दीत, न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी अनेक महत्त्वाचे निकाल दिले. पेगासस हेरगिरी प्रकरणात, ते चौकशीसाठी सायबर तज्ज्ञांची समिती स्थापन करणाऱ्या खंडपीठाचा भाग होते.

**हरियाणाचे पहिले सरन्यायाधीश**

भारतीय न्यायव्यवस्थेत सर्वोच्च पदावर पोहोचणारे न्यायमूर्ती सूर्यकांत हे हरियाणातील पहिले व्यक्ती असतील. त्यांच्या नावाची शिफारस करताना, सरन्यायाधीश गवई यांनी सांगितले की न्यायमूर्ती सूर्यकांत हे सर्वोच्च न्यायालयाचे नेतृत्व करण्यासाठी योग्य आणि सक्षम आहेत.



दहावीची परीक्षा देण्यासाठी गेले तेव्हा पहिल्यांदाच शहर पाहिले

न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा हरियाणातील प्रवास हिसारमधील पेटवाड या एका अनोळखी गावातून सुरू झाला. ते सत्तेच्या कॉरिडॉरशी संबंधित विशेषाधिकारांपासून खूप दूर वाढले. त्यांचे वडील शिक्षक होते. त्यांनी आठवीपर्यंत गावातील शाळेत शिक्षण घेतले, जिथे बसण्यासाठी बाक नव्हते.

इतर गावकऱ्यांप्रमाणे, न्यायमूर्ती सूर्यकांत आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी मोकळ्या वेळेत शेतात काम करायचे. दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी हांसी या छोट्या गावातून हिसारला गेल्यावर त्यांनी पहिल्यांदा हे शहर पाहिले.

**न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे संस्मरणीय निकाल-** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी अनेक घटनात्मक खंडपीठांवर काम केले आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी घटनात्मक, मानवी हक्क आणि प्रशासकीय कायद्याच्या बाबींचा समावेश असलेले १,००० हून अधिक निर्णय दिले. त्यांच्या ऐतिहासिक निर्णयांमध्ये २०२३ मध्ये कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवण्याचा निर्णय समाविष्ट आहे.

२०१७ मध्ये बलात्कार प्रकरणात डेरा प्रमुख गुरमीत राम रहीम यांच्याशी संबंधित तुरुंगात झालेल्या हिंसाचारानंतर पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने डेरा सच्चा सौदाची संपूर्ण स्वच्छता करण्याचे आदेश दिले होते. न्यायमूर्ती सूर्यकांत हे त्या खंडपीठाचा भाग होते ज्यांनी वसाहतकालीन देशद्रोह कायदा स्थगित केला होता आणि सरकार त्याचा आढावा घेईपर्यंत त्याअंतर्गत कोणतेही नवीन एफआयआर नोंदवू नयेत असे निर्देश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनसह सर्व बार असोसिएशनमधील एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्याचे श्रेय देखील न्यायमूर्ती सूर्यकांत यांना जाते. १९६७ च्या अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या निर्णयाला रद्दबातल ठरवणाऱ्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठात न्यायमूर्ती सूर्यकांत हे होते, ज्यामुळे विद्यापीठाला संस्थेच्या अल्पसंख्याक दर्जाचा पुनर्विचार करण्याचा मार्ग मोकळा झाला. बेकायदेशीर पाळत ठेवण्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सायबर तज्ञांचे एक पॅनेल स्थापन करणाऱ्या पेगासस स्पायवेअर प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या खंडपीठाचा तो भाग होता. राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली कोणालाही मोकळेपणाने काम करता येणार नाही, असेही त्यांनी म्हटले.

**बिहार एसआयआर प्रकरणाचीही सुनावणी झाली-** बिहारमधील एसआयआरशी संबंधित एका खटल्याची सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत यांनीही केली. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर भर देत, न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी बिहारमधील विशेष सघन पुनरावृत्तीनंतर मसुदा मतदार यादीतून वगळलेल्या ६५ लाख नावांची माहिती सार्वजनिक करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले.

# शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार



## शेतकऱ्यांना 5, 8 व 13 रुपयांचा पीक विमा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदत अद्यापही मिळाली नसल्याची ओरड होत असताना आता पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ५ रुपये, ८ रुपये व १३ रुपयांची मदत करण्यात आल्याची संतापजनक बाब समोर आली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या घटनेवर संताप व्यक्त करत सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले असल्याचे सांगत संताप व्यक्तकेला आहे. यंदा राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली. विशेषतः मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांतील पीक-पाण्याचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी शेतजमीनच खरडून गेल्यामुळे रबी हंगाम कसा घ्यायचा? हा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज घोषित केले. तसेच ही मदत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याची ग्वाहीही दिली. पण दिवाळी संपून आठवडा होत आला तरी ही मदत शेतकऱ्यांना मिळाली नसल्याचा आरोप होत आहे.त्यानंतर आता पीक विमा योजनेतही शेतकऱ्यांना ५-१० रुपयांची मदत करण्यात आल्याची संतापजनक बाब उजेडात आली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. ते म्हणाले, राज्यात शेतकऱ्यांवर अस्मानी संकट आले, शेतकऱ्यांना मदत मिळणे दूरच उलट प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकऱ्यांची अवहेलना करण्यात आली आहे. अकोला येथील शेतकऱ्यांना ५ रुपये, ८ रुपये, १३ रुपये अशी मदत करण्यात आली आहे. याला जखमेवर तिखट चोळणे म्हणतात.एकीकडे हातातील पीक गेले, जे आहे त्या शेतमालाला भाव मिळत नाही. जे नुकसान झाले त्याचा विमा असा पाच रुपये मिळणार असेल तर शेतकरी जगणार कसा? शेतकऱ्यांना मदत सोडा पण त्यांचा असा अपमान करू नका, असे ते म्हणाले. अकोला जिल्ह्यातील कुटासा परिसरातील दिनोडा, मरोडा, कावसा व रेल या गावांतील शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाई म्हणून ५ ते २७ रुपयांची मदत जमा झाली आहे. अरुण राउत या शेतकऱ्याच्या खात्यावर ५ रुपये ८ पैसे, संदीप घुगे यांना ५ रुपये, गणपत सांगळे यांना १३ रुपये, विजय केंद्रे याना १४ रुपये ७ पैसे, केशव केंद्रे यांना १६ रुपये १५ पैसे, आदित्य मुरकुटे यांना २१ रुपये ८५ पैसे व उमेश कराड यांच्या खात्यावर २७ रुपये ५ पैसे जमा झाले आहेत. याशिवायही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर अशीच तुटपुंजी रक्कम जमा झाली आहे. या संतप्त शेतकऱ्यांनी बुधवारी काँग्रेस प्रवक्ते कपिल ढोके यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेउन ही मदत सरकारला परत केली.

# 'हॉटेलमध्ये हातावर सुसाईड नोट दिसली नाही, पोस्टमार्टम रूममध्ये दिसली'

## ● वकिलाने कोर्टासमोर मांडली शंका ●

**मुंबई/प्रतिनिधी :** फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर तरुणीच्या मृत्यूप्रकरणी प्रशांत बनकर आणि निलंबित पोलीस अधिकारी गोपाळ बदनेला अटक केलेली आहे. पोलीस कोठडीची मुदत संपल्यामुळे दोघांना आज न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सरकारी वकिलांनी महत्त्वाचे पुरावे हाती लागले असल्याचे सांगत दोघांची पोलीस कोठडी वाढवून देण्याची मागणी केली. तर गोपाळ बदनेच्या वकिलांनी तरुणीच्या हातावरील सुसाईड नोटबद्दल खळबळजनक दावा करत बदनेला कोणत्या आधारावर अटक केली, असा सवाल केला. आरोपी प्रशांत बनकर आणि निलंबित पीएसआय गोपाळ बदने या दोघांना आज न्यायालयासमोर हजर करण्यात आली. प्रकरणाची चौकशी सुरू असून, आरोपींकडून आणखी माहिती हवी आहे. त्यामुळे पाच दिवसांची पोलीस कोठडी वाढवून द्यावी अशी मागणी सरकारी वकिलांनी केली. गोपाळ बदने हा पोलिसांना सहकार्य करत नाही, त्यामुळे त्याची पोलीस कोठडी वाढवावी, असेही सरकारी वकील न्यायालयात म्हणाले.

**प्रशांत बनकरचा लॅपटॉपमध्ये काय**



**मिळाले?-** आरोपी प्रशांत बनकर याचा लॅपटाप पोलिसांनी जप्त केला आहे. त्यात फोटो, व्हिडीओ, स्क्रीन शाट मिळाले आहेत. दोघांची नावे मयत तरुणीने हातावर लिहिलेली आहेत, त्याची चौकशी सुरू आहे. डॉक्टरच्या हातावरील हस्ताक्षर त्यांचे नाही, असा दावा केला जात आहे. पण, अजून हस्ताक्षर तज्ज्ञांचा अहवाल येणं बाकी आहे. तोपर्यंत पोलीस कोठडी वाढवण्यात यावी, असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. पोलीस कोठडी वाढवण्याला विरोध करत गोपाळ बदनेचे वकील न्यायालयात म्हणाले की, 'हाटेलमध्ये मृत डाक्टरच्या हातावरील सुसाईड नोट कोणालाही दिसली नाही. पण, पोस्टमार्टम रूममध्ये हातावर सुसाईड दिसून आली, हे कसे शक्य आहे?', असा सवाल वकिलाने कोर्टात केला. 'मूळात सुसाईड नोटमधील अक्षर हे मृत डाक्टर तरुणीचे नाही, असे त्यांच्या नातेवाईकांचे म्हणणे आहे. मग, यांना कोणत्या आधारावर अटक केली आहे. ज्या आधारावर पोलीस कोठडी मागितली आहे, त्याचा तपास सुरू आहे. त्याच आधारावर आता परत ५ दिवस कोठडी देता येउ शकत नाही. चॅट्सचे विश्लेषण सुरू आहे, असे सांगितले जात आहे. मग अधिक तपास करण्यासाठी वेळ कशाला पाहिजे?', असे प्रश्न उपस्थित करत बदनेच्या वकिलांनी कोठडी वाढवून देण्याला विरोध केला. सुनावणी अंती न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोन दिवसांची कोठडी सुनावली.

# 'पोस्टवुमन' म्हणून सेवा बजावत यूपीएससी परीक्षेत मिळवले यश

**अमरावती /प्रतिनिधी :** आजही आपल्या समाजात महिलांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. पण, तरीही काही तरूणी आहेत, ज्या अडचणींवर मात करून एक आदर्श निर्माण करतात. अशीच एक प्रेरणादायी कहाणी रसिका मुळे हिची आहे. रसिका हिने तब्बल तीन वर्षे पोस्टवुमन ही नोकरी सांभाळून यूपीएससीची परीक्षा दिली. चौथ्या प्रयत्नात तिने यशाला गवसणी घातली. नागरी सेवा (मुख्य) परीक्षा २०२४ ची राखीव यादी नुकतीच जाहीर करण्यात आली. त्यात रसिका हिला स्थान मिळाले आहे.बारावीच्या परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम येण्याचा बहुमान रसिका मुळे हिला मिळालेला. त्यावेळी रसिका हिने आयएएस होउन देशाची सेवा करावी, ही इच्छा रसिकाच्या वडिलांनी बोलून दाखवली होती. तिला तोवर आयएएस किंवा यूपीएससी परीक्षेविषयी काहीच माहिती नव्हती. पण, तिने मनोमनी आयएएस होण्याचे ठरवले. रसिका हिने येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून संगणक शास्त्र अभ्यासक्रमाचे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण



केले आणि त्यानंतर यूपीएससी परीक्षेची तयारी करण्याचे ठरवले. त्यानंतर कॅम्पसमधूनच टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कंपनीत तिला नोकरी मिळाली. एकीकडे आपले स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द आणि दुसरीकडे घरी मदत करण्याचीही इच्छा यातून तिने नोकरी करतानाच यूपीएससी परीक्षा देण्याचे ठरवले. पण, पहिल्या प्रयत्नात तिला यश मिळू शकले नाही. नंतर तिथे टीसीएसची नोकरी सोडून घरी राहून अभ्यास केला. पण, दुसऱ्या प्रयत्नातही यशाने हुलकावणी दिली. नंतर तिने ॲमेझॉन कंपनीत नोकरी पत्करली. एक वर्ष तिने कामही केले. पण, यूपीएससी परीक्षा महत्वाची वाटत होती. नंतर तिला टपाल खात्यात पोस्टवुमन म्हणून नोकरी मिळाली. तिने तीन वर्षे या सेवेत राहून अभ्यासही केला आणि परीक्षाही दिली. २०२४ च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला, तेव्हा पहिल्या यादीत तिचे नाव नव्हते, पण आता अंतिम निवड यादीत तिला स्थान मिळाले आहे. युनिक अकॅडमी अमरावती येथे प्रा.अमोल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तिने युपीएससी ची तयारी केली. मध्यमवर्गीय कुटुंबातील रसिका मुळे हिचे दहावी ते पदवीपर्यंतचे शिक्षण अमरावतीतच झालेले. वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर खचून न जाता जिद्दीने तिने यूपीएससीची तयारी पूर्ण केली. दहावीत तिला ९८.१८ टक्के, तर बारावीत ९६ टक्के गुण मिळाले होते. पोस्टवूमन म्हणून नोकरी करताना यूपीएससीची तयारी करणे हे तिच्यासाठी आव्हानात्मक काम होते. तिच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# नितीन गडकरींच्या मुलाने केले सामूहिक तुळशी विवाह सोहळ्याचे आयोजन

**नागपूर/प्रतिनिधी :**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या विविध नवनवीन उपक्रमांसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांची दोन्ही मुले ही राजकाणापासून दूर असली तरी सामाजिक आणि व्यवसायिक क्षेत्रात अग्रेसर असतात. आता गडकरींचा मुलगा सारंग गडकरी यांनी नवीन उपक्रम सुरू केला आहे.मागील १३६ वर्षांपासून गोसेवा व गोवंश संवर्धनाची परंपरा जपत असलेल?या वर्धा रोड, धंतोली येथे स्थित गोरक्षण सभेच्या वतीने यंदा २ आणि ३ नोव्हेंबर रोजी सामूहिक तुळशी विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.सन १८८८ मध्ये स्थापन झालेल्या गोरक्षण सभेचे प्रमुख उद्दिष्ट सदैव गोसेवा, गोवंशाचे रक्षण आणि समाजामध्ये त्याबाबत जागरूकता निर्माण करणे, हे राहिले आहे. ही संस्था केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक जबाबदारी पार पाडण्यातही सातत्याने पुढाकार घेत आहे.सारंग गडकरी




यांनी सांगितले की, सध्याच्या काळात लहान कुटुंबे आणि मर्यादित निवासस्थानांमुळे पारंपरिक भारतीय सणांचे सामूहिक स्वरूप कमी होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर सामूहिक तुळशी विवाह उपक्रमाची कल्पना साकार करण्यात आली. याद्वारे समाजाला एकत्र आणून सांस्कृतिक परंपरा पुनरुज्जीवित करणे आणि येणाऱ्या पिढ्यांपर्यंत भारतीय संस्कृतीचे मूल्य पोहोचवणे हे उद्दिष्ट आहे.

**असा असेल विवाह सोहळा-**या उपक्रमाअंतर्गत २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता सीमंतपूजन आणि हळदीचा कार्यक्रम होईल. त्यानंतर मेहंदी, संगीत आणि भक्तिगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. प्रसिद्ध गायिका सुरभी ढोमणे भक्तिगीते सादर करतील. ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता काली माता मंदिरापासून गोरक्षण मंदिरापर्यंत वरात मिरवणूक काढण्यात येईल आणि सायं. ६.२५ वाजता तुलसी विवाह संपन्न होईल. या विवाह सोहळ्यात उद्योगपती बी. सी. भरतीया आणि सविता भरतीया हे वर चि. श्रीकृष्णजींचे यजमान असतील, तर उद्योगपती पराग सराफ आणि पायल सराफ या वधू चि.सौ.का. तुलसीजींच्या यजमान असतील. गोरक्षण सभेच्या परिसरातील श्रीकृष्ण मंदिर हे सुमारे ९० वर्षे जुने असून येथे नियमितपणे धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात. मागील वर्षी प्रारंभ झालेला सामूहिक तुळसी विवाह उपक्रम आता वार्षिक परंपरेचे स्वरूप घेउ लागला आहे. सभा पदाधिकाऱ्यांच्या मते, गोरक्षण सभा पंच परिवर्तन या वैचारिक संकल्पनेनुसार कार्यरत असून हिंदू सांस्कृतिक मूल्यांचे संरक्षण व प्रसार करणे हे तिचे ध्येय आहे. तुलसी विवाहासारखे उपक्रम हा या सांस्कृतिक विचाराचा प्रसार करण्याचा एक लहान पण प्रभावी प्रयत्न आहे.

# महाराष्ट्रातला मोर्चा दणदणीत झाला पाहिजे

## राज ठाकरेंचे आवाहन मतचोरीवरून मेळाव्यात केले सादरीकरण

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रत्येक राजकीय पक्षाच्या आणि मतदाराच्या मनात जी शंका निर्माण झाली आहे. त्याची एक गोष्ट दुबार मतदार याद्यांची सुरू आहे. मात्र फक्त तिकडे लक्ष ठेवून चालणार नाही. २०१७ पासून मी ओरडून सांगतोय, त्यावेळी मी जे बोलत होतो, आज जे सोबत आहेत त्यांनी गांभीर्याने घेतले नाही. मतदार याद्या आहेतच, पण ईव्हीएम मशिनकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. स्वप्नांची राखरांगोळी जर ईव्हीएम मशीन करणार असेल तर निवडणुकीचा उपयोग काय असा सवाल करत राज ठाकरे यांनी मतचोरीवर भाष्य केले. प्रत्येकवेळी महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे. त्यामुळे मतचोरी मुद्यात महाराष्ट्रच पुढे येईल असे त्यांनी सांगितले. मनसेच्या पदाधिकारी संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यात राज ठाकरे म्हणाले की, गेली अनेक वर्ष आपण हे ओरडून सांगतोय. मागील १०-१२ वर्षात हे सुरू झाले आहे. लोक आपल्याला मतदान करतायेत. पण या भानगडीतून आपल्याला दरवेळी पराभव पत्करावा लागतो. अख्खा देश यावर बोंबलतोय. या प्रक्रियेतून सत्तेत यायचे आणि हवी तशी सत्ता राबवायची. मतदार याद्या



स्वच्छ करा अजून १ वर्ष निवडणुका लागल्या नाही तरी चालेल.मतदार याद्या स्वच्छ करा आणि निवडणूक घ्या, तुम्ही जिंकला ते आम्ही मान्य करू. सगळ्याळ्या गोष्टी लपवायच्या आण त्यातून निवडणूक घ्यायची, म्हणजे मॅच फिक्स आहे. क्रिकेटमध्ये मॅच फिक्सिंग झाल्यावर खेळाडूंना काढण्यात आले. सीसीटीव्ही कॅमे यातील शुटींग ही प्रायव्हेसी आहे. एखादा माणूस मत कुठे देतोय ही प्रायव्हसी असू शकते. निवडणूक आयोग कुठलीही उत्तरे देतो अशी टीका त्यांनी केली.तर महाराष्ट्रात जो मोर्चा निघेल तो दणदणीत झाला पाहिजे. महाराष्ट्रात काय आग पेटलीय हे दिल्लीला कळायला हवे. मोर्चात सहभागी होउन महाराष्ट्रात काय राग आहे तो दाखवून द्या. महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या प्रामाणिक मतदारांचा हा अपमान सुरू आहे. मतदार उन्हात रांगेत उभे राहत आहे. मात्र त्यांच्या मताचा अपमान केला जात आहे. या देशातील निवडणुका पारदर्शक झाल्या पाहिजेत. जय कुणाचा पराजय कुणाचा हे निवडणुकीनतंर पाहता येईल. प्रगत देशात आजही बॅलेट पेपरवर मतदान होतात. जेवढे पुढारलेले देश आहे तिथे बॅलेट पेपर वापरला जातो. १ तारखेच्या मोर्चाला मी लोकलने जाणार आहे असे राज ठाकरे यांनी म्हटले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# लोकशाहीची छाननी

देशातल्या एकूण मतदारांपैकी साधारण निम्म्या मतदारांच्या मतदार याद्यांतील नोंदींची सखोल छाननी निवडणूक आयोगाने नुकतीस जाहीर केली. १२ राज्यांतल्या सुमारे ५१ कोटी मतदारांची छाननी या टप्प्यात होणार आहे. पहिला टप्पा केवळ बिहार राज्याचा झाला निवडणुकीच्या ऐन तोंडावर २४ जून २०२५ रोजी निवडणूक आयोगाने तिथल्या मतदार याद्यांची छाननी जाहीर केली. ऑक्टोबर - नोव्हेंबरदरम्यान तिथे निवडणुका होणार हे आयोगाला माहीत होते. तरीही त्यांनीही छाननी जाहीर केली आणि स्वतःलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. विरोधक आधीच मतदानाचे वेगवेगळे आकडे मांडून प्रश्न उपस्थित करत होते. 'वोट चोरी'च्या मुद्द्यावरून निवडणूक आयोगाला लक्ष्य करत होते. त्या वातावरणात सगळ्यांचे लक्ष वळवण्यासाठी का होईना, पण आयोगाने घाईघाईने ही छाननी जाहीर केली. त्यासाठीचे निकष, कार्यपद्धतीबाबत अंतिम निर्णय झाले नसताना, मार्गदर्शक कार्यप्रणाली तयार नसताना झालेल्या घोषणेमुळे विरोधकांचे फावले. त्यांनी आयोगाला जागोजागी खिंडीत पकडले. मतदाराच्या नोंदणीसाठी ग्राह्य धरल्या जाणाऱ्या कागदपत्रात आधार कार्डाचा समावेश असणार की नाही, हा मुद्दा तर सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आयोगाला मान्य करावे लागले. व्यक्तीची नागरिकता मान्य किंवा अमान्य करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असू शकतो का? हा प्रश्नही त्या छाननी दरम्यान उपस्थित झाला होता. पालकांच्या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या वारसांच्या नोंदी अधिकृत ठरविण्याचा मुद्दाही शेवटी न्यायालयातच पोहोचला. बिहारमध्ये अनाथाश्रमात वाढलेल्या अनेक मुलांनी आयोगाच्या या तरतुदीला आव्हान दिले. हा मुद्दाच नोंद अधिकृत वा अनधिकृत ठरवण्याच्या यादीत वगळावा, अशी त्यांची मागणी होती. त्याची तड कशी लागली, ते समजले नाही, त्यामुळे, दुसरा टप्पा सुरू होण्यापूर्वी आयोगाने पहिल्या टप्प्यात उपस्थित झालेले सर्व प्रश्न आणि त्यावर आयोगाने घेतलेली भूमिका आपल्या वेबसाईटवर सुस्पष्टपणे मांडावी; त्यातून पुन्हा कोणाला नवे प्रश्न उपस्थित करण्याची संधी मिळणार नाही, अशी सूचना केली जाते आहे.या टप्प्यासाठी आयोगाने स्वतःला पुरेसा वेळ दिला आहे, ही समाधानाची बाब आहे. दुसऱ्या टप्प्यात ज्या केंद्रशासित प्रदेशांचा आणि राज्यांचा समावेश आहे, त्यात राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल ही मोठी राज्ये आहेत. तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल ही विरोधी पक्षांची सरकारे असलेली राज्ये आहेत. या दोन्ही राज्यातले सत्ताधारी पक्ष आणि त्यांचे नेते, म्हणजे तिथले मुख्यमंत्री किती आक्रमक आहेत, याची कल्पना पूर्ण देशाला आहे. बिहारच्या छाननीवेळी विरोधकांनी काही विशिष्ट मतदारांची नांवे यादीतून घाऊकरीत्या वगळली जात आहेत, असा आरोप केला होता. पण, छाननी होऊन निवडणुका घोषित झाल्या, तरी त्या तक्रारीचा कोणी पुनरुच्चार केलेला दिसत नाही. तो आरोप किती पोकळ होता, हे यावरून लक्षात येते. आता तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनीही 'श्रमिक, अनुसूचित जाती, अल्पसंख्याक आणि महिलांची नावे या छाननीच्या माध्यमातून कमी करण्याचा डाव आहे', असा आरोप केला आहे. पश्चिम बंगालमध्ये घुसखोरीचा मुद्दा खूपच संवेदनशील आहे. या छाननीच्या निमित्ताने घुसखोरांची घाऊक प्रमाणात नांवे घुसवली जातील किंवा नको असलेल्या जनसमूहांची नांवे वगळली जातील, अशी भीती व्यक्त केली जात आहे. निवडणूक आयोगाची या दोन्ही राज्यात कसोटी आहे. सर्व पक्षांचा विश्वास प्राप्त करणे आणि सर्वांच्या सहकार्याने देशभर ही छाननी प्रक्रिया पूर्ण करणे हे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पुढचे आव्हान असणार आहे ते या अर्थानेच.सशक्त लोकशाहीसाठी निवडणूक याद्यांची छाननी आवश्यकच आहे. त्यात कुणाचंच दुमत नाही. अशी नियमित छाननी साधारण पाच वर्षांतून एकदा होतही असते. पण, त्यात बऱ्याच त्रुटी राहतात, हे सर्वमान्य आहे. या त्रुटी मुख्यतः गटपातळीवरील अधिकाऱ्यांकडून, माहिती संकलकांकडून राहतात. या साध्या छाननीत चुका राहिल्यास संबंधित संकलकाला जालीम शिक्षा होत नाही. त्यामुळे, ही छाननी पुरेशा गांभीर्याने घेतली जात नाही. अनेक मृत व्यक्तींची नांवे यादीत तशीच राहतात; तर नवीन नांवे आवर्जून नोंदवली जात नाहीत. या छाननीमध्ये होणारे घोळ आणि निवडणुकीआधी मतदान यादीतील नांवे वगळण्याची किंवा जोडण्याची जी प्रक्रिया होते, ती पूर्ण विश्वासार्ह नाही. त्यात त्रुटी राहतात आणि त्यामुळेच सखोल छाननीची गरज पडते. सध्या सुरू असलेली सखोल छाननी तब्बल २१ वर्षांनी होते आहे. हेही योग्य नाही. ठरावीक काळाच्या अंतराने मतदार याद्यांची सखोल छाननी झाली पाहिजे. मतदानातले गैरप्रकार टाळले पाहिजेत. सर्वसामान्य माणसाचा लोकशाही राज्यव्यवस्थेवरील विश्वास वाढण्यासाठी हे फार महत्त्वाचे आहे. मतदारयाद्यांची सखोल छाननी करताना आपल्या देशातील एकूण समाजरचना, राज्यनिहाय चालीरीती, परंपरांचा विचारही केला पाहिजे. महिला मतदारांची नोंद करण्यासाठी प्रमाण म्हणून जी कागदपत्रे सांगितली आहेत, ती बऱ्याच राज्यात महिलांकडे असण्याची शक्यता नाही. महिलांचे शिक्षण किंवा त्यांना नागरिक म्हणून असलेले अधिकार आपल्याकडे गांभीर्याने घेतले जात नाहीत. ती लाभार्थी' होण्याची शक्यता असेल आणि संपूर्ण कुटुंबाला त्याचा लाभ होणार असेल, तरच महिलांची कागदपत्रे अद्ययावत केली जातात. अन्यथा, महिलाही त्याबाबत जागरूक नसतात. या शतकात जगात आणि देशातही स्थलांतराची गरज प्रचंड वाढली आहे. हे स्थलांतर मुख्यतः बिकट जगण्याकडून सोप्या जगण्याकडे होत असते. जे जगणे अवघड म्हणूनच परागंदा होतात, त्यांच्याकडे सगळी अचूक कागदपत्रे असण्याची शक्यता नसते. भटके - विमुक्त, अशिक्षित कुटुंबांचा यादृष्टीने विचार केला पाहिजे. जनगणनेचे आकडे आणि मतदार नोंदणीचे आकडे परस्परांशी कधीच का जुळत नाहीत? याचा विचारही नियोजनाच्या वरिष्ठ पातळीवर झाला पाहिजे. यातली तफावत निघून जाईल, अशी कार्यप्रणाली स्वीकारली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा त्यासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. जे विरोधक मतदार याद्यांत गडबड आहे, म्हणून देशभर टाकू फोडताहेत, तेच मतदार याद्यांच्या सखोल छाननीला आणि दुरुस्तीला विरोध करताना दिसताहेत, मतदारांनीच त्यांना आता याबाबत जाब विचारला पाहिजे.



# नक्षलवादी आले मुख्य प्रवाहात

**वर्षानुवर्षे जंगलात फिरणारे अनेक नक्षलवादी आता मुख्य प्रवाहात परत येऊ इच्छितात आणि शांततापूर्ण जीवन जगू इच्छितात. आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्याचे हे विधान महत्त्वपूर्ण आहे, जे नवीन पिढीच्या हितासाठी सूचक आहे. देशात ३१ मार्चअखेर नक्षलवाद संपवण्याच्या सरकारच्या धोरणाला पूरक पावले पडत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये तर प्रचंड प्रमाणात नक्षलवादी मुख्य प्रवाहात आले. त्यानिमित्ताने घेतलेला वेध.**

'आता क्रांतीपेक्षाही मोबाइल फोन, बाईक आणि गर्लफ्रेंड जास्त महत्त्वाच्या आहेत,' नक्षलवादी चळवळीला सोडचिठ्ठी देऊन मुख्य प्रवाहात येऊ इच्छिणाऱ्या नक्षलवाद्यांचे हे प्रातिनिधिक मत आहे. त्यावरून नक्षलवाद्यांची बदललेली मानसिकता लक्षात येते. दुसरीकडे, छत्तीसगडमधील बस्तर येथे सुरक्षा दलांनी 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट' अंतर्गत २७ माओवाद्यांना घेराव घालून ठार केले. त्यापैकी माओवादी संघटना सीपीआय (माओवादी)चा सरचिटणीस आणि नक्षलवादी चळवळीचा कणा असलेला नंबला केशवराव उर्फ बसवराजू हा एक होता. बसवराजू हा एक अभियंता होता. माओवादी विचारसरणीने प्रेरित होऊन तो नक्षलवादी बनला. सरकारने त्याच्यावर एक कोटी रुपयांचे बक्षीस ठेवले होते आणि त्यांच्यावर १५० सैनिकांची हत्या केल्याचा आरोप होता. त्याने सीपीआय (माओवादी) ची सशस्त्र शाखा 'पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी' (पीएलजीए)ला बळकटी देण्यासाठी काम केले. २००० मध्ये अनेक लहान नक्षलवादी गटांचे विलीनीकरण झाल्यानंतर 'पीएलजीए'ची स्थापना झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बसवराजूंच्या खात्म्याचे वर्णन 'नक्षलवाद संपवण्याच्या लढाईतील ऐतिहासिक कामगिरी' असे केले. या कारवाईमध्ये ५४ माओवाद्यांना अटक करण्यात आली. याआधी, सुरक्षा दलांनी दुर्गम कुरेगुट्टा टेकड्यांमध्ये ३१ माओवाद्यांना लपण्याच्या ठिकाणांना वेढा घालून ठार मारले होते. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रेही जप्त करण्यात आली होती. पोलिसांनी असाही दावा केला आहे, की या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत सातशेहून अधिक माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. सुरक्षा दलांच्या मते आता माओवाद छत्तीसगड, महाराष्ट्र, तेलंगणा आणि झारखंडपुरता मर्यादित राहिला आहे.

सरकारच्या मते देशभरातील माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या एप्रिल २०१८ मध्ये १२६ वरून ९० वर, तर जुलै २०२१ मध्ये ७० वर आली. एप्रिल २०२४ च्या आकडेवारीनुसार, माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या फक्त ३८ वर आली आहे. माओवाद खरोखर शेवटच्या टप्प्यात आहे का? याचे सकारात्मक उत्तर देणे खूप घाईचे होईल. काहीजण सुरक्षा दलांच्या कारवाईच्या प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. त्यांना नुकसान सहन करावे लागले आहे. माओवादाला आळा घालण्याचे राजकीय श्रेय घेण्याची स्पर्धाही सुरू झाली आहे; पण आता माओवादी थकले आहेत का? हे निश्चितपणे सांगता येत नाही. कुरैगुट्टा टेकडीवर वेढा घातल्यानंतर, माओवाद्यांनी छत्तीसगड सरकारशी शांतता चर्चेचा प्रस्ताव ठेवला. तो सरकारने नाकारला. सरकारच्या मते नक्षलवाद्यांनी एक तर शस्त्रे सोडून द्यावीत किंवा मरण्यास तयार रहावे. नक्षलवाद्यांच्या शरणागतीकडे त्यांच्या विघटित होणाऱ्या संघटनेची पुनर्स्थापना करण्यासाठी आवश्यक विराम म्हणूनही पाहिले गेले. याचा अर्थ ते पूर्णपणे तुटले आहेत, असे नाही. त्यांना अजूनही कुठून तरी ऊर्जा मिळते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की सरकारने बंदी घातलेल्या माओवादी संघटनेचीही एक सुव्यवस्थित रचना, एक निश्चित व्यवस्था आहे; ज्यामध्ये एका बसवराजूच्या जाण्याने दुसऱ्या बसवराजूसाठी मार्ग मोकळा होतो. मध्य प्रदेशचा विचार केला तर, माओवाद हा छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या काही जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे; परंतु तिथेही सरकारचे धोरण शून्य सहनशीलतेचे आहे. विकासाचा प्रकाश जसजसा वाढत आहे तसतसा नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी होत आहे. गेल्या आठवड्यात, छत्तीसगडमध्ये २०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यापूर्वी सुमारे दोनशे नक्षलवादी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सामील झाले. महाराष्ट्रात ६१ नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर आत्मसमर्पण केले. इतक्या मोठ्या प्रमाणातील आत्मसामर्पणानंतर, छत्तीसगडमधील, विशेषतः बस्तर प्रदेशातील नक्षलवाद्यांबद्दलचे आक्रमक इनपुट आता थांबले आहे. भारताचे गृहमंत्री अमित शहा यांनी १६ ऑक्टोबर रोजी 'एक्स'वर पोस्टमध्ये म्हटले होते, की एके काळी दहशतीचे केंद्र असलेल्या छत्तीसगडमधील अबुझमाड आणि उत्तर बस्तर आज पूर्णपणे नक्षलवादी हिंसाचारमुक्त घोषित करण्यात आले आहे. आता, दक्षिण बस्तरमध्ये काहीच नक्षलवादी शिल्लक आहेत, ज्यांना आमचे सुरक्षा दल लवकरच संपवेल. उत्तर बस्तर प्रदेशात अबुझमाड क्षेत्र येते. जानेवारी २०२४ मध्ये छत्तीसगडमध्ये भाजप सरकार स्थापन झाल्यापासून २,१०० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. १,७८५ जणांना अटक करण्यात आली आहे. अबुझमदचा नक्षलमुक्त दर्जा हे केवळ सुरक्षा यश नाही, तर आदिवासी भूगोलासाठी एक नवीन पहाट आहे.

छत्तीसगडच्या बस्तर प्रदेशातील सुमारे चार हजार चौरस किलोमीटरवर पसरलेले अबुझमाड शेकडो वर्षांपासून एक कोडे राहिले आहे, जे पृथ्वीवर नोंदवले गेले आहे; परंतु कागदपत्रांमध्ये हरवले आहे. बहुतेक भागांमध्ये, जमिनीचे निश्चित मोजमाप नाही. कुरणांचा कोणताही मागमूस नाही आणि रस्त्यांचे निश्चित सरेखन नाही. जुन्या कागदपत्रांवरून दिसून येते, की अकबराच्या काळात येथे महसूल नोंदी गोळा करण्याचा प्रयत्न केला गेला होता; परंतु जंगलांची खोली प्रत्येक मोजमापाच्या पायरीला गिळंकृत करत होती आणि अबुझमाड जसे होते तसे राहिले. १९७० च्या दशकात नक्षलवाद्यांनी या भागात प्रवेश केला होता. नक्षलवादी संघटनेची एक तुकडी, पीपल्स वॉर ग्रुप, या भागात आली आणि लोकांना एकत्र करण्यास सुरुवात केली. नक्षलवादी कागदपत्रांमध्ये म्हटले आहे, की एक किलो मिठाच्या बदल्यात आदिवासींकडून एक किलो काजू किंवा मनुका उकळण्याचे प्रकार घडत होते. या प्रदेशात सरकारी अधिकाऱ्याच्या नियुक्तीची तुलना काळ्या पाण्याच्या शिक्षेशी केली जात होती. १९८० च्या सुरुवातीला, आदिवासींच्या सामाजिक-सांस्कृतिक गोपनीयतेचा हवाला देऊन बाहेरील लोकांना अबुझमाडमध्ये प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली होती. पुढील काळात या भागात नक्षलवादाचा विस्तार होत राहिला. अबुझमाडचे भौगोलिक स्थान नक्षलवाद्यांच्या लष्करी प्रशिक्षणासाठी आदर्शवत होते. म्हणूनच हा परिसर दंडकारण्यमधील नक्षलवाद्यांचा गड बनला. आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रात नक्षलवाद्यांवर दबाव वाढला तेव्हा अबुझमाड हे नक्षलवादी केंद्रीय समितीपासून 'पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी'पर्यंत सर्वांसाठी आश्रयस्थान बनले.छत्तीसगड हे वेगळे राज्य झाल्यानंतर नऊ वर्षांनी या भागातील प्रवेशावरील बंदी उठवण्यात आली; परंतु तोपर्यंत नक्षलवाद जंगलाच्या मुळांसारखा पसरला होता. यथावकाश जनता सरकारने जमिनीचे पट्टे वाटले आणि लोक न्यायालयेही भरवली. ज्या सामाजिक असमानतेवर आधारित माओवाद्यांनी गावकऱ्यांमध्ये प्रभाव मिळवला, त्या दूर करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत.'नियाद नेलनार' (तुमचे चांगले गाव) सारख्या विकास योजना केवळ सुरक्षा छावण्यांच्या पाच किलोमीटरच्या परिघात मर्यादित नसून माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलेल्या संपूर्ण क्षेत्रात वाढवल्या पाहिजेत. आरोग्यसेवेसाठी शैक्षणिक आश्रम आणि रुग्णालये किंवा दवाखाने बांधण्याच्या योजना लवकर अंमलात आणल्या पाहिजेत, कारण वनउत्पादने आदिवासींसाठी उपजीविकेचे एक महत्त्वाचे साधन आहेत. त्यांच्या योग्य किमती आणि प्रक्रियेसाठी योजना राबवण्यावरही विचार केला पाहिजे. रस्तेदेखील बांधले पाहिजेत आणि मोबाइल टॉवर बसवले पाहिजेत. अशा विकास प्रकल्पांची अंमलबजावणी करताना, पर्यावरणाचे कमीत कमी नुकसान होईल, याची खात्री करणेदेखील आवश्यक आहे. सरकारने आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना पुनर्वसन धोरणाचे फायदे त्वरित मिळावेत याचीदेखील खात्री केली पाहिजे. त्यांना आवश्यक प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. अर्थात त्यानंतरही सुरक्षा दलांनी माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलेल्या भागात पाळत ठेवली पाहिजे.

**- अजय तिवारी**

# खोट्या तक्रारदारांवर कारवाई होणार का?



**विशाखा समितीने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी तपास सुरू केला. ज्यामध्ये पुरावे गोळा करणे आणि साक्षीदारांच्या मुलाखती घेणे समाविष्ट असते. ही समिती सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काम करते. विशाखा समितीने चौकशी केलेल्या जिल्हा परिषदेतील तीनपैकी दोन अधिकाऱ्यांना यापूर्वीच क्लीन चीट दिली आहे, तर सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी यांचीही निनावी तक्रार असल्यामुळे चौकशी करण्याची गरज नसल्याची विशाखा समितीने राज्य सरकारला दिलेल्या अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे या तिनही अधिकाऱ्यांविरोधात आता खोटी तक्रार करणाऱ्यांना किंवा त्यांना पाठबळ देणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार शासनाला आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेचे सीईओ काय कारवाई करणार याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.**

शासकीय कार्यालयात लैंगिक छळाच्या तक्रारी स्वीकारणे, त्यांची चौकशी करणे आणि योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार राज्य शासनाने विशाखा समितीकडे दिले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण वातावरण सुनिश्चित करणे. 'लैंगिक छळ' म्हणजे काय, याबद्दलची माहिती सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत समितीमार्फत पोहोचवली जाते. समितीमध्ये किमान अर्ध्या सदस्या महिला असणे अनिवार्य तसेच समितीचे नेतृत्व महिला सदस्यानेच करणे आवश्यक आहे. ही समिती तक्रारींची चौकशी करते, महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करते आणि वार्षिक अहवाल सादर करते. काही महिन्यांपूर्वी नाशिक जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सुधाकर मोरे यांच्या विरोधात विशाखा समितीकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यात समितीने चौकशी केल्यानंतर प्रारंभी डॉ. सुधाकर मोरे आणि त्यानंतर काही दिवसांपूर्वीच प्रताप पाटील यांनाच क्लीन चीट दिली. प्रारंभी डॉ. मोरे आणि त्यानंतर पाटील यांनी आपले नियमित कामकाज सुरू देखील केले. त्यामुळे परदेशी यांच्याबाबत तर हे सर्व प्रकरण घडवून आणले गेल्याचे बोलले जात आहे. कर्तव्य दक्ष अधिकाऱ्यांवर निनावी तक्रार, मिडिया ट्रायल करण्यामागे नेमके कोण आहे? हे शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची खरी गरज आहे. अन्यथा पुढील काळात जिल्हा परिषदेच काय तर अन्य शासकीय कार्यालयात देखील असे प्रकार वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शासकीय कार्यालयात अधिकाऱ्यांमध्ये किंवा अधिकारी अन् कर्मचाऱ्यांमध्ये कामकाजाहून वाद निर्माण होऊ शकतात; परंतु हे वाद वैचारिक अर्थात केवळ उत्तम कामकाजासाठी असतात. हे वाद विशाखा समिती किंवा शासनापर्यंत जाऊ नये याची दोन्ही बाजूने खबरदारी घेण्याची खरी गरज आहे. विशाखा समितीकडे निनावी तक्रार करण्यामागे स्वतःची ओळख लपवणे हा जरी हेतू असला तरी आपल्या हक्काचा दुरुपयोग झाल्याचे या प्रकरणातून प्रथम दर्शनी दिसते. तक्रारदार महिलांना महिला हक्क आयोग हा देखील पर्याय उपलब्ध होता. जिल्हा परिषदेतील अंतर्गत राजकारण, वर्चस्ववाद, कुरघोडी आणि विशिष्ट खुर्चीसाठी सुरू असलेली लॉबिंग, काही दुखावलेल्या संघटना ही प्रमुख कारणे देखील या प्रकरणामागे समोर येत आहे; परंतु आता जिल्हा परिषदेत विश्वासार्हता निर्माण होण्यासाठी प्रमुख असलेल्या मुख्य अधिकारी कार्यकारी यांनी आपले दालन विभागप्रमुखापासून ते सर्वसामान्य कर्मचाऱ्यांपर्यंत खुले ठेवण्याची गरज आहे. जिल्हापरिषद प्रमुखांशी ते थेट कोणत्याही अडचणी किंवा विषयावर बोलू शकतात. पुढील काळात तरी असे प्रकार होऊ नये यासाठी शासनाने तरी दक्षता घ्यावी अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करू या.

परंतु मिनी मंत्रालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच तिघा विभाग प्रमुखांविरोधात तक्रारी येण्याची पहिलीच वेळ आहे. विशाखा समितीची पुनर्रचना केल्यानंतर दोन दिवसात पहिली तक्रार प्राप्त झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. वर्ग एकच्या चौकशी समितीत विभागीय आयुक्त असणे आवश्यक असल्याचा शासन निर्णय आहे. समितीत बाहेरच्या सदस्यांचा समावेश करणे बंधनकारक आहे. मात्र एकही सदस्यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. समितीच्या अध्यक्षपदी वरिष्ठ ऐवजी कनिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली, त्यामुळे ही समिती वादात सापडल्याची चर्चा होती. तिघांपैकी एकही अधिकाऱ्यांविरोधात आरोप सिद्ध न झाल्यामुळे हे एक प्रकारे षडयंत्रच असल्याचे बोलले जात आहे. दोघे अधिकारी त्यांच्या पदावर रुजू झाले आहेत. तसेच तत्कालीन सी. इ. ओ. असताना तक्रारी यायच्या, परंतु नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी आल्यापासून एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. दरम्यान, एका पेन ड्राईव्हची देखील चर्चा देखील आजतागयात जिल्हा परिषद वर्तुळात रंगत आहेत. त्यात नेमकेकी काय होते

**- धनंजय बोडके**

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे लढाऊ विमानातून दुसरे उड्डाण!

भारताच्या सशस्त्र दलांच्या सर्वोच्च सरसेनापती असलेल्या भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी हरियाणातील अंबाला वायुसेना तळावरून भारतीय वायुसेनेच्या सर्वात अत्याधुनिक लढाऊ विमान असलेल्या राफेल लढाऊ विमानातून उड्डाण करून भारतीय सैन्य दलाच्या इतिहासात एका ऐतिहासिक क्षणाची नोंद केली. राष्ट्रपती मुर्मू यांचे लढाऊ विमानातील हे दुसरे उड्डाण असून या पूर्वी ८ एप्रिल २०२३ रोजी त्यांनी आसाममधील तेजपूर वायुसेना तळावरून सुखोई-३० एमकेआय मधून उड्डाण केले होते. अशा प्रकारे दोन वेगवेगळ्या लढाऊ विमानांतून उड्डाण करणाऱ्या त्या भारताच्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या आहेत. यापूर्वी २००९ मध्ये राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी पुणे (लोहगाव) येथील भारतीय वायुसेना तळावरून सुखोई एसयू-३० एमकेआय विमानाने उड्डाण केले होते. अशा प्रकारचे उड्डाण करणाऱ्या त्या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होत्या. २००६ मध्ये राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी पुणे (लोहगाव) येथील भारतीय वायुसेना तळावरून सुखोई एसयू-३० एमकेआय विमानाने उड्डाण केले होते. लढाऊ विमान उडवणारे ते पहिले भारतीय राष्ट्रपती होते. या उड्डाणानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 'शक्तिशाली राफेल विमानातील उड्डाणाने माझ्या मनात देशाच्या संरक्षण क्षमतांबद्दल अधिकच अभिमान दाटून आल्याची' भावना व्यक्त केली. त्यांच्या उड्डाणामुळे भारतीय सशस्त्र सैन्य दलांना अधिक प्रोत्साहन आणि सकारात्मक ऊर्जा मिळाली आहे.

**प्रदीप मोरे**

## शेतकऱ्यांची खाती रिकामीच

पावसाने यावर्षी वेळेपूर्वीच दमदार हजेरी लावली आणि अजूनही तो ठाण मांडून आहे. पावसाने सर्वच प्रकारच्या पिकांची नासधूस केली इतकेच नव्हे तर शेतजमीनही खरवडून नेली. ज्यामुळे पुढील काही वर्षे तरी बळीराजा शेतात नीट पीक घेऊ शकणार नाही. उरलीसुरली पिकेही मध्येच कोसळणाऱ्या पावसाने भुईसपाट केली आहेत. या नैसर्गिक आपत्तीने शेतकऱ्यांचे जगणे नकोसे करून टाकले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकारने भरीव आर्थिक मदत आणि मानसिक पाठबळ देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांसाठी नुकसानीच्यामानाने फारच अल्प मदत सरकारकडून जाहीर केली गेली आणि ती दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल असे जाहीर करुनही दिवाळी होऊन गेली तरी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न होणे,पंचनाम्यांची कामे थकीत असते, निवडणूकीतील शेतकऱ्यांच्या कर्जमाफी घोषणेवर सरकारचे मौन (की चालढकल) यावरुन शेतकऱ्यांप्रती सरकार किती असंवेदनशील आहे हे स्पष्ट होते. स्वतःच्या स्वार्थासाठी जाहीर केलेल्या 'लाडक्या भावांच्या लाडकी बहीण' राज्यातील निसर्गाच्या प्रकोपाला बळी पडलेल्या जगाच्या पोशिंद्या बळीराजाला वाचवणे, त्यांना आर्थिक सहाय्य करणे अधिक गरजेचे आहे.

**मुरलीधर हरिश्चंद्र थंबा,**
डोंबिवली

# "शेतकरी जगला तर राज्य जगेल" : उपमुख्यमंत्री अजित पवार

## कार्यकर्ता मेळावा व पक्षप्रवेश सोहळा जल्लोषात पार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नव्या कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा उत्साह आणि राजकीय तापमान अधिक वाढवणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा व पक्षप्रवेश सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाला. या मेळाव्यासाठी हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि शेतकरी बांधव उपस्थित राहिले होते. कळंब, बाबुळगाव, राळेगाव आणि आसपासच्या तालुक्यांतील असंख्य कार्यकर्त्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृत प्रवेश केला. या प्रसंगी प्रवीण देशमुख यांनी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या समस्यांबाबत उपमुख्यमंत्र्यांना आपल्या भाषणातून सविस्तर माहिती दिली आणि तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली.

देशमुख यांनी सांगितले की "आम्ही स्वतःसाठी काही मागत नाही, मात्र जिल्ह्यातील शेतकरी आणि मजुरांच्या न्यायासाठी झटत आहोत. शासनाने पादन रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, सिमेंट उपकलव्यांसाठी आर्थिक तरतूद व्हावी, समृद्धी महामार्गावर कृषी हब स्थापन करण्यात यावा, तसेच कळंब येथे क्रीडा संकुल भारण्यासाठी कृषी विभागाची जागा उपलब्ध करून द्यावी," अशी मागणी त्यांनी केली. तसेच अमृत योजनेअंतर्गत नळपुरवठा योजनांसाठी निधी वाढवावा आणि गावागावात २४ तास पाणी उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी देशमुख यांनी केली. याशिवाय रोजगाराच्या संधी निर्माण करून तरुणांना सक्षम करण्यावर त्यांनी भर दिला. अजित पवार यांचे कार्यकर्ते व नवनिर्वाचित सदस्यांना मार्गदर्शन करत सांगितले की "शेतकरी जगला तर राज्य जगेल" यावेळी भाषण करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य सरकारकडून ठोस निर्णय घेण्यात येतील, अशी ग्वाही दिली. ते म्हणाले "राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणारा पक्ष आहे. आम्ही रयतेचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी काम करतो. बाबासाहेबांनी दिलेलं संविधान हे सर्व जाती-धर्मातील लोकांना समान न्याय देणारं आहे, आणि त्याच ध्येयाने आम्ही शासनकारभार करतो." पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, "गेल्या काही महिन्यांतील अनियमित पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ३२ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून शेतकऱ्यांना मदतीत कमी पडू देणार नाही.

शेतकरी जगला तरच राज्य जगेल," असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच ते म्हणाले की २२ हजार कोटी रुपये महावितरणला भरले आहे. दिव्यांग योजना, लाडकी बहीण, श्रावणबाळ योजना, आणि इतर अनेक कल्याणकारी योजनांना पुरेसा निधी देण्यात येतो. रासू गवळी स्मारक उभारण्यात आले असून त्याच्या उद्घाटनाला देशाचे सर्वोच्च न्यायाधीश आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. उपमुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की "राज्यातील क्रीडा संकुले तालुका स्तरावर उभारली जाणार असून कळंबलाही प्राधान्य दिले जाईल. कलावंतांसाठी सरकार संवेदनशील आहे, मात्र गेल्या तीन वर्षांत एकही कलावंत फॉर्म मंजूर झालेला नाही. हे निर्णय तत्काळ घेतले जातील," असे त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, "ग्लोबल वॉर्मिंगचा धोका वाढत आहे, त्यामुळे झाडे लावा आणि निसर्गाचे रक्षण करा. आधुनिक शेतीसाठी AI तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शंभर टक्के उत्पादन वाढवता येईल, तसेच कोल्ड स्टोरेज सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाईल." स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर भर देत अजित पवार यांनी सांगितले की गेल्या नऊ वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. आता या निवडणुका होऊ घातल्या आहेत. सर्व कार्यकर्त्यांनी आपले मतभेद विसरून कामाला लागा. ही निवडणूक आपल्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे," असे आवाहन त्यांनी केले. या सोहळ्याला जिल्ह्यातील अनेक मान्यवर, पक्षाचे जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन प्रवीण देशमुख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

## प्रभाग रचनेतील गोंधळावर संतापाची लाट!

पांढरकवडा - नगरपरिषद पांढरकवडा येथे होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील मोठा गोंधळ उघडकीस आला आहे. प्रभाग क्रमांक ९ मधील अनेक रहिवाशांची नावे चुकीने प्रभाग क्रमांक १० मध्ये टाकण्यात आल्याने स्थानिक मतदारांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या संदर्भात प्रभाग ९ मधील रहिवासी अंकित नैताम यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी व राज्य निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, "राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार आम्ही नियमानुसार आक्षेप नोंदवला, मात्र तो पूर्णपणे दुर्लक्षित करण्यात आला. मतदार यादीतील चुकांवर कोणतीही सुनावणी न घेता थेट अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे." नैताम यांच्या मते, एकाच गल्लीत व रस्त्यावर असलेल्या घरांपैकी काहींची नावे प्रभाग ९ मध्ये, तर शेजारच्या घरांची नावे प्रभाग १० मध्ये समाविष्ट केली गेली आहेत. "आमचे घर, वास्तव्य आणि मालमत्ता प्रभाग क्रमांक ९ मध्ये असूनही माझे व माझ्या कुटुंबियांचे नावे प्रभाग १० मध्ये दाखविण्यात आली आहेत. हे पूर्णपणे अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाचे द्योतक आहे," असे नैताम यांनी सांगितले. राज्य निवडणूक आयोगाच्या "नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार याद्यांच्या पुनरिक्षणाविषयी मार्गदर्शक सूचना" मधील कलम 9(1), 11(2) आणि 13(1) तसेच महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 च्या कलम 10(2) चा सरळ भंग झाल्याचा आरोप नैताम यांनी केला आहे.

## काळी (दौ.खान) वनपरिक्षेत्रात अवैध वृक्षतोड सागवान तस्कर सक्रिय, उपवनसंरक्षक हे अनभिज्ञ कसे?

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - महाराष्ट्र शासन वन मंत्रालयातर्फे ३३ कोटी वृक्ष लागवडीचे ध्येय गाठण्याचा प्रयत्न करीत असतांना दुसरीकडे पुसद विधासभा क्षेत्रातील काळी (दौलतखान) वन परिक्षेत्रात लाकूड माफियांनी वृक्षतोडीचे जाळे पसरविले आहे. असे परिसरातील शेतकरी व वनप्रेमी यांचे आरोप असून त्याचे जिवंत पुरावे वृक्षतोडीतून पुढे आले आहे.(वनपरिक्षेत्र अधिकारी) आर.एफ.ओं.सह वनपाल, वनरक्षक, क्षेत्र सहाय्यकांचे जाणून बुजून होणारे दुर्लक्ष या वृक्षतोडीला जेवढे कारणीभूत आहे. यामुळे तस्करांना मोठे पाठबळ मिळत आहे. या होत असलेल्या प्रकारामुळे पर्यावरणाची फार मोठी हानी होत असून मौल्यवान जंगल कटाई होत असल्याने वनसंपदा घोक्यात येत आहे.

काळी (दौ.)वनपरिक्षेत्राच्या आरएफओंना आपले कुणीच वाकडे करू शकत नाही,हा भ्रम या वनपरिक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना सुद्धा झालेला आहे. गेल्या काही महिन्यांपासून या भागातील जंगलात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जात असल्याने. येथे तस्करांचे मोठे जाळे सक्रिय झाले असून, मौल्यवान सागवान आणि इतर जातींचे वृक्ष तोड करून त्याची तस्करी करत आहेत. दिवस-रात्र काही ठिकाणी झाडे तोडली जात असतांना, वनविभागाचे कर्मचारी याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या अवैध वृक्षतोडीमागे वनविभागातील काही भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे तस्करांशी थेट साटेलोटे असल्याचा संशय व्यक्त होत आहे. लाकुड तस्कर टोळ्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना हप्ता देतात आणि त्यानंतर बेहिशोबी वृक्षतोड करतात असा आरोप स्थानिक नागरिक यांच्याकडून केला जात आहे. वन विभागाच्या मदतीने लाकडी भरलेले ट्रक हे हैदराबाद येथे ज्यादा भावाने विक्रीसाठी बाहेर पडतात असाही आरोप केला जात आहे. काळी (दौ) वनपरिक्षेत्र हे मोठ्या प्रमाणात असलेले जंगल आणि मौल्यवान सागवान वनसंपदेसाठी ओळखले जाते. मात्र,अशा बेकायदेशीर अवैध वृक्षतोडीमुळे हे संपूर्ण जंगल नष्ट होऊन उजाड होण्याच्या मार्गावर आहे. जर ही अवैध वृक्षतोड तात्काळ थांबली नाही, तर येत्या काळात या परिसरातील मौल्यवान जंगल हे पूर्णपणे नष्ट होईल. यामुळे पर्यावरणाचा र्हास होऊन समतोल बिघडेल अशी भीती पर्यावरण प्रेमींकडून केली जात आहे.

पर्यावरणप्रेमींनी गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असुन या मिलीभगत मध्ये सामील असलेल्या वनविभागाच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच तस्करांना कडक कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याची मागणी सुद्धा शेतकरी,वनप्रेमी यांच्याकडून केली जात आहे. सदर प्रकरणात सम्राट मेश्राम वनपरिक्षेत्र अधिकारी काळी दौ.यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता कोणत्याही प्रकारचा संपर्क होऊ शकला नाहीं.

# सावरखेडा येथील आरोग्य उपकेंद्राकडे जाणा-या मुख्य रस्त्यावर घाणीचे साम्राज्य!

## स्थानिक ग्रामपंचायतीचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, गटविकास अधिकारी यांनी लक्ष देण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - तालुक्यातील वरध आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या सावरखेडा येथील आरोग्य उपकेंद्राकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर अक्षरशः घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याला व जीविताला गंभीर धोका निर्माण झाला असून स्थानिक ग्रामपंचायतीकडून या विषयाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

मुख्य रस्ता बंद असल्याने नागरिकांना छोट्या व अरुंद पर्यायी मार्गाने उपकेंद्राकडे जावे लागते. परंतु हा रस्ता पूर्णपणे गवत, चिखल आणि कचऱ्याने भरलेला असून, नागरिकांना आरोग्यसेवेसाठी जाताना अक्षरशः जीव मुठीत धरून जावे लागते. स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयाच्या नियंत्रणाखाली हा परिसर येत असतानाही सरपंच आणि सचिव मात्र कुंभकर्णीय झोपेत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिसरातील अस्वच्छतेमुळे या रस्त्यावर साप, विंचू आणि इतर विषारी जीवजंतूंचे वास्तव्य वाढले आहे. त्यामुळे विशेषतः महिला, लहान मुले आणि वृद्ध नागरिकांना या रस्त्याने जाणे म्हणजे धोक्याचे ठरत आहे. ग्रामस्थांनी अनेकदा लेखी आणि तोंडी तक्रारी करूनही प्रशासनाने कोणतीही कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. स्थानिक प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे "नागरिकांच्या जीवाशी खेळ केला जात आहे" अशी भावना ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.

सावरखेडा गावातील सामाजिक कार्यकर्ते शैलेश आडे यांनी सांगितले की "मुख्य रस्त्यापासून आरोग्य उपकेंद्राच्या गेटपर्यंत सुमारे ५० मीटर परिसर पूर्णपणे कचऱ्याने भरलेला आहे. याकडे स्थानिक प्रशासनाचे व अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे. या रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना साप-विंचूसारख्या सरपटणाऱ्या जीवजंतूपासून धोका आहे. जर कोणतीही दुर्घटना घडली, तर याला जबाबदार कोण ठरणार? आम्ही मागणी करतो की संबंधित अधिकारी तातडीने पाहणी करून परिसर स्वच्छ करण्याचे आदेश द्यावेत, अन्यथा आम्ही सर्व नागरिक उपोषणाला बसण्याचा इशारा देत आहोत."

# उमरखेड आगाराने प्रथम क्रमांक पटकाविला

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - अभियान समितीचे अध्यक्ष श्री नितीन भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली व रा.पमहामंडळाने दिलेल्या अटी यातून मा. आगार व्यवस्थापक प्रमोदींनी किनाके यांनी लोकसहभागातून विविध उपक्रमांतर्गत बस स्थानकासाठी योजना राबविल्यामुळे उमरखेड आगार हा अमरावती प्रदेशामध्ये प्रथम क्रमांकामध्ये आला त्यामध्ये विविध संघटना जसे की सहस्त्रभाऊ चारिटेबल ट्रस्ट अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी डेक्स, ज्येष्ठ नागरिकांसाठी चबुतरा व गुर,ढोर, आत मध्ये येऊ नये म्हणून रिव्हॉल्विंग गेट बनवून देण्यात आला तसेच औदुंबर वृक्ष संवर्धन समिती व युथ फाऊंडेशन समिती यांच्याद्वारे बस स्थानकावर बगीचा क्रमांक दोन बनवून देण्यात आला आणि स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्यामार्फत स्तनदा माता करता हिरकणी कक्ष व अनमोल कलेक्शन मार्फत वेळापत्रक आणि शिवम प्रिंटर्स मार्फत मार्गफलक देण्यात आले व बसस्थानक रंगरंगोटी श्री डॉक्टर खांबाळकर,एकता ज्वेलर्स व राजमाता जिजाऊ बँक यांच्यामार्फत करून देण्यात आली आणि बगीचा क्रमांक एक हा राप कर्मचारी यांच्या वर्गणीतून बनवण्यात आला व बाहेरील अनधिकृत वाहने बस स्थानकामध्ये पार्किंग होत असल्यामुळे शहजादा यांच्यामार्फत सिमेंटचे 10 पोल व युथ फाऊंडेशन मार्फत तारेचे जाळी देण्यात आले आणि उन्हाळ्याची चाहूल लागताच थंड व शुद्ध पाणी वाटर फिल्टर प्रवाशांना मिळावे म्हणून श्रीराम सारडा आणि दत्तात्रय दुर्गेवार (रोटरी क्लब उमरखेड) यांच्यामार्फत बसविण्यात आले असा विविध लोक सहभागातून उमरखेड बस स्थानकावर सर्व स्तरातून काम करून घेण्यात आली यामध्ये निश्चितच उमरखेड आगाराचे नाव महाराष्ट्र मध्ये वरच्या स्थरावर घेतल्या जात आहे.

## नगर परिषदेतील टेंडर प्रक्रियेतील विरोधात काँग्रेसचे आमरण उपोषण मागे

# आ. मांगुळकर यांच्या मध्यस्थीने तोडगा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : नगरपरिषदेच्या जैवखनन (Bio-Mining) प्रकल्पासह विविध विकास कामांतील टेंडर प्रक्रियेत झालेल्या अपारदर्शकतेच्या निषेधार्थ शहर काँग्रेस कमिटी, यवतमाळ तर्फे दि.२८ ऑक्टोबर रोजी नगरपरिषद कार्यालयासमोर अन्न त्यागासह आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. हे उपोषण शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष यांच्या नेतृत्वात पार पडले. त्यांना सोशल मीडिया काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके आणि सामाजिक कार्यकर्ते कॉ. सचिन मनवर यांनी सह-उपोषणकर्ते म्हणून साथ दिली होती.

घंटागाडी कचरा संकलन व नाली सफाईच्या टेंडर प्रक्रिया तात्काळ रद्द करणे, अग्निशमन विभागीय कार्यालयाचे टेंडर नव्या नगरपरिषद मंडळाच्या स्थापनेनंतर पारदर्शक पद्धतीने राबविणे, तसेच Defect Liability Period अंतर्गत सर्व रस्त्यांची तपासणी व दुरुस्ती करणे आणि भुयारी गटारीमुळे खराब झालेल्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करणे या प्रमुख मागण्या काँग्रेसकडून करण्यात आल्या होत्या. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी घनकचरा व्यवस्थापनाच्या टेंडर प्रक्रिया रद्द करण्यात आल्याचे जाहीर केले. इतर टेंडरना मुदतवाढ देऊन त्यातील गुंतागुंतीच्या अटी-शर्ती वगळून नवीन पारदर्शक टेंडर काढले जाणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. ही माहिती पालकमंत्री मा. संजय राठोड आणि आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत देण्यात आली. नगरपरिषद मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांनी शहरातील खराब रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याचे वचन दिले, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता प्रफुल व्यवहारे यांनी भुयारी गटारी योजने खालील रस्त्यांची दुरुस्ती तत्काळ सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले. या सर्व आश्वासनांनंतर आंदोलनकर्त्यांनी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या मध्यस्थीने मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांच्याकडून लेखी हमी घेतली आणि दिनांक 30 ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता नारळ पाणी घेऊन आमरण उपोषण मागे घेतले.

# बाभूळगावात अजित पवार यांना दाखविले काळे झेंडे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



बाभुळगाव - राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या यवतमाळ दौऱ्यात आज दि. 30 रोजी सकाळच्या सुमारास बाभूळगाव येथे काँग्रेसचे नगरसेवक अक्षय राऊत, प्रदीप नांदुरकर यांनी त्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवत जोरदार घोषणाबाजी केली. हा प्रकार ते पक्षप्रवेश कार्यक्रमासाठी जात असताना घडला. या प्रकाराने तालुक्याच्या राजकीय संकुलात एकच खळबळ उडाली होती.

उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यवतमाळ येथे कार्यक्रमासाठी बाभूळगावमार्गे यवतमाळला निघाले होते. दरम्यान बसस्थानक चौकात सदरचा प्रकार घडला. यावेळी प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. पोलिसांनी अक्षय राऊत, प्रदीप नांदुरकर, उ.बा.ठा.शिवसेनेचे गजानन पांडे यांचेसह काँग्रेस तालुकाध्यक्ष मोहन बनकर, अतुल देशमुख, मोहन भोयर, कृष्णा ठाकरे, विनोद वाटमोडे, नंदू एकलारे, शिवसेना (ऊ.बा.ठा.) चे शैलेश भगत, प्रहारचे श्रीकांत घोंगडे आदी पदाधिकाऱ्यांना स्थानबद्ध करून पोलीस ठाण्यात नेले.

या घटनेमुळे राजकीय वातावरणात चांगलीच खळबळ उडाली आहे. अजित पवार परत जात असताना कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ काँग्रेसच्या अतुल राऊत, श्याम जगताप, विपुल बोदडे, अमेय घोडे याचेसह कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी केली.

**शेतकऱ्यांसाठी अश्याच प्रकारे लढत राहू : अतुल राऊत**

**संपूर्ण कर्जमाफी, शेतमालाला योग्य भाव यासाठी राज्यभरातील शेतकरी आज नागपूरमध्ये मुसळधार पावसात आंदोलन करत आहेत. असे असताना उपमुख्यमंत्री मात्र पक्षविस्ताराच्या दौऱ्यांमध्ये व्यस्त आहेत. "शेतकरी उपाशी मरतोय आणि सत्ताधारी मात्र राजकारणात रमलेत, त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत अश्याच प्रकारे लढत राहू. अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते तथा बाजार समिती संचालक अतुल राऊत यांनी दिली.**

# सामाजिक कार्यकर्त्यावर देशद्रोहाचा गुन्हा!

## सरकारी व्यवस्थेवर टीका म्हणजे आता देशद्रोह का?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - लोकशाहीत शासनावर प्रश्न विचारणे हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. परंतु यवतमाळमध्ये सामाजिक कार्यकर्त्यावर थेट देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून प्रशासनाने नागरिकांच्या आवाजावर गदा आणल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

रोहन दिलीप रामटेके (वय 32, यवतमाळ) हा सर्वसामान्य पार्श्वभूमी असलेला तरुण, प्रशासनातील त्रुटींवर सतत आवाज उठवत आला. सरकारी दफ्तरात अन्याय झाल्याने त्याने स्वतः न्याय मिळविण्याचा लढा दिला आणि त्याचबरोबर नागरिकांच्या अडचणींवर थेट प्रशासनाशी प्रश्न विचारण्याचे धाडस दाखविले. मात्र हेच धाडस आता त्याच्या विरोधात शस्त्र म्हणून वापरण्यात आले असून, यवतमाळ शहर पोलिसांनी त्याच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 152 अंतर्गत देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला आहे. "महाराष्ट्राचा बिहार केला, आता भारताचा नेपाल करायची वेळ" कमेंट ठरली गुन्हा! घटनेची पार्श्वभूमी अशी की, काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषद शाळेत शिक्षक नसल्याने काही लहान विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेवर मोर्चा काढला होता. त्या घटनेचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि रोहन रामटेके यांनी त्या फोटोवर "महाराष्ट्राचा बिहार केला, आता भारताचा नेपाल करायची वेळ सरकारने आणली आहे." अशी साधी कमेंट केली. यांच्या पोस्टवरून विवेक सज्जनवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी देशद्रोहासारखा गंभीर गुन्हा दाखल केला. लोकशाहीतील 'असहिष्णुता' वाढतेय का? हा प्रश्न आता निर्माण होत असून देशद्रोहाचा गुन्हा म्हणजे भारताच्या सार्वभौमत्व, एकता व अखंडतेस धोका निर्माण करणारे कृत्य. परंतु प्रशासनातील ढिसाळ कारभारावर भाष्य करणारा, सामाजिक प्रश्नांवर बोलणारा एक सामान्य नागरिक या कलमानुसार गुन्हेगार ठरविणे ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे. सरकारी कारभारावर प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही, तो घटनात्मक अधिकार आहे. अशा कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करून सरकार जनतेचा आवाज दडपण्याचा प्रयत्न करत आहे. अशी प्रतिक्रिया अनेक सामाजिक संघटनांकडून व्यक्त होत आहे.या प्रकरणात पोलीसांनी नुसती तपासणी न करता थेट देशद्रोहाचा गुन्हा दाखल केल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. "एका सोशल मीडिया पोस्टवरून देशद्रोह? तर मग लोकांनी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करायचा तरी कसा?" असा सवाल जनतेतून विचारला जात आहे. या घटनेनंतर यवतमाळसह संपूर्ण विदर्भातील सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये भीती आणि असंतोषाचे वातावरण आहे. "आज रोहनवर देशद्रोह, उद्या कोणावर?" असा प्रश्न आता सामान्य नागरिकांच्या ओठांवर आहे. प्रशासनातील त्रुटी दाखविणे, भ्रष्टाचारावर बोट ठेवणे किंवा शासकीय निष्क्रियतेवर टीका करणे यालाच जर देशद्रोह समजले जाणार असेल, तर लोकशाहीचा अर्थच संपला, असे सामाजिक कार्यकर्त्यांचे मत आहे. यवतमाळ मधील ही घटना केवळ एका कार्यकर्त्याची नाही. ती लोकशाहीच्या गळा घोटण्याच्या प्रक्रियेचा इशारा आहे. प्रशासनावर प्रश्न विचारणारे नागरिक हे या देशाचे शत्रू नाहीत तर तेच लोकशाहीचे खरे प्रहरी आहेत. शासनाच्या भूमिकेवर टीका म्हणजे देशद्रोह नव्हे ती लोकशाहीची खरी कसोटी आहे.

# दिग्रस मधील वाईन शॉप आणि वाईन बारमध्ये मद्य विक्री ज्यादा दराने

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - स्थानिक दिग्रस तालुका व शहरांमध्ये देशी आणि वीदेशी मध्याच्या विक्री बाबत मनमानी कारभार सुरू असून दिग्रस मधील जवळपास सर्वच वाईन शॉप आणि वाईन बार मध्ये मद्य विक्री ही निर्धारित किमतीपेक्षा जास्त दराने विक्री केली जात आहे. परंतु स्थानिक प्रशासनाचे आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे या सर्व बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांना कडून बोलले जात आहे.

दिग्रस शहरासह तालुक्यामध्ये देशी आणि विदेशी मद्याचे शौकीन नागरिक सध्या जादा दराने मद्य विक्री होत असल्याच्या समस्यने ग्रस्त असून त्यांना विनाकारण आर्थिक भुरदंड सहन करावा लागत आहे. स्थानिक शासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी या गंभीर बाबीकडे का जाणीवपूर्वक डोळेझाक केली आहे? असा नागरिकांचा प्रश्न आहे. देशी आणि विदेशी मद्य मध्ये अनेक वाईन शॉप आणि वाईन बार मध्ये सध्या खूप मोठा गलथान कारभार सुरू आहे. दिग्रस मधील वाईन बार मध्ये 180 मिली च्या एका बॉटलवर जवळपास 70 ते 80 रुपये ज्यादा दर आकारले जात आहे. तर वाईन शॉप मध्ये सुद्धा 10 ते 20 रुपये जास्त घेतले जाते. देशी मद्यावर सुद्धा 20 ते 30 रुपये ज्यादा दर आकारला जात आहे. तसेच जितके महाग वीदेशी मद्य तितका जादा दर असा मनमानी कारभार आहे. 100 रुपये ते 500 रुपयांपर्यंतच्या मद्यावर 50 ते 100 रुपयांपर्यंतचा जादा दर वाईन बार मालकांकडून आकारला जात आहे. बऱ्याच मद्य प्रेमींकडे मद्य पिण्याचा आणि बाळगण्याचा परवाना नसल्याने उगाच त्रास नको म्हणून कुणीही तक्रार देण्यास धजावत नाही. याचाच फायदा घेऊन वाईन शॉप आणि वाईन बार चालक मनमानी कारभार करत आहे. निर्धारित किमतीपेक्षा ज्यादा दराने विक्री करणे कायद्या अंतर्गत गंभीर गून्हा आहे. तरीही पोलीस प्रशासन कारवाई का करीत नाही? असा नागरिकांना प्रश्न पडला आहे. ज्यादा दराने मद्य विक्री हा मद्य प्रेमींवर खूप मोठा अन्याय असून ही समस्या दूर करण्याची मागणी होत आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने निर्धारित केलेल्या किमतीनुसार मद्य विक्री केली जावी, अशी मद्य प्रेमींची मागणी आहे.

# वेचक



## रजनीकांत बोरेले यांच्या धान्य खरीद दारी, आडतच्या मुहूर्तावर सोयाबीनला ४५०० रुपये भाव

पांढरकवडा - येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील अपक्ष संचालक तसेच प्रसिद्ध धान्य खरीददार व अडतदार रजनीकांत डालूरामजी बोरेले (आर.बी.) यांनी यंदाच्या सोयाबीन खरेदी हंगामाचा शुभारंभ गोपा अष्टमीच्या मुहूर्तावर, दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी विधिवत पूजा-अर्चना करून केला. ढोल-ताशांच्या गजरात, वैदिक मंत्रोच्चार आणि नारळ फोडून मुहूर्त साधत बोरेले यांनी सोयाबीनचा दर प्रती क्विंटल ४५०० रुपये असा जाहीर केला. हा भाव सर्व मंड्या पेक्षा जास्त भाव रजनीकांत बोरेले यांनी दिल्याने विदर्भात चर्चेचा विषय ठरला .या भावाने शेतकऱ्यांमध्ये उत्साह आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले. मुहूर्त खरेदीसाठी आलेल्या ऐकून 26, शेतकऱ्याचा आणि 10, मजूरांचा रजनीकांत बोरेले यांच्या हस्ते वस्त्र, नारळ, हार तसेच अर्धा किलो मिष्ठान ची पेटी भेट देऊन सत्कार करण्यात आला. या अनोख्या उपक्रमामुळे शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला. विशेष म्हणजे पांढरकवडा बाजार समितीचा अधिकृत शुभारंभ २७ ऑक्टोबर रोजी झाला होता. त्या दिवशी सोयाबीनचे भाव ४०६० रुपयांपासून खाली ८०० रुपयांपर्यंत घसरले होते. मात्र, बोरेले यांच्या खरेदी आणि आडतच्या मुहूर्तावर दर ४५०० रुपयांपासून २००० रुपये (मतीरा) पर्यंत राहिल्याने शेतकऱ्यांना समाधानकारक भाव मिळाला. शेतकऱ्यांमध्ये रजनीकांत बोरेले यांच्यावरील विश्वास इतका आहे की, अनेकांनी २७ ऑक्टोबरलाच बाजार समिती आवारात आपले सोयाबीन ठेवून ३० तारखेच्या त्यांच्या मुहूर्ताची वाट पाहिली. बोरेले यांच्या मर्तवर शेत करी यांची प्रचंड गर्दी होती यावेळी व्यापारी,नीतिन बाजोरिया,प्रमोद भूत, आनंद चोपडा,सुहास कापर्तिवार,महेश आदेवार, गजानन ओसावार, गणेश हटकर, गुंटटू धादोड़ हे सर्व व्यापारी प्रामुख्याने उपस्थित होते, व सचिव सुरेश खानदनकर, हे शुद्धा उपस्तित होते यावी रजनीकांत बोरेले यांचा प्रभाव शाली भाषण झाला हे विशेष"बोरेले खरेदीदारांकडे चांगला भाव आणि प्रामाणिक व्यवहार सन्मान सह मिळतो, अशी चर्चा शेतकऱ्यां मध्ये सुरु होती.

## अल्पसंख्याक बहुल शाळा व संस्थांसाठी पायाभूत सुविधांसाठी अनुदान

यवतमाळ : अल्पसंख्याकबहुल शासनमान्यता प्राप्त खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका, नगरपरिषद शाळा तसेच अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना सन २०२५–२६ राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या पात्र संस्थांनी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयात दि.१४ नोव्हेंबर पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. शासन निर्णयातील नमूद केलेल्या १२ पायाभूत सोयीसुविधांपैकी आवश्यक त्या सुविधांसाठीच प्रस्ताव रु १० लाखांच्या मर्यादेत सादर करावेत. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत. तसेच शासन निर्णय व परिपत्रकातील पात्रतेच्या अटींनुसारच प्रस्ताव सादर करण्यात यावेत, अन्यथा अशा प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही, असे नियोजन विभागाने स्पष्ट केले आहे.

## बोदेगावात एकाला काठीने मारहाण

दारव्हा : पाच जणांनी संगनमत करून गैरकायद्याची मंडळी जमवत एकाला काठीने बेदम मारहाण करून जखमी केले. ही घटना तालुक्यातील बोदेगाव येथील दुर्गा फार्मजवळ घडली. रवींद्र येळे, संतोष येळे, दादाराव येळे, योगेश येळे, आनंद येळे सर्व रा. सावंगी रेल्वे यांनी काठीने डोक्यावर, पाठीवर, हातावर मारून जखमी केले. तसेच शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबतची तक्रार अण्णाजी कोंडूजी टेले रा. पहुर, ता. नांदगाव खंडेश्वर यांनी दारव्हा पोलीस ठाण्यात दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

# आमदार सुपूत्रांची निवडणुकीच्या रिंगणात होणार एन्ट्री?

## एकाची ग्रामीण तर दुसऱ्याचे शहरामध्ये लॉबिग सूरु

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्याला सद्या स्थितीत दोन आमदार लाभले आहेत आ. गजानन लवटे विधानसभेवर निवडून आले आहे. तर दुसरे आमदार ज.मो. अभ्यंकर विधान परिषदेवर निवडून आले आहे. विशेषता दोन्ही आमदार शिवसेना ठाकरे गटातून निवडून आले आहे.आ. लवटे व आ. अभ्यंकर यांचे सुपुत्र निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे.

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती साठी आरक्षित असल्यामुळे आ. लवटे यांचे सुपुत्र यश लवटे नगराध्यक्ष पदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. तर विधान परिषद सदस्य आ.ज.मो. अभ्यंकर यांचे गाव विहीगाव जिल्हा परिषद सातेगाव गटात येत असून हा गट अनुसूचित जाती साठी आरक्षित असल्यामुळे त्यांचे सुपुत्र प्रशांत अभ्यंकर जिल्हा परिषदेच्या निवडणूकीच्या मैदानात उतरवण्याची शक्यता असुन ही पहिलीच वेळ असेल अंजनगाव तालुक्यात दोन्ही आमदार सुपुत्र निवडणुकीच्या रिंगणात पाहण्याची त्यामुळे या निवडणुकीकडे तालुक्यातील मतदारांचे लक्ष लागले आहे.

**दोन्ही सुपुत्रांची निवडणूक आखाड्याची परीक्षा**

आमदार लवटे आणि आमदार अभ्यंकर यांच्या सुपुत्रांची निवडणूक आखाड्यात उतरण्याची पहिलीच वेळ असून दोन्ही सुपुत्रांना राजकीय डावपेचा कोणताही अनुभव नाही त्यामुळे दोन्ही उमेदवारांना एक सुशिक्षित उमेदवार म्हणून मतदारांत आपली छाप पाडावी लागणार असून दोन्ही आमदार सुपुत्रांची निवडणुकीच्या



आ.गजानन लवटे



यश ग.लवटे



आ.ज.मो. अभ्यंकर



प्रशांत ज. अभ्यंकर

आखाड्याची अग्नीपरिक्षा असणार आहे.

एक ग्रामीणमध्ये तर दुसरा शहरामध्ये दोन्ही आमदार सुपुत्र वेगवेगळ्या राजकारणाच्या आखाड्यात लॉचिग होणार असून एक शहरी तर दुसरे ग्रामीण राजकारणात सक्रिय होणार आहे.लवटे पुत्राला शहरातील मतदार पक्षाच्या आधारावर मतदार जुळवाजुळव करा लागेल तर ग्रामीण मधुन अभ्यंकर पुत्राला गटातटाचे मतदार जुळवाजुळव करावे लागेल. त्यामुळे दोन्ही आमदार सुपुत्रांना वेगवेगळ्या पद्धतीने राजकारण खेळून आप आपले नशीब आजमावणार लागेल.

# अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मुख्यालयीन राहण्यास नकारघंटा

## तालुक्यातील शेकडो कर्मचारी करतात अन्य ठिकाणांहून ये-जा

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

नांदगाव खंडेश्वर शहर हे तालुक्याचे ठिकाण असून येथे तालुकास्तरावरील सर्वच विभागातची प्रमुख शासकीय कार्यालय आहेत परंतु या कार्यालयातील कार्यरत प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयी राहणे गरजेचे असून सुद्धा नांदगावात मुख्यालयी राहण्यास अधिकारी व कर्मचारी यांची नकार घंटा आहे.

येथून दररोज शेकडो कर्मचारी अपडाऊन करीत असल्याने नागरिकांची कामे कोळंबली असून वेळेवर होत नाहीं. शिवाय तालुक्याचे विकासाला सुद्धा खिळ बसत आहे शासकीय कामासाठी ग्रामीण भागातील हजारो नागरिकांचा संबंध दररोज नांदगावला तालुक्याच्या ठिकाणी येतो परंतु अधिकारी व कर्मचारी कार्यालयात अपडाऊन मुळे वेळेवर उपस्थित होत नसल्याने दूरवरून येणाऱ्या नागरिकांची कामे खोडंबली जात असल्याने नागरिकांची गैरसोय होते शेकडो कर्मचारी जिल्ह्याचे किंवा वेगवेगळ्या ठिकाणावरून ये जा करीत असल्याने कर्मचाऱ्यांचा येण्या जाण्यामध्येच वेळ जातो त्यामुळे कार्यालयात वेळेवर उपस्थित होऊ शकत नाही अनेक कर्मचारी उशिराने उपस्थित होतात शिवाय अपडाऊन मुळे कार्यालयात उपस्थित झाल्यावर संध्याकाळी सुद्धा वेळेच्या आधीच गावाला घरी जाण्याची मानसिकता होत असल्याने नागरिकांच्या कामाकडे दुर्लक्ष होते प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयी राहणे गरजेचे असून तसेच शासनाचे आदेश बंधनकारक आहे तसा शासन नियम आहे परंतु या नियमाला तालुक्यातील अपडाऊन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तिलांजली दिली असल्याचे दिसून येते अपडाऊनमुळे शासकीय कार्यालयात वेळेआधीच शुकशुकाट दिसून येत असून नागरिकांच्या कामाला विलंब कारणीभूत ठरत असल्याचा आरोप होत आहे याबाबत वरिष्ठ स्तरावरून कडक निर्बंध येणे गरजेचे आहे.

■ नगराध्यक्ष असताना प्रशासकीय अधिकाऱ्यासोबत कामे केली त्यावेळी जनतेची कामे कमी आणि कर्मचाऱ्यांना घरी जाण्याची घाई यामुळे कामे वेळेवर पूर्ण होत नाही असा अनुभव असून याबाबत वरिष्ठ स्तरावर तक्रार सुद्धा केली आहे.

**संजय पोफळे,**
माजी नगराध्यक्ष नांदगाव खंडेश्वर

■ विविध विभागाचे शासकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालय राहत नाही अपडाऊनमुळे कर्मचारी कार्यालयात उशिरा पोहचतात आणि शासनाचा घर भाडे भत्ता सुद्धा घेतात तेव्हा शासनाने मुख्यालयाच्या नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**प्रकाश मारोटकर** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे.

■ तालुक्याचे ठिकाण असून सुद्धा शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मुख्यालयीन राहत नाही त्यामुळे सामान्य नागरिकाची कामे वेळेवर होत नाही या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर तक्रार करणार.

**रंजीत खंडाळकर**
शहर अध्यक्ष भाजपा

■ अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयीन राहण्याचा नियम असून सुद्धा काही वैयक्तिक कारणे सांगून या शासकीय नियमाला बगल देऊन कर्मचारी अधिकारी अपडाऊन करतात व कार्यालयात वेळेवर पोहोचत नाही.

**मो. साजिद**
कार्यकर्ता राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट

# वरखेड येथील डीबीवर वेलांची माला

## विज वितरण कंपनी चे दुर्लक्ष

**तिवसा/वार्ताहर**

शेतीला वीजपुरवठा करणाऱ्या वरखेड येथील बोके विद्यालयाजवळील वीज वितरण कंपनीची डीपी गवत, झाडे-झुडपांनी व्यापली असून वरपर्यंत वेलांची माला गेली असून ते उघड्यावर असल्यामुळे शेतीला वीजपुरवठा होत असताना अनेकदा लाईन खंडित होत असल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे येथील ट्रान्सफॉर्मर उघड्यावर असल्यामुळे धोका निर्माण झाला आहे. त्यातच या गावात अनेक महिन्यांपासून वायरमनच नसल्यामुळे गावकरी व शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. तिवसा उपविभागीय वीज वितरण कार्यालयाकडून याची दखल घेऊन नियमित वायरमन ची नियुक्ती करण्यात यावी, वरखेडवासीयांकडून होत आहे.



# जिल्ह्याला मिळणार स्वतःचा पक्षी

## पक्षीमित्र संमेलनातून ठरणार निवड

**अमरावती/का.प्र.**

अमरावती येथे १ व २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनातून अमरावती जिल्ह्याला स्वतःचा पक्षी मिळणार आहे. या संमेलनाच्या आयोजक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. अंजली देशमुख आणि महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली. अमरावतीत दुसऱ्यांदा आयोजित हे संमेलन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात पार पडणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष वरिष्ठ सनदी अधिकारी तथा प्रख्यात पक्षीमित्र प्रवीण परदेशी असतील. त्यांच्या उपस्थितीत राज्यभरातील पक्षीमित्र आपापल्या भागातील पक्षीवैभव सादर करतील आणि पक्षी संवर्धनासाठी शासनाकडून अपेक्षित सहकार्याबाबतचा ठराव संमत करतील.

अमरावती जिल्ह्याचे वैभव असलेल्या मेळघाट जंगलात तणमोर, रानपिंगळा, सारस आणि माळढोक हे प्रमुख पक्षी आढळतात. याव्यतिरिक्त जिल्ह्याच्या विविध जंगलांमध्ये एकूण ४०० पक्ष्यांच्या प्रजाती असल्याचे यावेळी सांगण्यात आले. राज्यात एकूण ६०० पक्ष्यांच्या प्रजाती असून, देशभरातील पक्ष्यांची संख्या १ हजार ३३४ वर पोहोचली आहे.आयोजकांच्या अंदाजानुसार, या संमेलनासाठी आतापर्यंत अडीचशे प्रतिनिधींनी नोंदणी केली असून, अखेरच्या क्षणापर्यंत ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. यावेळी वेक्सचे कोषाध्यक्ष डॉ. गजानन वाघ, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत वडेकर, सदस्य मनीष ढाकुलकर आणि ॲड. राजमेहेर निशाने उपस्थित होते. पक्षी निरीक्षण, वन्यजीव आणि वन क्षेत्रातील दिग्गज पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या स्मृती कायम राहाव्यात म्हणून संमेलनाच्या परिसराला 'पद्मश्री मारुती चितमपल्ली नगरी' असे नाव देण्यात आले आहे. तसेच, ज्या सभागृहात हा कार्यक्रम होईल, त्या सभागृहाला डॉ. सलीम अली यांचे नाव देण्यात आले आहे.

# 'वॉक फॉर युनिटी' हा उपक्रम सहभागी व्हा

**धारणी/वार्ताहर**

राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी धारणी पोलीस स्टेशनच्या वतीने 'वॉक फॉर युनिटी' हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ठाणेदार अवतारसिंग चव्हाण आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश झाल्टे यांनी केले आहे. ही पदयात्रा जयस्तंभ चौक येथून प्रारंभहोऊन बसस्टँडपर्यंत काढण्यात येणार असून सकाळी सात वाजता या उपक्रमाला सुरुवात होईल. या वॉक फॉर युनिटीचा संदेश 'एक भारत, स्वस्थ भारत' असा आहे.या कार्यक्रमात पोलीस अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्साहाने सहभागी व्हावे.




# हितेश साबळे यांची जिल्हा परिषद निवडणुकीसाठी दावेदारी

**मोर्शी/वार्ताहर**

मोर्शी तालुक्यातील पिंपळखुटा मोठा जिल्हा परिषद सर्कलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कडून युवा नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे हितेश साबळे यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी दावेदारी निश्चित केली आहे. त्यांच्या दावेदारीला स्थानिक पातळीवर मोठा प्रतिसाद मिळत असून, पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

हितेश साबळे यांनी शेतकरी चळवळीमध्ये देवेंद्र भुयार यांचं बोट धरून राजकारणामध्ये प्रवेश केला असून स्वाभिमान निष्ठा आणि प्रामाणिकपणा हे राजकारणातील त्यांचं वैशिष्ट्य असून आयुष्यातील बारा वर्षाच्या प्रवासामध्ये देवेंद्र भुयार यांच्यासोबत राहून शेतकऱ्यांसाठी केलेला संघर्ष, शेतकरी चळवळीपासून ते विधानसभेच्या प्रवासापर्यंत काम करण्याचा संपूर्ण अनुभव असून गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी चळवळीमध्ये शेतकरी हितासाठी शेतकऱ्यांना न्याय मिळून देण्यासाठी अनेक आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविल्या असून हितेश साबळे विश्वासू कार्यकर्ते म्हणून सक्रिय असून, जनतेच्या प्रश्नासाठी त्यांनी सतत आवाज उठविला असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये त्यांच्याप्रती सहानुभूती निर्माण झालेली आहे. विशेष म्हणजे, मोर्शी विधानसभा मतदार संघाचे माजी आ. देवेंद्र भुयार यांच्या शेतकरी चळवळीमध्ये तयार झालेले असून देवेंद्र भुयार यांचे ते अत्यंत निकटवर्तीय आणि विश्वासू कार्यकर्ते आहेत. देवेंद्र भुयार यांच्या मार्गदर्शनाखाली हितेश साबळे यांनी पक्षविस्तार आणि जनसेवा यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. स्थानिक नागरिकांनीही हितेश साबळे यांच्या उमेदवारीचे स्वागत करत 'जनतेचा माणूस' अशी प्रतिक्रिया दिली आहे. कृषी मंत्र्यांच्या विरोधातील आंदोलन उपोषण चिकाटी जिद्द मेहनत तळागाळातील गोरगरिबांबरोबर असलेला संवाद आणि बारा वर्षापासून पिंपळखुटा मोठा जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व लोकांबरोबर ठेवलेला संपर्क व सततच्या कामांच्या भारोश्यावर संधी मिळेल अशी आशा हितेश साबळे यांनी व्यक्त केली.



## सुंदर शाळा बनवा आणि लाखोंचे बक्षिसे जिंका!

# जिल्हात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रम सुरु होणार-शिक्षणाधिकारी

**अमरावती/का.प्र.**

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभिनव अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यास शासनाची मान्यता मिळाली आहे. हे अभियान ३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार असून, एकूण ७२ कोटी २२ लाख रुपयांची बक्षिसे राज्यातील विजेत्या शाळांना दिली जाणार आहेत.

सन २०२५-२६ मध्ये हे स्पर्धात्मक अभियान काही नवीन उपक्रमांसह राबविले जाणार आहे. त्यानुसार, या तिसऱ्या टप्प्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अभियानासाठी राज्यातील शाळांची विभागणी दोन गटांमध्ये करण्यात आली आहे. त्यामध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा यांचा समावेश राहणार आहे. प्रत्येक स्तरावर या दोन्ही गटांमधून स्वतंत्र विजेते निवडले जाणार असल्याची माहिती अमरावती जिल्हा परिषदचे प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल यांनी दिली आहे. या अभियानाचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणार आहे. त्यानंतर, १ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मूल्यांकनाची प्रक्रिया पार पडेल. तालुका स्तरावर ३ लाख, २ लाख आणि १ लाख अशी तीन बक्षिसे राहतील. जिल्हा स्तरावर १० लाख, ७ लाख आणि ३ लाख अशी पारितोषिके आहेत. हा तिसरा टप्पा शाळांमधील २ स्पर्धात्मक गुणवत्ता आणि सौंदर्यवर्धन या दोन्ही बाबींना गती देईल असा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे. अभियान राबविण्याचे उद्दिष्ट शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच आरोग्य, पर्यावरण, क्रीडा आणि सामाजिक बांधिलकीबाबत जागृती निर्माण करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासास चालना देणे, हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# डॉ.मनीष गवई दुसऱ्यांदा करणार आंतरराष्ट्रीय स्तरावर इंडो थाय युवा सांस्कृतिक महोत्सवाचे नेतृत्व

**अमरावती प्रतिनिधी**

अमरावती हा सांस्कृतिक कला वैभव असलेला जिल्हा असुन या जिल्हयातील अनेक कलावंतानी येथील सांस्कृतिक वैभवाचे जतन केले आहे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली कला देखील सादर केलेली आहे. त्यातुनच ०१ ते ७ नोव्हेंबर २०२४ या दरम्यान थायलंड येथे आयोजित करण्यात आलेल्या अंतरराष्ट्रीय इंडो थाय युवक सांस्कृतिक महोत्सवा करीता अमरावतीतील टिम झेनिथच्या कलावंताची निवड करण्यात आली असुन या महोत्सवाचे नेतृत्व अमरावतीचे सुपुत्र तथा भारत सरकार क्रीडा व युवक कल्याण विभागाचे राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा अंतर्राष्ट्रीय सार्क संघटनेचे युवा दूत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी राज्यपाल नामित सिनेट सदस्य तसेच महाराष्ट्र शासनाचे विशेष कार्यकारी अधिकारी व महाराष्ट्र शासनाच्या राज्य युवा धोरणाचे विशेष निमंत्रित सदस्य डॉ. मनीष शंकरराव गवई करणार असून तसे अधिकारिक निमंत्रण थायलंड राजदूत व भारत सरकारच्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्यावतीने डॉ गवई यांना प्राप्त झाले आहे.

आगामी १ ते ५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान थायलंडच्या बँकॉक शहरात होऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक युवा महोत्सवाकरीता अमरावतीचे युवा कलावंत तसेच महाराष्ट्रातील युवा कलाकार या महोत्सवात भाग घेणार आहेत. या महोत्सवाचा उदघाटन डॉ. चैतन्य प्रकाश योगी संचालक, स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र भारतीय दूतावास, बँकॉक हे करणार असून या प्रसंगी श्री पॉल नरुला 'पॉमथेप श्रीनरुला'अध्यक्ष इंडो थाई बिझनेस कनेक्ट थायलंड, श्री पीटर सोंबूनचा आरोईन कौन्सुलेट जनरल, श्री. एस. सिन्हा रॉय रिॲलिटी स्पेसिलिस्ट थायलंड हे करणार आहेत.

या आंतरराष्ट्रीय महोत्सवा दरम्यान या कलावंताना थायलंड येथील राजदुत कार्यालयात आपली कला सादर करण्याचे विशेष निमंत्रण प्राप्त झाले असुन त्यासाठी भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद यांचे देखील विशेष सहकार्य लाभले आहे. महाराष्ट्रातील कलाकार आपली कला भारताच्या बाहेर थायलंडच्या भुमी मध्ये सादर करण्यात येणार आहे. यासाठी टिम झेनिथची आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक समुहाची टिम तयार झाली असुन या निवड झालेल्या टिमचे नेतृत्व टिम झेनिथचे सांस्कृतिक प्रमुख मिथील कळंबे हे करणार असून संघात प्रिती जाधव. कमलाकर मरघडे, सायली वर्धे, डॉ. चंदा भाकरे, अंजली पाटील, समिक्षा वऱ्हाडे, पल्लवी वर्धे,अनिता वर्धे , कृती मुखिया, डॉ सविता पोटदुखे, सम्राट सिंघाई या कलाकारांचा सहभाग असणार आहे यासोबतच या महोत्सवात आंतरराष्ट्रीय स्तरावर युवा आदान प्रदान कार्यक्रमाचे नेतृत्व दुसऱ्यांदा भारत सरकारचे राष्ट्रीय पुरस्कारार्थी डॉ मनिष गवई हे करणार आहेत. सर्व सहभागी कलावंतांना टिम झेनीथच्या वतीने प्रशस्ती पत्र देवून थायलंड येथील राजदुतांच्या हस्ते सन्मानीत करण्यात येणार आहे.

विशेष बाब म्हणजे त्याना युवक कल्याण क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानासाठी सहा अंतर्राष्ट्रीय, एकविस राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत ज्यात त्याना आंतरराष्ट्रीय यूथ लीडरशिप अवार्डने देखील सनमानित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हा सन्मान प्राप्त करणारे ते सर्वात कमी वयाचे युवक आहेत. त्यांच्या भरीव कामगिरीसाठी सदस्यत्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या या विशेष निवड़ीसाठी त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. पुन्हा एकदा डॉ. मनीष गवई यांच्या रूपाने अमरावतीचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकले आहे.

# श्री गोपाळकृष्ण मंदिरात ४ ते ९ नोव्हे.दरम्यान आनंदोत्सव सोहळा

## मंदिराच्या नूतन वास्तू संकल्प सिद्धीनिमित्य विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अंबापेठ येथील सुप्रसिद्ध श्री गोपाळकृष्ण मंदिराच्या नूतन वास्तू निर्माण सिद्धी प्रित्यर्थ येत्या ४ ते ९ नोव्हेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सद्गुरू श्री ताईमहाराजव्दारा अंबापेठ येथे संस्थापित श्री गोपाळकृष्ण मंदिर अनेक भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मंदिराची नूतन वास्तू पूर्णत्वास आल्याने कार्तिक शुद्ध चतुर्दशी ते कार्तिक वद्य पंचमी दरम्यान म्हणजे मंगळवार ४ नोव्हें. ते रविवार ९ नोव्हेंबर पर्यंतच्या आनंदोत्सवाची कार्यपत्रिका मंदिर ट्रस्टतर्फे जारी करण्यात आली, त्यानुसार मंगळवार ४ नोव्हेंबरला ४ ते ७ आनंदोत्सवाचा शुभारंभीय सोहळा होईल. अंजनगाव सुर्जी येथील श्रीनाथपीठाचे पीठाधीश प.पू.संत श्री. जितेन्द्रनाथ महाराज आनंदोत्सवाचे उद्घाटक म्हणून तर संत श्री.सचिनजी देव महाराज कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत.

७.१५ ते ९.१५ पर्यंत सुप्रसिद्ध किर्तनकार चारूदत्त आफळे महाराज यांचे मंगलाचरणाचे किर्तन होईल व शेजआरतीने कार्यक्रमाची समाप्ती होईल. तत्पूर्वी सकाळी ६.३० ते ७.३० प्रातःकालीन प्रार्थना व स.१० ते ११.३० नाथसखा उपासना मंडळाची पारंपरिक उपासना आराधना होईल.

धार्मिक कार्यक्रमाची सुरुवात स.६.३० वाजता प्रातःकालीन आराधनेने होईल. सकाळी ९ ते ११ दरम्यान पुणे येथील अवंतिका टोळे यांचे किर्तन व स.११.१५ ते १.१५ पर्यंत भागवतकार शाम देशपांडे यांच्या आयोजकत्वाखाली प्रश्नमंजुषेचे सादरीकरण होईल. दु.४ ते ६ राजेन्द्रबुवा वानखडे यांचे वारकरी किर्तन व सायं.७ ते ९ नागपूर येथील आनंदभाऊ देशमुख व संच गानसेवा सादर करतील.

गुरुवार ६ नोव्हे. ला स.६.३० वाजता प्रातःकालीन आराधना, स. ९ ते ११ आनंदबुवा जोशी डोंबिवली यांचे किर्तन, स.११.१५ ते १.१५ राहुलबुवा गणोरकर, नागपूर यांचे किर्तन, दु ४ ते ६ विवेक घळसासी, नागपूर यांचे किर्तन, सायं ७.१५ ते ९.१५ श्री.बोडे बंधू यांच्या हेमंत नृत्यकला मंदिरतर्फे नृत्यसेवा सादरीकरण व रात्री ९.३० शेजारती अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी स.६.३० ते ७.३० प्रातःकालीन आराधना, स.९.३० ते १०.३० मंदाकिनी गंधे यांचे प्रवचन, स.११ ते १ दिगंबरबुवा नाईक, नागपूर यांचे किर्तन, दु.४ ते ६ पूज्य वैदिकांचे श्रीमुखाने मंत्रज, सायं ६ ते ६.३० मंदिर आरती, सायं ६.३० ते ८ प्रमोद महाराज जगताप यांचे प्रवचन, सायं.८.१५ ते ९.३० निरंजनानंद महाराज (धनंजय शास्त्री वैद्य), राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय धर्मसभा, वसई यांचे प्रवचन होईल व रात्री ९.३० शेजारतीने दिवसाच्या धार्मिक कार्यक्रमांची सांगता होईल.

शनिवार दि.८ रोजी स.६.३० ला प्रातःकालीन आराधना , स.७.३० ते ८ दरम्यान श्री.गंधे यांच्या अंबापेठ येथील निवासस्थानावरून सद्गुरू श्री समर्थ रामदास स्वामी , सज्जनगड आणि सद्गुरू श्री प्रल्हाद महाराज , साखरखेर्डा यांच्या चरणपादुकांचे मंदिरात शोभायात्रेने शुभागमन , स्वागत व पूजनादिक , स.८.३० ते १०.३० मान्यवर विद्वतजनांचा संतांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा व विद्यावाचस्पती स्वानंद पुंड महाराज यांचे सत्काराला प्रातिनिधिक स्वरूपात उत्तररूप प्रवचन, स.११ ते १ गुरूवर्य चैतन्य महाराज देगलुरकर यांचे प्रवचन, दु.१.१५ ते १.३० चैतन्य महाराज यांच्या शुभहस्ते अन्नकूट झाकी व श्री गोपाळ कृष्णाची भोजन झाकी यांचे उद्घाटनपर पूजन, सायं.५.३० ते ९.३० पर्यंत संतपूजन सोहळ्यांतर्गत विविध कार्यक्रम, रात्री ९.३० शेजारती असे कार्यक्रम होतील. रविवार ९ नोव्हेंबर रोजी स. ६.३० प्रातःकालीन आराधना, स.९ ते ११.३० सोपान गोडबोले यांचे काल्याचे किर्तन व 'कल्याणकारी रामराया' प्रार्थनेने आनंद उत्सवाची सांगता होईल. दुपारी १२.३० नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात घ्यावा असे आवाहन प.पू.मंदाताई गंधे , उत्सव प्रमुख श्री.रमेशराव डांगे व संपूर्ण विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

बाहेरगावावरून येणाऱ्या भाविकभक्तांसाठी निवासस्थान व भोजनाची व्यवस्था मंदिर ट्रस्टमार्फत निःशुल्क करण्यात आली आहे.

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे पोलादी व धारदार व्यक्तीमत्व

गुजरात मधील नडियाद येथे ३१ ऑक्टोबर १८७५ ला सरदार वल्लभभाई पटेल नावाचा लोहपुरुष जन्माला आला आणि भारतीय राजकारणात एक पोलादी धारदार व्यक्तीमत्व उदयास आले. कारण त्यांनी देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताला एकसंघीकरण करण्यात मोलाचे योगदान दिले त्यामुळेच त्यांना लोहपुरुष व सरदार ही सर्वोच्च मानाची उपाधी मिळाली. पटेलांनी गुजरातच्या खेडा, आनंद जिल्ह्यातील बोरसद आणि सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यातील संपूर्ण ग्रामवासियांना संघटित करून त्यांनी इंग्रज अत्याचाराच्या विरूद्ध मोठा लढा उभारून सत्याग्रह केला.या सत्याग्रहानंतर प्रभावशाली नेता म्हणून गुजरातसह संपूर्ण भारतात त्यांची गणना होवू लागली.अशा परिस्थितीत त्यांनी मागे फिरून न पहाता एक पाऊल पुढे टाकून स्वतंत्र पुर्वकाळात व स्वातंत्र्योत्तर काळात मोलाची भुमिका बजावली व इंग्रजांशी लोहा घेण्याची शपथ घेतली.आज आपण त्यांच्या कामांचे अनुकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.कारण वल्लभभाई पटेल यांनी कठोर परिश्रमाने आणि मोठ्या शिताफीने भारत पाकिस्तान फाळणी नंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर शांतता स्थापन करण्यासाठी मोठी मोलाची भुमिका बजावली व हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे भारतात विलीनीकरण करून घेणे हे भारतासाठी महान आणि मोलाचे कार्य पटेलांनी केले. हे कार्य जोपर्यंत सुर्य-चंद्र,आकाश-पाताळ आहे. तोपर्यंत कोणीही विसरणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यांच्यातील मुत्सद्देगिरी, कठोरपणा व वेळ पडल्यास सैन्यबळ वापरून सरदारांनी संस्थाने भारतात विलीन केले आणि म्हणूनच ते भारताचे 'लोहपुरुष' म्हणून ओळखले जातात.त्याच्या या महान कार्यामुळे आपण समजू शकतो की भारताची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी त्यांचे किती मोठे मोलाचे योगदान आहे हे दिसून येते.सरदार पटेल यांची कार्यशैली व देशासाठी दिलेले मोलाचे योगदान पहाता महात्मा गांधींनी सरदार वल्लभभाई पटेल यांना लौहपुरूष ही मोठी उपाधी दिली.त्यांची आठवण निरंतर भारतीयांच्या हृदयात रहावी या उद्देशाने गुजरात मधील नर्मदा येथील सरदार सरोवर बांधच्याजवळ सरदार वल्लभभाई पटेल यांची १८२ मीटर (५९७ फुट) उंच धातुंची प्रतिमा बनवीण्यात आली ही प्रतीमा 'स्टॅच्यु ऑफ युनिटी' म्हणून जगप्रसिद्ध आहे. याठीकानी जगातील अनेक पर्यटक येवून आपली हजेरी लावतात ही देशासाठी मोठी गौरवास्पद बाब आहे.पटेलांनी देशाला एकत्रित बांधण्याकरीता नेहमीच कसोटीचे प्रयत्न केले. त्यामुळे लौहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून संपूर्ण भारतभर साजरी केली जाते. स्वतंत्रपुर्वकाळात प्रत्येक व्यक्ती देशासाठी बलिदान देण्यास तयार होते.त्यांच्यामुळेच आज आपण मोकळा श्वास घेत आहोत.लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करतांना राजकीय पुढारी, प्रशासन, सामाजिक संघटना यांनी त्यांची आठवण म्हणुन आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून जयंती साजरी करावी.कारण देशात वाढते बदलते हवामान व प्रदुषण यावर आळा घालण्याचे काम



वृक्षलागवडीच्या माध्यमातूनच होवू शकते. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर हि आठवण निरंतर काळापर्यंत राहील व प्रत्येक झाडात, पाणात,फुलात,फळात व मुळांमध्ये आपल्याला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचे अनुकरण होईलच सोबतच दर्शन सुध्दा अवश्य अवगत होईल. सरदार वल्लभभाई पटेलांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन

**रमेश लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# 'राष्ट्रीय एकता दिवस '

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई झवेरभाई पटेल यांचा जन्म गुजरातमधील नाडियाद येथे १८७५ सालातील ऑक्टोबर महिन्याच्या एकतीस तारखेला झाला. ते भारतीय स्वातंत्र्या लढ्यातील एक प्रमुख नेते आणि भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री होते.त्यांना 'भारताचे लोहपुरुष' म्हणून ओळखले जाते. त्यांचे वडील झवेरभाई पटेल हे झाशीच्या राणीच्या सैन्यात होते, तर आई लाडबा गृहिणी होत्या. त्यांनी वकिलीचे शिक्षण घेतले आणि कायद्याचा अभ्यास करण्यासाठी ते इंग्लंडला गेले. इंग्लंडहून परतल्यावर त्यांनी अहमदाबाद येथे वकिली सुरू केली व त्यात ते यशस्वी झाले 'राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता.

सरदार वल्लभभाई पटेल यांची सर्वात मोठी आणि महत्त्वाची कामगिरी म्हणजे ५६२ हून अधिक लहान-मोठ्या संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण करणे.त्यांनी कोणत्याही रक्तपाताशिवाय, आपल्या मुत्सद्देगिरीने आणि दृढनिश्चयाने हे प्रचंड कार्य पूर्ण केले. जुनागढ,हैदराबाद आणि काश्मीरच्या प्रश्नांवर त्यांनी महत्त्वाची भूमिका घेतली होती. हैदराबाद संस्थानाला भारतात विलीन करण्यासाठी त्यांनी 'ऑपरेशन पोलो' ही पोलीस कारवाई केली. एकसंघ आणि मजबूत भारत निर्माण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.त्यांनी भारतीय प्रशासकीय सेवा आणि भारतीय पोलीस सेवा यांसारख्या अखिल भारतीय सेवांची स्थापना केली. याच कारणामुळे त्यांना भारताच्या प्रशासकीय सेवांचे जनक' असेही म्हटले जाते . त्यांचे विचार अत्यंत स्पष्ट आणि परखड होते.त्यांच्या दृढ निश्चयी स्वभावामुळे त्यांना 'लोहपुरुष' हे नाव मिळाले.दि.१५ डिसेंबर १९५० रोजी त्यांचे मुंबईत त्यांचे निधन झाले.त्यांच्या महान कार्यासाठी त्यांना १९९१ मध्ये भारतरत्न (मरणोत्तर) या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरी केली जाते. गुजरातमध्ये नर्मदा नदीच्या काठी त्यांचे भव्य 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' उभारले आहे. हे जगातील सर्वात उंच पुतळ्यांपैकी एक आहे आणि ते भारताच्या एकात्मतेचे प्रतीक आहे. सरदार पटेल हे राष्ट्र निर्माते आणि आधुनिक भारताचे शिल्पकार मानले जातात.

हा राष्ट्रीय एकता दिवस देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता मजबूत करण्याच्या उद्देशाने संपूर्ण भारतात पाळला जातो.राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यासाठी काही उपक्रम महत्त्वाचे आहेत. या दिवशी 'रन फॉर युनिटी' चे आयोजन करण्यात येते. मोठ्या प्रमाणावर एकता दौड आयोजित केली जाते. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिक उत्साहाने सहभागी होतात.या एकता दौडीचा मुख्य उद्देश एकतेचा संदेश सर्वदूर पोहोचविणे हा आहे. या दिवशी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली जाते.शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि इतर संस्थांमध्ये राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त एकतेची प्रतिज्ञा (शपथ) घेतली जाते.या शपथेमध्ये देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता राखण्याची तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दूरदृष्टीने प्रेरित होऊन देशाच्या आंतरिक सुरक्षेसाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा घेतली जाते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात येते.त्यांच्या योगदानावर आधारित भाषणे, परिसंवाद आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात, ज्यामुळे 'विविधतेत एकता' हा संदेश अधिक वृद्धिंगत होतो. प्रत्येक राज्याच्या राजधानीत 'एकता मॉल' उभारण्यास प्रोत्साहन देणे,जिथे विविध राज्यांची उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील. राष्ट्रीय एकता दिवस साजरा करणे हे केवळ एक औपचारिकता नसून सरदार पटेलांनी देशासाठी पाहिलेल्या अखंड आणि सशक्त भारताच्या स्वप्नाची आठवण ठेवण्याची आणि त्या दिशेने कार्य करण्याची एक बांधिलकी आहे. राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देशातील लोकांमध्ये ऐक्य आणि बंधुत्वाची भावना निर्माण करते. जी त्यांना धर्म,जात,भाषा किंवा प्रादेशिक भेद विसरून एकत्र आणते. राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यासाठी युवक विविध उपक्रम करू शकतात. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर आधारित निबंध लेखन,भाषणे किंवा चित्रकला स्पर्धांमध्ये त्यांनी भाग घ्यावा. एकतेचे महत्त्व सांगणारी पथनाट्ये किंवा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करावी. 'रन फॉर युनिटी' मध्ये सक्रीयपणे सहभागी व्हावे. या उपक्रमांनी युवकाना एकतेचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजेल. राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना १५० व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**प्रा.अरुण बुंदेले,**
अमरावती
८०८७७४८६०९

# एकसंघ भारताचे शिल्पकार-सरदार वल्लभभाई पटेल

भारताच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत ज्यांनी राष्ट्राचे भविष्य घडवले आणि त्यांच्या कार्याचा ठसा अमिट राहिला. भारताचे लोहपुरुषम्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल हे अशा व्यक्तिमत्त्वांपैकी एक. त्यांनी देशाचे राजकीय एकत्रीकरण केले, राष्ट्रीय एकात्मतेची भक्कम पायाभरणी घातली आणि भारताला खऱ्या अर्थाने 'एक राष्ट्र' बनवले.

संस्थाने आणि अखंड भारताची निर्मिती स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात तब्बल ५६५ संस्थाने होती. प्रत्येक संस्थानाचे स्वतंत्र प्रशासन, सेना, चलन आणि कायदा होता. त्या काळात फाळणीमुळे देशात अस्थिरता, हिंसा आणि अनिश्चितता पसरली होती. अनेक संस्थाने स्वतंत्र राहण्याचा विचार करत होती. अशा गुंतागुंतीच्या आणि संकटग्रस्त काळात, सरदार पटेल यांनी दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी आणि अढळ निर्धार यांच्या बळावर या सर्व संस्थानांचे विलिनीकरण साधले. हैदराबाद, जूनागढ, त्रावणकोर यांसारखी मोठी संस्थाने भारतात सामील करणे हे अत्यंत कठीण काम होते. पण सरदारांच्या कणखर नेतृत्वाने आणि व्यवहारकुशलतेने हे शक्य झाले.



त्यांनी 'राज्य एकसंघ नसल्यास राष्ट्र मजबूत होत नाही' हे तत्त्व प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले.काश्मीर संस्थानाने विलिनीकरणात उशीर केल्याने पाकिस्तानने तिथे आक्रमण केले आणि काही भाग आजही पाकव्याप्त आहे. हे सरदारांना अतिशय दुःखद वाटले, कारण त्यांनी नेहमीच स्पष्ट सांगितले होते. 'राष्ट्रहितासाठी मृदूता नव्हे, दृढता आवश्यक आहे.' त्यांच्या निर्णयक्षमतेमुळे भारत आज अखंड स्वरूपात उभा राहू शकला, आणि म्हणूनच त्यांना 'अखंड भारताचे शिल्पकार' म्हणणे सार्थ ठरते.स्वातंत्र्यपूर्व लढ्यातील योगदान सरदार पटेलांचा राजकीय प्रवास शेतकऱ्यांपासून सुरू झाला. ब्रिटिशांनी शेतकऱ्यांवर अन्यायकारक कर लादल्यावर त्यांनी गुजरातमध्ये बारडोली सत्याग्रह उभारला. या संघर्षात शेतकऱ्यांना मिळालेला विजय भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा प्रेरणादायी टप्पा ठरला. त्यांच्या या पराक्रमामुळे महात्मा गांधींनी त्यांना 'सरदार' ही पदवी बहाल केली.ते केवळ राजकारणी नव्हते, तर समाजातील दुर्बल घटकांचे आधारस्तंभ होते. गुजरातमधील शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसणारा नेता म्हणून लोकांनी त्यांच्याकडे पाहिले. गृहमंत्री म्हणून अभूतपूर्व कामगिरी-स्वातंत्र्यानंतर ते भारताचे पहिले गृहमंत्री झाले. संस्थानांचे विलीनीकरण, पोलिस व प्रशासन यंत्रणेची उभारणी, आणि निर्वासितांचे पुनर्वसन या सर्व क्षेत्रांत त्यांनी विलक्षण कामगिरी केली. त्यांनी कठोर निर्णय घेतले, पण माणुसकी कधीच विसरले नाहीत. निर्वासितांना आधार देताना त्यांनी केवळ शासनकर्त्याची नव्हे तर समाजसेवकाची भूमिका पार पाडली. त्यांच्या कार्यपद्धतीत शिस्त, निर्णयक्षमता आणि प्रामाणिकता यांचा संगम होता.

**स्टॅच्यू ऑफ युनिटी – एक जिवंत प्रतीक** - आज गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी — जगातील सर्वात उंच पुतळा — हा केवळ शिल्पकला नसून भारताच्या एकात्मतेचे सजीव प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या स्मारकाद्वारे देशवासीयांना सरदार पटेलांच्या विचारांची पुनःस्मृती करून दिली आहे. हे स्मारक म्हणजे राष्ट्रीय आत्मविश्वास आणि अखंडतेचे प्रतीक आहे. पटेलांचे दूरदृष्टीपूर्ण विचार सरदार पटेलांना वाटत होते की लोकशाही ही शिस्तबद्ध स्वातंत्र्याची प्रणाली आहे. प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखून वागले, तरच राष्ट्राची ताकद वाढते. त्यांच्या मते, शासनात स्थैर्य, निर्णयक्षमता आणि पारदर्शकता या तीन गुणांशिवाय प्रगती शक्य नाही. ते नेहमी म्हणत,'देश एकसंघ ठेवायचा असेल, तर जनतेत परस्पर विश्वास, प्रामाणिकपणा आणि परिश्रमाची भावना निर्माण करावी लागेल.'आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत त्यांच्या विचारांची प्रासंगिकता अधिकच जाणवते. लोकशाही टिकवायची असेल, तर देशहिताला वैयक्तिक हितापेक्षा प्राधान्य देणे, जबाबदारीची जाणीव ठेवणे आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करणे हेच पटेलांचे खरे धडे आहेत.

### आजच्या भारतासाठी प्रेरणा

आज भारत आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहे. मात्र या प्रगतीचा पाया फक्त विकास नव्हे, तर एकात्मता, निर्णयक्षमता आणि देशप्रेम यात आहे आणि हीच त्रिसूत्री सरदार पटेलांनी आपल्या कार्यातून घडवून ठेवली.त्यांच्या विचारांमधून आजही नेतृत्व आणि प्रशासकीय जबाबदारीसाठी प्रेरणा मिळते.त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने आपण ठरवू या — विभाजन नव्हे, एकात्मता; द्वेष नव्हे, विश्वास; आणि राजकारण नव्हे, राष्ट्रकारण या मार्गावर आपण चालू.सरदार पटेल हे फक्त भारताचे गृहमंत्री नव्हते, ते होते अखंड भारताचे शिल्पकार, ज्यांनी भारतीय जनतेला आत्मविश्वास, संघटनशक्ती आणि राष्ट्रप्रेम दिले.त्यांच्या जयंतीनिमित्त या लोहपुरुषास विनम्र अभिवादन आणि मानाचा मुजरा!



**अमिता**
**दिलीप नाफडे**

# सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. या वर्षी त्यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने हा दिवस भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे. हा दिवस भारताच्या एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकजुटतेचे प्रतीक असून, ५६२ संस्थान एकत्रित येऊन आधुनिक भारताची पायाभरणी करणाऱ्या सरदार पटेलांच्या अद्वितीय कार्याला अभिवादन करणार आहे.

एकतानगर येथे भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम या वर्षीचा उत्सव नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम असणाऱ्या गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकतानगर येथे आयोजित केला जाणार आहे. हे ठिकाण 'विविधतेत एकता' या भारताच्या संकल्पनेचे प्रतीक म्हणून निवडले गेले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे केंद्रीय सशस्त्र पोलीस दल राज्य पोलीस दल आणि राष्ट्रीय कॅडेट कोर यांच्या सहभागाने भव्य परेड आणि सांस्कृतिक उत्सव आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय कॅडेट्स कोर आणि शालेय बँड यांचे सादरीकरण या परेडमध्ये सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, भारत-तिबेट सीमा पोलीस, सशस्त्र सीमा बल तसेच आसाम, त्रिपुरा, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या पोलीस दलांचा सहभाग असेल. घोडदळ आणि उंटदळाचे संच, स्वदेशी जातींच्या श्वानांचे कौशल्य प्रदर्शन, मार्शल आर्ट सादरीकरणे आणि शस्त्रविरहित युद्धकौशल्याची प्रात्यक्षिके या परेडची शोभा वाढवतील.महिला सक्षमीकरणावर विशेष भर देत, प्रधानमंत्री यांना दिल्या जाणाऱ्या गार्ड ऑफ ऑनरचे नेतृत्व एक महिला अधिकारी करतील. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल आणि केंद्रीय राखीव बल च्या महिला कर्मचाऱ्यांकडून मार्शल आर्ट आणि युद्धकौशल्याचे प्रभावी प्रदर्शन सादर केले जाईल. याद्वारे त्यांचे शौर्य, शिस्त आणि आत्मविश्वास प्रकट होईल. राष्ट्रीय सुरक्षेत विशेष योगदान दिले आहे असे रामपूर हाउंड आणि मुधोल हाउंड हे स्वदेशी श्वान आपली कौशल्ये सादर करतील. विशेष म्हणजे, अखिल भारतीय पोलीस श्वान स्पर्धेत विजेती ठरलेली 'मुधोल हाउंड रिया' या वर्षीच्या परेडमध्ये डॉग स्क्वाडचे नेतृत्व करेल. याशिवाय, गुजरात पोलिसांचे घोडदळ, आसाम पोलिसांचा मोटरसायकल डेअरडेव्हिल शो, सीमा सुरक्षा बल चे उंटदळ आणि उंट बँड, तसेच एनसीसी कॅडेट्स आणि शालेय बँड 'एकतेतच शक्ती आहे' हा संदेश देत परेडमध्ये सहभाग घेतील. भारतीय वायुदलाच्या सूर्यकिरण पथकाकडून सादर होणारा भव्य एअर शो या परेडच्या भव्यतेत आणखी भर घालेल.

'विविधतेत एकता' संदेश देणारे संचलन-राष्ट्रीय एकता दिनी परेडमध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे संचालन 'विविधतेत एकता' या विषयाचे दर्शन घडवतील.या संचालनात राष्ट्रीय सुरक्षा गार्ड, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, अंदमान-निकोबार बेटे, मणिपूर, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुदुचेरी यांच्या संचालनाचा समावेश असेल.यासह सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, सशस्त्र सीमा बल, दिल्ली पोलीस आणि विविध राज्य पोलीस दलांचे ब्रास बँड कार्यक्रमाच्या उत्सवी वातावरणात अधिक रंग भरतील.या परेडमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल चे पाच शौर्यचक्र विजेते आणि सीमा सुरक्षा बल चे १६ वीरता पदक विजेते सन्मानित केले जातील. या शूर जवानांनी नक्षलविरोधी आणि दहशतवादविरोधी मोहिमांमध्ये, तसेच पश्चिम सीमेवरील 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान, अद्वितीय धैर्य आणि पराक्रमाचे प्रदर्शन घडविले आहे. परेडसोबतच भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ९००



कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण करतील, ज्यातून भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि विविधतेतील सौंदर्य अधोरेखित होईल.राष्ट्रीय एकता दिनाचे उद्दिष्ट नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता, सौहार्द आणि देशभक्तीची भावना दृढ करणे हे आहे. हा उत्सव प्रत्येक भारतीयाला या मूल्यांचा स्वीकार करण्यासाठी आणि देशाच्या ऐक्याच्या भावनेला बळ देण्यासाठी प्रेरित करतो. १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एकतानगर येथे 'भारत पर्व' आयोजित करण्यात येईल. या पर्वात संपूर्ण भारतातील सांस्कृतिक सादरीकरणे आणि खाद्य महोत्सव आयोजित केला जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध परंपरांचा संगम पाहायला मिळेल. या पर्वाचा समारोप १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करून केला जाईल.

**- वर्षा फडके-आंधळे**

# आभाळमाया-सौर संकुल!

सध्या तळपत्या उन्हाचे चटके बसत असले तरी ४ अब्ज ५६८ कोटी वर्षांपूर्वी निर्माण झालेला 'हिरण्यगर्भ' किंवा सूर्य हाच आपला जीवनदाता आणि त्राता आहे हे लक्षात ठेवायला हवे. 'ऑक्टोबर हीट'ने काहिली करणारा सूर्य हे आपले त्याबाबतचे निरीक्षण. एरवी, स्वतः सूर्याला त्याची 'जाणीव' असण्याचे कारणच नाही. कारण, एकूणच विराट निसर्ग निर्हेतुक असतो. त्याला आपण आपल्या पद्धतीने पाहतो. 'नेमेचि येतो मग पावसाळा' ही कविता होईपर्यंत, पाऊस 'नियमित' येत होता तो आपल्या पॅलेंडरनुसार. आता पृथ्वीवरच्या वातावरणात काही नैसर्गिक तर अनेक कृत्रिम कारणांनी पावसाचा 'नेम' चुकत चाललाय. तो इतका की, 'पाऊस कधी येईल नि जाईल याचा काही नेम (म्हणजे नियम) नाही,' असे म्हणायची वेळ आली आहे.



त्याचप्रमाणे दरवर्षी उन्हाळा 'जास्तच' होतोय म्हणत जग गेली पंचवीस-तीस वर्षे सुस्कारे टाकतंय. कधी नव्हे त्या इंग्लंडपासून कॅनडापर्यंत 'हीट वेव्ह' जाणवतायत. उन्हाच्या वाढत्या झळा आणि 'ग्लोबल वॉर्मिंग'ची गरमागरम चर्चा तेवढीच रंगतेय.पृथ्वीपासून १५ कोटी किलोमीटर अंतरावर असलेला सूर्य मात्र 'मुद्दाम' काहीच करत नाही. अंतर्यामी किंवा गाभ्यातील हायड्रोजनचे हिलियम वायूत रूपांतर करणारी प्रचंड क्षमतेची नैसर्गिक 'अणुभट्टी' बाळगून असलेला सूर्य त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांमुळे चर्चेत येतो. सौरवारे, सौरज्वाला, सौर-प्रारणे आणि त्यांची नैसर्गिकरीत्या कमी-अधिक प्रभावाची चक्रे. हा अभ्यासकांसाठी चिंतनाचा आणि सर्वसामान्यांसाठी माणसासह सर्व सजीवांसाठी अनेकदा चिंतेचा विषय ठरतो.

या वेळी एक गोष्ट आपल्या क्वचितच लक्षात येते ती म्हणजे, कधी कधी 'तापदायक' वाटणाऱ्या सूर्यापासून आपण पृथ्वीवासीय अत्यंत योग्य अंतरावर आहोत, म्हणूनच 'आहोत.' आपल्या अस्तित्वाचे आणि तत्पूर्वी निर्मितीचंही गणित ज्या योगायोगातून ठरले आहे ते सौर-संकुलातले आपले 'वसाहतयोग्य' (हॅबिटेबल) स्थान.मग प्रश्न येतो की, सूर्यापासून इतर सर्व ग्रहांची नेमकी अंतरे आणि तिथे सूर्यकिरणांचा 'प्रभाव' आपल्या पृथ्वीपेक्षा किती निराळा असेल? पुन्हा सोप्याच शब्दात जाणून घेऊ या. सूर्याभोवती फिरणाऱ्या आठ मान्यताप्राप्त ग्रहांसह बनलेल्या सौर संकुलात इतरही अनेक घटक आहेत. त्यांची अतितप्त वायगोळापासूनची (लोहगोल नव्हे) अंतरे किती? आणि कोणतीही आदळआपट न होता हे सर्व ग्रह या तेजोनिधीभोवती सुखेनैव कसे फिरतायत?या सर्व ग्रहांमधल्या आणि लघुग्रह, उपग्रह, अशनी, अशनी पट्टे वगैरेंसह साकारलेल्या सौर संकुलातील जागा आंतरग्रहीय माध्यमाने म्हणजे सुक्ष्मकण आणि धुळीने भरलेली आहे.

बुध हा सूर्याच्या सर्वात जवळचा म्हणजे त्यापासून ५ कोटी ९० लाख किलोमीटरवरचा 'दगडी'ग्रह. त्यानंतरच्या 'उलट' गतीने स्वतःभोवती फिरणाऱ्या शुक्राचे सूर्यापासूनचे अंतर १० कोटी ८२ लाख किलोमीटर. त्याचा दिवस त्याच्या वर्षापेक्षा मोठा असतो हे त्याचे आणखी एक विस्मयकारी वैशिष्ट्य. पृथ्वी हा सूर्यापासून १४ कोटी ९६ लाख किलोमीटर अंतरावर असलेला आणि आतापर्यंत आपल्याला ज्ञात असलेला विश्वातला एकमेव 'सजीव' आणि 'नील'ग्रह. पृथ्वीसारखे वातावरण, जीवसृष्टी अन्यत्र कोठे आहे का, याचा निश्चित पत्ता लागलेला नाही. मंगळावर किंवा गुरूच्या उपग्रहांवर अथवा अन्य कोण्या ताऱ्याभोवती फिरणाऱ्या एखाद्या ग्रहावर 'पाणी' सापडल्याच्या बातम्या येतच असतात. त्यातील काही ठिकाणी पाणी आणि बर्फ आहे हे खरंच, परंतु किमान प्रगत सजीव असल्याचंही निष्पन्न झालेले नाही मग अतिविकसित जीवसृष्टीची गोष्ट दूर राहिली.

बहुचर्चित मंगळ सूर्यापासून २२ कोटी ७९ लाख किलोमीटरवर असून या 'लाल' ग्रहाभोवती अनेक कथा आणि कविकल्पनांची गुंफण झाली आहे. मंगळापलीकडचा गुरू सूर्यापासून ७७ कोटी ८३ लाख किलोमीटर अंतरावर असून त्याच्या सुमारे ९९ उपग्रहांपैकी मोठय़ा उपग्रहांवर पाणी आणि सूक्ष्म सजीव असल्याचे म्हटले जाते. ज्याच्या भोवतीची कडी किंवा वलयांची चर्चा १६०९ पासून होतेय तो मोहक शनी ग्रह सूर्यापासून १ अब्ज ४२७ कोटी किलोमीटर दूर आहे. त्याचा उपग्रह 'टायटन'विषयी आपण वाचलंय. शनीपलीकडचा युरेनस २ अब्ज ८७१ कोटी किलोमीटरवर असून त्याच्या नव्वद अंशाच्या कलत्या अक्षामुळे तो सूर्याभोवती 'गडगडत' असल्यागत फिरतो! आणि अखेरचा नेपच्युन हा ग्रह सूर्यापासून ४ अब्ज आणि ४९७ कोटी किलोमीटर अंतरावरून फिरत असून त्याचा उपग्रह 'ट्रायटन' स्वतःभोवती उलटगतीने (रिट्रोगेड) कसा फिरतो तेही आपण एका लेखात जाणून घेतलंय. प्लुटोचे 'ग्रहपद' २००४ मध्ये गेल्याने तो लघुग्रह ठरला आहेष्ठ या ग्रहमालिकेपलीकडेही सूर्याचा संकुल आहेच.

# पातुर पं. स.च्या तांत्रिक सहाय्यकांना वरिष्ठांचे पाठबळ

## वृक्ष संगोपनाच्या देयकामध्ये घोळ; तक्रारींमध्ये वाढ




'शिरपूर येथे नामशेष बांबू वृक्ष लागवड तसेच तालुक्यातील अनेक ठिकाणी वृक्ष लागवडीची संख्या जास्त दाखवून देयक काढण्यात आले आहे. या संदर्भात मी तांत्रिक सहाय्यक ऋषिकेश चौधरी यांना फोनवर संपर्क साधला असता त्यांनी उद्धट वर्तन केले आणि थेट जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे मी जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून, चौधरी यांच्या निलंबनाची मागणी केली आहे. योग्य ती कारवाई न झाल्यास पंचायत समिती कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल.' **दिलीप परनाटे**, जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

■ **प्रतिनिधी | खेट्री** ■

पातुर पंचायत समितीच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत तालुक्यात वृक्ष संगोपनाच्या देयक प्रक्रियेत मोठा घोळ सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

शासनाकडून लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करूनही अनेक ठिकाणी वृक्ष लागवडच न झाल्याचे तसेच नामशेष वृक्ष लागवड दाखवून कोट्यवधी रुपयांचा गैरवापर झाल्याचे आरोप होत आहेत.

या प्रकरणात तांत्रिक सहाय्यक ऋषिकेश चौधरी यांच्याविरुद्ध सतत तक्रारी दाखल होत असून, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. उलट त्यांना वरिष्ठांचे पाठबळ मिळत असल्याचे समोर येत आहे.

शासनाच्या निधीचा अपव्यय करत कागदोपत्री वृक्ष लागवड वाढवून मजुरांच्या नावावर देयक काढल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या संदर्भात कोणी विचारणा केल्यास, तांत्रिक सहाय्यक ऋषिकेश चौधरी हे उद्धट वागणूक देऊन 'माझी तक्रार जिल्हाधिकाऱ्याकडे करा' असा सल्ला देत असल्याची माहिती समोर आली आहे.

वृक्ष संगोपनाच्या देयकामधील घोळाबाबत तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्याकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यांनी या सर्व बाबींचा अहवाल संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्याचे आश्वासन दिले आहे.

# वस्तापूर मानकरी येथे पारंपारिक आदिवासी मेळावा उत्साहात संपन्न

■ **प्रतिनिधी | अकोट** ■

सातपुड्याच्या डोंगररांगांमध्ये वसलेल्या वस्तापूर मानकरी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पांडवा पंचमीच्या मुहूर्तावर पारंपारिक आदिवासी मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याला महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि वऱ्हाडातील हजारो आदिवासी बांधवांनी उपस्थित राहून परंपरेचे सोहळ्यात रूपांतर केले.

१६९ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या मेळाव्याची परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने व उत्साहाने जपली जात आहे. पूर्वी या मेळाव्याची विशेषता म्हणजे रेड्यांच्या टकरी आणि सजवलेल्या रेड्यांचे पूजन होती. तथापि, न्यायालयाच्या आदेशानुसार आता रेड्यांच्या टकरींवर बंदी घालण्यात आली आहे. तरीदेखील, आदिवासी समाज आपली श्रद्धा व संस्कृती साजरी करण्यास उत्साहाने उपस्थित राहतो.

मेळाव्याच्या प्रारंभी आदिवासींचे कुलदैवत बिरसा मुंडा, तपस्वी क्रांतिवीर जाटू मामा आणि जेटू बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदिवासी बांधवांनी वंदन केले. या समाजपुरुषांनी आदिवासींसाठी केलेल्या कार्याचे स्मरण या दिवशी करण्यात आले. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी युवक-युवती पारंपरिक वेशभूषा परिधान करून मोठ्या संख्येने सहभागी होतात. या पारंपरिक मेळाव्यात तरुण-तरुणींच्या भेटीगाठीही घडतात — म्हणजेच आदिवासी समाजातील पारंपारिक परिचय संमेलनाची परंपरा या मेळाव्यात आजही कायम आहे.

पांडवा पंचमीच्या दिवशी हा उत्सव साजरा करण्यामागील धार्मिक श्रद्धा अशी की, त्या



■ **आदिवासी एकतेचा जागर**
■ **१६९ वर्षांची परंपरा आजही कायम**
■ **पांडवा पंचमी निमित्त यात्रेला हजारोंचा प्रतिसाद**

दिवशी पांडवांनी विजय मिळवला होता आणि त्या दिवसाचे कार्य यशस्वी होते, अशी मान्यता आहे. त्यामुळे या दिवशी आयोजित कार्यक्रमात कोणतेही विघ्न येत नाही, असा विश्वास आजही आदिवासी समाजात आहे.

मेळाव्यात गरम भजी, कचोरी यांसारख्या खाद्यपदार्थांच्या दुकानांना मोठी गर्दी होती. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांना चांगला आर्थिक लाभ झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद सरपंच संजय घिसू कासदे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून दयाराम काळे, पांडुरंग तायडे, आत्माराम ठिगर, अंभीर मोरे, सुनील वाकोडे, दयाराम काजदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिराम कासदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुरेश ढिगर यांनी मानले. या मेळाव्याद्वारे आदिवासी परंपरेचा सन्मान राखत, एकतेचा संदेश देण्यात आला. १६९ वर्षांपासून चालत आलेली ही परंपरा आजही सातपुड्याच्या डोंगररांगांत तेजाने झळकत आहे.

# गोरक्षण ही चळवळ झाली पाहिजे -उत्तम माहेश्वरी

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

आपल्या संस्कृती व परंपरेत गोमातेला मोठे महत्त्व देण्यात आले आहे.वैज्ञानिक दृष्ट्या मनुष्याच्या आरोग्य विषयक दृष्टीने ही गोमाता किती महत्वपूर्ण आहे हे आता वैज्ञानिक दृष्टीने सिद्ध झाले आहे. विज्ञानाने विकसित केलेल्या अनेक आजारांवर अक्सीर इलाज हा गोमाते पासूनच केल्या जाऊ शकतो.

म्हणून सर्व दृष्टीने गोमातेचे संरक्षण,संवर्धन करण्यासाठी ही एक सामाजिक चळवळ झाली पाहिजे अशी अपेक्षा मुंबई येथील आरोग्य वैज्ञानिक व मार्गदर्शक उत्तम माहेश्वरी यांनी व्यक्त केली.गोवंश रक्षण व संवर्धनासाठी पश्चिम विदर्भात लोकमान्यता पावलेल्या स्थानीय म्हैसपूर फाट्यावरील आदर्श गोसेवा प्रकल्प व अनुसंधान प्रकल्प येथे गुरुवारी वार्षिक गोपाष्टमी उत्सव मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला.आदर्श गोसेवा प्रकल्पचे अध्यक्ष सुभाष जैन यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या गोपाष्टमी सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून माहेश्वरी आरोग्य मार्गदर्शन करीत होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ. वसंत खंडेलवाल,उत्सव व यज्ञ यजमान गिरीश तोष्णीवाल,सौ मोनिका तोष्णीवाल,संस्थेचे सचिव प्रा विवेक बिडवई उपस्थित होते.दीप प्रजवलन व अतिथीच्या शाल श्रीफल सत्काराने या सोहळ्याचा थाटात प्रारंभ झाला.

# अकोटात विषबाधेने आठ बकऱ्यांचा मृत्यू

## लोहारी रोडवरील एमआयडीसी परिसरातील घटना; शेळीपालकांवर आर्थिक संकट

■ **प्रतिनिधी | अकोट** ■

शहरातील लोहारी रोडवरील एमआयडीसी परिसरात विषबाधेची घटना घडून आठ बकऱ्यांचा तडफडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित शेळीपालकांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देशमुख प्लॉट व परिसरातील सहा गरीब कुटुंबांच्या या बकऱ्या होत्या. रोजंदारी मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या या शेळीपालकांच्या उपजीविकेचे साधन असलेल्या बकऱ्या मृत्यूमुखी पडल्याने त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

घटनेची माहिती मिळताच पटवारी तसेच ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. बकऱ्यांचा मृत्यू नेमका कशामुळे



झाला, हे अद्याप स्पष्ट झाले नसून विषबाधेचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यात यावा आणि पीडित शेळीपालकांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अकोला :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी पात्र असलेल्या परंतु वसतीगृहातील विद्यार्थी क्षमतेअभावी शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनु.जाती व नवबौध्द प्रवर्गातील इयत्ता ११ वी व १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांचे आधार संलग्नी बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरिता शासन निर्णय दि. ६ जाने २०१७ अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजना सुरू केलेली आहे.

# अकोट ग्रामीण पोलिसांची गोवंश वाहतूक करणाऱ्या इसमावर कारवाई

## २ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त



■ **प्रतिनिधी | अकोट** ■

'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी गोवंशाची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या इसमावर कारवाई करून २ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.(घटनेविषयी अधिक माहिती अशी की, दिनांक २९ ऑक्टोबर रोजी अकोट ग्रामीण पोलिस पथक हद्दीत गस्त घालत असताना त्यांना माहिती मिळाली की, एक इसम टाटा एस (क्रमांक एमएच-०२-सीई-३०६१) या वाहनात गोवंश जातीच्या जनावरांची कत्तलीसाठी अवैधरित्या वाहतूक करीत आहे.

त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन पंचांच्या उपस्थितीत अंजनगाव रोडवरील वाई फाटा येथे नाकाबंदी केली. त्यावेळी संबंधित वाहन थांबवून तपासणी केली असता, आरोपी मोहम्मद तौफीक मोहम्मद याकुब (वय २५, रा. काळगव्हाण, ता. अंजनगाव, जि. अमरावती) हा आपल्या वाहनात एक भुरकट रंगाची गाय आणि लाल रंगाचा कपाळावर पांढरा ठिपका असलेला वासरू अशी दोन जनावरे अवैधरित्या कत्तलीसाठी वाहतूक करताना आढळला.

पोलिसांनी आरोपीकडून गाय व वासरू किंमत सुमारे ३५,००० आणि टाटा एस वाहन किंमत २,००,००० असा एकूण २,३५,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे, हेकॉ. विठ्ठल चव्हाण, पोकॉ. गोपाल जाधव आणि नितीन तेलगोटे यांच्या पथकाने केली.

# श्री श्यामबाबा जन्मोत्सवाची जय्यत तयारी


## भव्य निशाण यात्रा, संकीर्तन व महाप्रसादाचे आयोजन

**भक्ती, सेवा आणि संस्कृतीचा सुंदर संगम 'श्यामधाम' येथे अनुभवता येणार**

■ **प्रतिनिधी | मूर्तिजापूर** ■

येथील चिखली रस्त्यावरील श्री श्यामधाम येथील श्री श्याम मंदिरात श्री श्यामबाबा जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय भव्य महोत्सवासाठी सर्व जय्यत तयारी पूर्ण झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.

श्याम मित्र परिवार व भोजगढीया परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाला दि. १ नोव्हेंबर रोजी सुरुवात होणार आहे. सकाळी ७ वाजता विजुल मंदिर (जुनी बस्ती) येथून श्री श्याम



मंदिरापर्यंत भव्य निशाण यात्रा काढण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर भरविण्यात येणार असून नागरिकांना विविध आजारांवरील तपासणी व उपचाराची सुविधा दिली जाणार आहे. सायंकाळी ५ वाजता श्री श्याम सखी मंडळाद्वारे भजन-कीर्तन आणि आरती आयोजित करण्यात आली आहे. तर रात्री ९ वाजता भव्य भजन संध्या व श्याम संकीर्तन महोत्सव रंगणार आहे.रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत गायत्री महायज्ञ आणि दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत श्री श्याम ज्योती दर्शन व महाप्रसाद (अन्नकूट) चे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय कार्यक्रमातून भक्तांना सेवा, भजन, संकीर्तन आणि आध्यात्मिक अनुभूतीचा सुंदर संगम अनुभवता येणार आहे. प्रत्येक भक्ताच्या जीवनात शांती, समाधान आणि श्रद्धेचा दिवा उजळावा, या उद्देशाने हा जन्मोत्सव साजरा करण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**पाणी पुरवठा विभाग**
**मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. १५, सन २०२५-२६**

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मनपा निधी अंतर्गत दि. ३०/१०/२५ रोजी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(संपर्क- ७७०९०४९३५१)
संकेतस्थळ- www.amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापू/ ३३९/२०२५,
पाणी पुरवठा विभाग अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : ३०/१०/२०२५

# अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शाळांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान

■ **प्रतिनिधी | अकोला** ■

राज्यातील धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शासनमान्य खासगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या संबंधित संस्था व शाळांनी सदर शासन निर्णयानुसार परिपूर्ण प्रस्ताव दि. १४ नोव्हेंबर जिल्हा नियोजन समिती, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला या कार्यालयास मिळतील या बेताने सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. तसेच शासन निर्णयानुसार अनुदानासाठी पात्र नसतांना प्रस्ताव सादर करण्यात येऊ नये, असे कळविण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

**वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, अकोला**
गैरअर्जदार / गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस.
(वाचा आदेश ४१ नियम १४)

एम. जे. सी. नं. २८५/२०२५ प्रोसेस नं.१८८४/२०२५
चौ.ता. १८/११/२०२५ दिनांक : ०५/०८/२०२५
**अर्जदार :** 1) Manthan Umesh Raut
**विरुध्द**
**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी हया न्यायालयामध्ये 'AN APPLICATION FOR GRANT OF PERMISSION TO SELL THE PROPERTY OF THE MINOR, AS PER SECTION 8 OF HINDU MINORITYAND GUARDIANSHIPACT, 1956' नुसार अर्ज दाखल केलेले आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख १८/११/२०२५ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येतील. आज दिनांक ०५ माहे ऑगस्ट सन २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
न्यायिक विभाग जिल्हा न्यायालय अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**
एम. जे. सी. नं. १७८८/२०२५ प्रोसेस नं.१७९६०/२०२५
चौ.ता. ०४/११/२०२५ दिनांक : २९/१०/२०२५
**अर्जदार :** १. गजानन जनार्दन तायडे रा. चांदुर, ता. जि. अकोला.
**विरुध्द**
**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : देवकाबाई जनार्दन तायडे
**पत्ता :-** रा. चांदुर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत देवकाबाई जनार्दन तायडे यांचे दि. १२/०३/२०२५ रोजी चांदूर ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**श्रीमती डि.एम.पाटील यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला.**
दिवाणी किरकोळ अर्ज/२७७/२०२५ प्रोसेस नं.२६१३/२०२५
पुढील तारिख. ०२/१२/२०२५ सारिका सौरव घोगरे वि. अनिता पद्माकर घोगरे
**अर्जदार :** सारिका सौरव घोगरे वय अं.२९ वर्ष धंदा घरकाम रा. भरतपुर ता. बाळापुर जि. अकोला
**विरुध्द**
**गैरअर्जदार :** अनिता पद्माकर घोगरे वम अ.५० वर्ष धंदा घरकाम रा. भरतपुर ता. बाळापुर जि. अकोला

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत सौरव पद्माकर घोगरे हे दिनांक १३.०७.२०२५ रोजी न्यू ईरा हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट नागपुर येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार व गैरअर्जदार यांना मयत सौरव पद्माकर घोगरे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुद्ध इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०२.१२.२०२५ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १८.१०.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**
एम. जे. सी. नं. १८५५/२०२५ प्रोसेस नं.१७८०४/२०२५
चौ.ता. २०/११/२०२५ दिनांक : २८/१०/२०२५
**अर्जदार :** १. शांताबाई तुळशीराम गवई २. संजय तुळशीराम गवई ३. रंजय तुळशीराम गवई ४. राजेश तुळशीराम गवई अर्जदार क. १ ते ४ रा. भिमनगर, बोरगांव मंजू, अकोला. ता. जि. अकोला. ५. कांताबाई वासुदेव दंदी रा. रिधोरा, ता. बाळापूर जि. अकोला. ६. उमा निवृत्ती दामले रा. भिमनगर, बोरगांव मंजू, अकोला. ता. जि. अकोला. ७. मीना गौतम जामनिक रा. मु. पो. लाखपुरी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. ८. कल्पना नागसेन दहातोंडे रा. ब्रम्ही बु. ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. ९. सरला नितिन तेलगोटे रा. कोठारी वाटिका, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.
**विरुध्द**
**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तुळशीराम लखुजी गवई
**पत्ता :-** रा. भिमनगर, बोरगांव मंजू, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तुळशीराम लखुजी गवई यांचे दि. ०४/१२/२०१५ रोजी बोरगांव मंजू, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/ ११/ २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**
एम. जे. सी. नं. १९५९/२०२५ प्रोसेस नं.१७९६१/२०२५
चौ.ता. ०६/१२/२०२५ दिनांक : २९/१०/२०२५
**अर्जदार :** १. शेख निजाम शेख गोंडु २. शेख इमाम शेख निझाम रा. गल्ली नं. ३, अजमलिया मस्जिद जवळ, नेहरू नगर, सोलासो प्लॉट, अता किराणा बाजुला, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. ३. शेख बैरम शेख निजाम रा. नवीन बस्ती, कुरणखेड, ता. जि. अकोला. ४. फैयमीदा बी म. जहीर रा. मोचीपुरा जामा मस्जिद जवळ, तेल्हारा ता. तेल्हारा, जि. अकोला. ५. रहीमा बी फिरोज खान ६. करीमा बी मोहम्मद अजीज ७. शेख सिकंदर शेख निजाम तिन्ही रा. १६०० प्लॉट, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.
**विरुध्द**
**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : महेमुदा बी शेख निजाम
**पत्ता :-** रा. गल्ली नं. ३, अजमलिया मस्जिद जवळ, नेहरू नगर, सोलासो प्लॉट, अता किराणा बाजुला, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत महेमुदा बी शेख निजाम यांचे दि. ३०/०७/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**
एम. जे. सी. नं. १९३४/२०२५ प्रोसेस नं.१७८०५/२०२५
चौ.ता. २९/११/२०२५ दिनांक : २८/१०/२०२५
**अर्जदार :** १. शिला राजेश मलिये २. मयुर राजेश मलिये ३. कोमल राजेश मलिये ४. कमलाबाई मनोहर मलिये अर्जदार क. १ ते ४ रा. शिवाजी शाळेसमोर, हरिहरपेठ, दसेरा नगर, अकोला, ता. जि. अकोला, ५. काजल केतन दैनिवाल रा. रामटेकपुरा, अकोट, ता. अकोट
**विरुध्द**
**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजेश मनोहर मलिये
**पत्ता :-** रा.शिवाजी शाळेसमोर, हरिहरपेठ, दसेरा नगर, अकोला, ता. जि. अकोला,

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजेश मनोहर मलिये यांचे दि. ०६ / ११ / २०१४ रोजी शासकीय रूग्णालय अकोला येथे निधन, झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयताम वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/१० / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाने शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार

## यशदामार्फत सरपंच व अधिकारी यांना मिळणार प्रशिक्षण

**वर्धा / जनमाध्यम**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्या पासून बहुतांश ग्रामपंचायती केवळ शासनाच्या निधीवर अवलंबून होत्या. मात्र, पंचायतराज योजनेतून राज्यातील सर्वच ग्रामपंचायतींना आत्मनिर्भर करण्यासाठी विविध योजनांचा स्थानिक पातळीवर बुस्टर डोस दिला जाणार आहे. यातून ग्रामपंचायती श्रीमंत तर होतीलच तसेच ग्रामस्थांना सर्वांगीण विकास यातून साधला जाणार आहे. यासाठी पुण्यातील यशदा या संस्थेत ग्रामपंचायत प्रशिक्षण देणे सुरु झाले आहे.

शासनाच्या येणा-या विविध योजना तसेच निधीवर अवलंबून न राहता राज्यातील ग्रामपंचायती स्वतःच्या महसूल स्त्रोत वाढवून त्यांच्या माध्यमातून गावांचा विकास कसा करता येईल यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले असून, त्यासाठी विविध मॉड्युलचा वापर करण्यावर भर देण्यात येणार आहे. या मॉड्युलचाच एक भाग म्हणून ग्रामपंचायतींना नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर, मत्स्यपालन, पर्यावरणीय पर्यटन, सार्वजनिक इमारती आणि जमीनी भाड्याने देणे याशिवाय नावीन्यपूर्ण उत्पन्नाचे स्त्रोत शोधून ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास (आत्मनिर्भर) मदत होणार आहे. मात्र त्यासाठी गावपातळीवर ग्रामपंचायत स्थानिक नागरिकांसह राजकीय नेत्यांनी एकत्र येण्याची गरज आहे. राज्यातील ग्रामपंचयतींनी स्वतःचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी तेथील भौगोलिक परिस्थितीचा विचार करून कोणकोणत्या उपाययोजना अंमलात आणाव्या लागतील, यासाठी केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या पंचायती राज विभागाच्या सहकार्याने' ग्रामपंचायत स्व-उत्पन्नाचे स्रोत (ओएसआर) नावाचे एक मॉड्युल आय. आय. एम (इंडियन इन्स्टियुट ऑफ मॅनेजमेंट) अहमदाबाद यांचे मार्फत तयार केले आहे. या मॉड्युलनुसार केंद्र शासनाच्या पंचायती राज विभागाने यावावत प्रशिक्षण देण्यासाठी राज्यस्तरीय प्रशिक्षक तयार केलेले आहेत. त्याच्याकडून प्रत्येक जिल्ह्यातील किमान सहा प्रशिक्षक तयार करण्याची कार्यवाही यशदा (पुणे) च्या माध्यमातून सुरू आहे.




**शाश्वत उत्पन्न वाढविण्यावर भर**

यामाध्यमातून राज्यातील ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, तसेच ग्रामविकास अधिकारी यांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्थानिक विकासाला प्राधान्य देण्याबरोबरच. गावांचा विकास करताना त्या विकास कामातून पुन्हा उत्पन्नाचा स्त्रोत कसा निर्माण होईल याच्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. तसेच ग्रामपंचायतींचे शाश्वत उत्पन्न वाढविण्यासाठी अपारं परिक व नावीन्यपूर्ण उत्पन्नाचे स्रोत कसे निर्माण करता येतील याचे धोरण निश्चित करण्यात येणार आहे.

# लाडकी बहीण योजनेचा खर्च ४३ हजार कोटींवर



**वर्धा / जनमाध्यम**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेचा खर्च ४३ हजार कोटींच्या वर पोहोचला आहे. त्यामुळे राज्याच्या वार्षिक अर्थसंकल्पातील सर्वात मोठ्या खर्चांपैकी ही एक योजना ठरली आहे.

महिला व बाल विकास विभागाने माहिती अधिकारात ही माहिती दिली अवहे, महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेल्या या योजनेत लाभार्थ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. एप्रिल २०२५ मध्ये सर्वाधिक सुमारे २.४७ कोटी महिला लाभार्थी ठरल्या आहेत. मात्र जून २०२५ पर्यंत लाभार्थी आणि वितरित रकमेची संख्या सुमारे ९ टक्क्यांनी घटली आहे. त्यामुळे राज्याची सुमारे ३४० कोटी ४२ लाख रुपयांची बचत झाली आहे. जुलै २०२४ ते जून २०२५ या सुरुवातीच्या महिन्यांत मोटे पेमेंट झाले. कारण अर्जदारांचे थकित देयक क्लीअर करण्यात आले. ऑक्टोबर २०२४ मध्ये सर्वाधिक ७ हजार ४१९ कोटी इतका निधी वितरित झाला. यात ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यांचा संयुक्त हप्ता समाविष्ट होता. हा हप्ता विधानसभा निवडणुकीच्या अगोदरच देण्यात आला.

पहिल्या वर्षी झालेला ४३,०४५.०६ कोटींचा खर्च २०२४ २५ साठीच्या सुधारित अंदाज ३३,४३३ कोटींपेक्षा जास्त आहे. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील प्रमुख विभागांच्या तुलनेत लाडकी बहिण योजना ही राज्यातील सर्वात मोठ्या खर्चाच्या योजनांपैकी एक ठरली आहे.

# रस्त्यावरील खड्याने नागरिक झाले त्रस्त

**वर्धा :** शहरातील अनेक भागात रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहे. याचा त्रास वाहनधारकाना होत आहे. खड्यात वाहन जावून अपघाताच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहे. खड्यामुळे नागरिकांना पाठीचा, मनक्याचा व मानेचा त्रास उद्भवत आहे. खड्ड्यामुळे वाहने खिळखिळ होत आहे. खड्डे बुजविण्याठी परिसरातील नागरिकांनी वारंवार संबंधित विभागाकडे तक्रारी केल्या आहे. मात्र, त्यावर दुर्लक्ष केल्या जात आहे. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजविण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

# मुलीच्या नावे असलेले घर आता आईच्या नावे

### जेष्ठ नागरिक न्यायाधिकरणाचा महत्वाचा आदेश

**आर्वी जनमाध्यम**

तालुक्यातील नांदोरा काळे येथील एका वृद्ध आईच्या नावे घर परत करण्याचा महत्वाचा आदेश जेष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरणाचे पिठासीन अधिकारी व उपविभागीय अधिकारी विश्वास सिरसाट यांनी दिला आहे. सदर प्रकरणात वृद्ध राधाबाई चहांदे यांनी आपल्या मुलीला भविष्यात सांभाळ करेल या अपेक्षेने वडिलोपार्जित घर बक्षीसपत्राद्वारे दिले होते. मात्र, अपेक्षेप्रमाणे मुलीकडून सांभाळ न झाल्याने राधाबाईंनी न्यायाधिकरणाचा दरवाजा ठोठावला. दोन्ही पक्षांची बाजू ऐकल्यानंतर सरसकट पुरावे पाहता सदर हस्तांतरण बेकायदेशीर असल्याचे ठरवत न्यायाधिकरणाने घर परत वृद्ध आईच्या नावे करण्याचा आदेश जारी केला.

उपविभागीय अधिकारी विश्वास सिरसाट यांनी या निकालात म्हटले आहे की, पालकांचा सांभाळ करणे हे संततीचे केवळ नैतिक नव्हे तर कायदेशीर दायित्व आहे. अपत्यांकडून दुर्लक्ष झाल्यास ज्येष्ठ नागरिकांनी निर्वाह न्यायाधिकरणाकडे मदत मागावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# नेहरू पर्वतारोहण शिबिरासाठी देवळीच्या दोन एनसीसी छात्रांची निवड

**देवळी / जनमाध्यम**

२१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत स्थानिक एस. एस. एन. जे. महाविद्यालयातील एनसीसी छात्र सैनिक कॉर्पोरल समीक्षा नेवारे व कॉर्पोरल सुजल पराते यांची एनसीसी डायरेक्ट तर्फे नेहरू माऊंटनरिंग इन्स्टिट्यूट, उत्तरकाशी येथे होणाऱ्या ऑल इंडिया ट्रेकिंग कम लीडरशिप अँड टीम बिल्डिंग' या राष्ट्रीय दर्जाच्या शिबिरासाठी निवड करण्यात आली आहे. या दोन्ही छात्र सैनिकांचा प्रवास आज रवाना झाला. ३० ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या या शिबिरात देशभरातील निवडक एनसीसी सदस्य सहभागी होणार असून नेतृत्वगुण, संघटनेची भावना व पर्वतारोहण कौशल्य विकसित करण्याचा उद्देश आहे. निवड झाल्याबदल एनसीसी बटालियनचे प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल जिसांतो व महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांनी छात्र सैनिकांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. या निवडीमुळे देवळीतील विद्यार्थ्यांनी राज्याचा सन्मान वाढवला आहे.



# सोयाबीन खरेदी केंद्र तातडीने सुरू करावीत : ॲड. सुधीर कोठारी

**हिंगणघाट जनमाध्यम :** हंगाम २०२५-२६ साठी केंद्र सरकारने सोयाबीनची आधारभूत किंमत ५,३२८ रुपये प्रति क्विंटल निश्चित केली आहे. मात्र हिंगणघाटसह जिल्ह्यात अद्याप खरेदी केंद्र सुरु न झाल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. शासनाने तातडीने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावीत, अशी मागणी हिंगणघाट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी यांनी केली आहे. या वर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबरमधील अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकावर रोगराईचा प्रादुर्भाव झाला. परिणामी शेंगांतील फक्त ३० टक्के दाणेच पूर्ण भरले असून उत्पादकता घटली आहे. मजुरांच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांनी हार्वेस्टरच्या मदतीने कापणी केल्याने दाण्यांमध्ये काडी-कचरा मोठ्या प्रमाणात मिसळला आहे. अलीकडच्या अकाली पावसामुळे सोयाबीनच्या प्रती खराब झाल्याने खुल्या बाजारात दर घसरले आहेत. सध्या शेतकऱ्यांना आधारभूत दरापेक्षा कमी भाव मिळत असून त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन ॲड. कोठारी यांनी जिल्हाधिकारी, नाफेड अधिकारी, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, तसेच पणन संचालक यांना पत्र पाठवून खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनाही या पत्राची प्रत पाठवून तातडीने कारवाईची अपेक्षा व्यक्त केली आहे. या हरीष वडतकर, हरणे, बाडे, कोठारी आदी सदस्यांनी पाठिंबा दिला आहे.



# कराटे खेळाला प्रोत्साहन देणे गरजेचेः अनिल निमगडे

## तालुकास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०२५ चे उद्घाटन

**वर्धा जनमाध्यम**

आजच्या मुला मुलींना बालवयापासून शालेय शिक्षणासोबतच साहस, शौर्य व आत्मसुरक्षेचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. नवी निर्भिड व सहासी पिढी तयार करण्याच्या दृष्टीने कराटे खेळाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. अनेक वर्षापासून देशात कराटे खेळ शिकणाऱ्या मुला-मुलींच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे ही बाब सुरक्षित व निरोगी समाजाच्या दृष्टीने अधिक महत्वाची आहे. हा खेळ आजच्या वातावरणात वरदान ठरत आहे.

तरी कराटे खेळाला अधिक प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन क्रिडा अधिकारी अनिल निमगडे यांनी व्यक्त केले.

ते २८ अक्टूबर २०२५ रोजी क्रिडा व युवक संचणालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रिडा परिषद वर्धा व वर्धा तालुका क्रिडा स्पर्धा आयोजक समिती व्दारा आयोजित तालुकास्तर शालेय क्रिडा स्पर्धा २०२५ चे उद्घाटक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही तर प्रमुख अथिती म्हणून कोशी उल्हास वाघ, सिहान मंगेश भोंगाडे, महेश गावंडे, साहिल वाघ, दिलीप कठाणे, चेतन जाधव, अभिजीत पारगांवकर, पुजा गोस्टकर, आदी मंचावर उपस्थित होते.

वाढत्या गुन्हेगारीच्या काळात स्वतःचे संरक्षण करण्यासाठी कराटे एक उत्तम कला कौशल्य विकसित करणारा खेळ आहे. अशी भावना इमरान राही यांनी व्यक्त केली या प्रसंगी महेश गावंडे व कोशी उल्हास वाघ यांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना सिहान मंगेश भोंगाडे संचालन अमोल मानकर तर आभार वेदांत चौधरी यांनी मानले.

कार्यक्रमाला क्रिडा शिक्षक अब्दुल सईद, ऐजाज शेख, रचनिल राऊत, गौरव चैनानी, हिमांशू ढोक, ॲड सुनैना भगत, सुरज राजपुत, सहिल तराळे, प्रेम तवंर, आर्यण छापेकर, आरित मानकर, गोविंद शर्मा, कैवल्य सागरकर आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत पुलगावचा मयूर पाचवारे चमकला

**पुलगाव जनमाध्यम**

शहरातील चंद्रशेखर आझाद क्रीडा मंडळाचा उदयोन्मुख खेळाडू चि. मयूर किशोर पाचवारे याने अंडर-१६ राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत नागपूर विभागीय संघाला सुवर्णपदक मिळवून दिले. या कामगिरीने पुलगावच्या क्रीडाक्षेत्राचा लौकिक अधिक उजळला आहे. या यशाबद्दल देवळी-पुलगाव मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने यांच्या हस्ते मयूरचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी भाजपा शहराध्यक्ष प्रशांत इंगोले, माजी नगराध्यक्ष राजीव बत्रा, किशोर पाचवारे आणि मनोज वाल्दे आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार बकाने म्हणाले, पुलगाव ही केवळ औद्योगिकच नव्हे, तर क्रीडाक्षेत्रातही तेजाने झळकणारी नगरी आहे. मयूरसारखे मेहनती व शिस्तप्रिय खेळाडू आजच्या तरुणाईचे प्रेरणास्थान आहेत. या विजयानंतर राष्ट्रीय प्रशिक्षक बंटी ढगे यांच्या मार्गदर्शनाचे खास कौतुक करण्यात आले. त्यांनी विजयी संघाचे नेतृत्व करत उल्लेखनीय यश संपादन केले. आमदार बकाने यांनी चंद्रशेखर आझाद क्रीडा मंडळाचे अध्यक्ष रवीभाऊ साखरे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचेही कौतुक करत म्हटले की, पुलगावमध्ये व्हॉलीबॉल खेळाची परंपरा टिकवून ठेवण्यात या मंडळाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. मयूरचे यश या दीर्घ प्रयत्नांचे फळ आहे. राज्य सरकारच्या साहाय्याने ग्रामीण भागातील क्रीडा सुविधांचे आधुनिकीकरण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगून आमदार बकाने यांनी देवळी-पुलगाव मतदारसंघात आधुनिक क्रीडांगण उभारण्याचा मानस व्यक्त केला. ते म्हणाले, क्रीडा ही केवळ खेळाची बाब नसून ती जीवनशैली आहे. मैदानावर घाम गाळणारा प्रत्येक तरुण हा राष्ट्राच्या उभारणीचा खरा शिल्पकार आहे. मयूरच्या सुवर्ण कामगिरीबद्दल संपूर्ण पुलगाव शहरातून अभिनंदनाच्या शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



आ. राजेश बकाने यांच्या हस्ते गौरवपूर्ण सत्कार

## संक्षिप्त

### सर्पदंशाने १० वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू

**समुद्रपूर :** तालुक्यातील येदलाबाद गावात सर्पदंशाने १० वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. प्राप्त माहितीनुसार, मृत बालकाचे नाव महेश देविदास भोमले (वय १० वर्षे, रा. येदलाबाद) असे असून, तो आज सकाळी सुमारास घराच्या ओट्यावर बसलेला असताना अचानक एका सापाने त्याला चावा घेतला. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी तातडीने त्याला प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे प्राथमिक उपचारानंतर त्याला पुढील उपचारासाठी समुद्रपूर येथे हलविण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्यानंतर त्याला सेवाग्राम रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून महेशचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या बालकाच्या आकस्मिक निधनामुळे भोमले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, येदलाबाद गावात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

### दारू पिऊन धुडगूस करणाऱ्यास पोलिसांनी केली अटक

**वर्धा :** खरांगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खैरवाडा परिसरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिवून जोरजोराने ओरडत धामधूम करणाऱ्या २५ वर्षीय श्रीकांत उर्फ विशाल अंबादास खंडाते याला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत आवश्यक ती कारवाई केली आहे. वर्धा जिल्हा हा दारूबंदी कायद्यानुसार १९७४ पासून गांधीनगर म्हणून ओळखला जातो, पण तरीही जिल्ह्यात अनेक ठिकाणी खुल्या आकाशाखाली दारू विक्री व सेवन उरलेल्या आहेत. पोलिस प्रशासन अवैध दारू विक्री आणि सेवनाविरुद्ध या संघर्ष सतत करत आहेत. वर्धा जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाने माहिती देताना सांगितले की, जिल्ह्यातील १९ पोलीस ठाण्यांत धडक कारवाई केली असून दारूबंदी कायद्यानुसार अनेकांना अटक करण्यात आली आहे. यशस्वी कारवाईत मोठ्या प्रमाणावर अवैध दारू जप्त केली जात आहे. तसेच अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध कठोर कारवाईने दारू प्रकरणांमध्ये घट होण्यास मदत होत आहे. महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या वारशाचा जिल्हा असलेल्या वर्धात दारूबंदी कायद्याचे पालन हे सामाजिक जबाबदारीचे विषय ठरले आहेत. स्थानिक प्रशासन व पोलीस विभाग हेही या निषेधात्मक धोरणाचे पालन करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट झाले आहे. दारू सेवनामुळे जनतेला होणाऱ्या त्रासाला थांबविण्यासाठी प्रशासनाकडून सतत प्रयत्न सुरु आहेत. सार्वजनिक स्थळावरील अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कठोर कारवाईही सुरु आहे. त्यामुळे नागरिकांनी देखील कायदा पाळावा, शक्यतो दारूच्या निषेधार्थ सहकार्य करावे ही अपेक्षा व्यक्त केली गेली आहे. ही कारवाई दारूबंदी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीची परिचायक असून भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना कमी करण्यास मदत होईल, अशी आशा वर्धा पोलिसांनी व्यक्त केली आहे.

### बनावट वस्तूंच्या विक्रीत अडकले चार; नागपूरचा एक आरोपी पसार

**वर्धा -** वर्धा जिल्ह्यातील सेलू येथील विकास चौकात एका किराणा दुकानातून बनावट प्रॉडक्ट्सची विक्री केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाडी टाकून चार जणांना अटक केली आहे. यामध्ये गोपाल बसंत किरपट, सईद खाँ रशीद खाँ पठाण, रोहित रुपचंद आहुजा आणि ओम भाऊराव द्रव्यका यांचा समावेश आहे. मात्र नागपूर येथील संज सोमकुवर हा आरोपी पसार आहे. स्थानिक गुन्हे शाखेने या कारवाईत बनावट उत्पादने विक्रीच्या गुन्ह्यातील आरोपींवर कडक कारवाई करण्यास सुरुवात केली असून, पसार आरोपीच्या अड्ड्याचा शोध घेतला जात आहे. बनावट उत्पादने विक्रीमुळे ग्राहकांस मोठा फसवणूक आणि आर्थिक नुकसान होत असल्याने प्रशासनाने या प्रकरणात निश्चित गांभीर्य दाखवले आहे. हा प्रकार किराणा व्यावसायिकांमध्ये नियमांचे पालन आणि ग्राहकांचा संरक्षण करण्याच्या दृष्टीने एक धक्का असून, गुन्हे शाखा अधिकाधिक तपासणी करून अशा प्रकारच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्याचा निर्धार करत आहे. ग्राहकांनीही सावधगिरी बाळगून अधिकृत दुकाने आणि प्रमाणित उत्पादनेच खरेदी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या कारवाईमुळे वर्धा जिल्ह्यातील किराणा व्यवसायात आणि ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासन पुढील काळातही अशा प्रकारच्या गैरव्यवहारांवर काटेकोर लक्ष ठेवणार आहे.

### कपडे घेऊन न दिल्याने युवकाने घेतला गळफास

**वर्धा :** नवीन कपडे घेऊन न दिल्याने हताश झालेल्या युवकाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना आदर्शनगर येथे घडली. सम्यक सुनील कांबळे (१७) असे मृताचे नाव आहे. सम्यकने घरच्यांना नवीन कपडे घेऊन मागितले होते. घरच्यांनी परिस्थिती बिकट असल्याने कपडे घेऊन दिले नाही. यामुळे तो नाराज होता याच कारणातुन त्याने राहत्या घरी लाकडी बल्लीला दुपट्टा बांधून गळफास घेत आत्महत्या केली. याप्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी नोंद घेतली.

### विष पिऊन वृद्धाची आत्महत्या

**सिंदी रेल्वे :** विष पिऊन वृद्धाने आत्महत्या केली. ही घटना सिंदी रेल्वे गावात घडली. ज्ञानेश्वर वामन वाघमारे (६५) असे मृताचे नाव आहे. अतिवृष्टीने पीक नाहीसे झाले तसेच बँकेचे कर्ज असून, नातीचे लग्न कसे करू, या विचारात ज्ञानेश्वरने विष प्राशन केले. त्यांना सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३३१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# श्री ह.व्या.प्र. मंडळाचे चिखलदरा येथे ५१ वे निवासी शीतकालीन योग व निसर्गोपचार प्रशिक्षण शिबिर

**-११ ते १५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजन**



**अमरावती :** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती आणि श्री ह. व्या. प्र. मंडळ भारतीय ज्ञान परंपरा केंद्र, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने चिखलदरा येथे ५१ वे शीतकालीन निवासी योग व निसर्गोपचार प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर दि. ११ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान अप्पर प्लेटो, चिखलदरा येथील योग निसर्गोपचार केंद्रात पार पडणार आहे.

या शिबिरामध्ये १० वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुषांना प्रवेश खुला आहे. निसर्गरम्य वातावरणात योग व निसर्गोपचाराचा अनुभव घेत आरोग्यवर्धक सोबतच वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन मिळणार आहे. विविध आजारांवरील निसर्गोपचार पद्धतींचे प्रशिक्षण तसेच मुलांसाठीही हे शिबिर विशेष उपयुक्त ठरणार आहे.

सन १९७७ पासून संस्थेचे संस्थापक स्व. अंबादासपंत वैद्य व श्री त्र्यंबक गुरुजी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या योग शिबिराची परंपरा सुरू आहे. शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक शुद्धी साधण्याचे उद्दिष्ट ठेवून या शिबिरात षट्कर्म, प्राणायाम, ध्यान, योगासन यांचा सखोल अभ्यास केला जातो. यौगिक साधनेद्वारे अनुशासन, संतुलन आणि आरोग्यपूर्ण जीवन जगण्याचा संदेश यातून दिला जातो.

शिबिराच्या दरम्यान प्रार्थना, गीतापाठ, प्रश्नमंजुषा, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच चिखलदऱ्यातील पर्यटन स्थळांना भेटी यांचे आयोजन करण्यात येईल. तसेच थेरपीटिक योग (रोप, बेल्ट, चोअर, ब्रिक्स इत्यादी उपकरणांच्या साहाय्याने), वैकल्पिक उपचार, संगीत योग, एरोबिक व्यायाम आणि बोनाफायर नाईट हे या वर्षीचे विशेष आकर्षण असणार आहे.

शिबिरार्थींना प्रा. डॉ. अरुण खोडस्कर, डॉ. सूर्यकांत पाटील, प्रा. नितीन काळे, प्रा. प्रविण अनासाने, प्रा. प्रमोद शिरभाते, प्रा. संदीप मांदळे, प्रा. प्रणय पवार यांसारख्या नामवंत तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. शिबिराचे उद्घाटन ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.०० वाजता योग निसर्गोपचार केंद्र, श्री ह. व्या. प्र. मंडळ, अप्पर प्लेटो, चिखलदरा येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी योग निसर्गोपचार केंद्र, श्री ह. व्या. प्र. मंडळ, जिल्हा अमरावती ८०८७१४२२७० / ८०८७१०६१७१ / ८२७५७५३६४८ / ९८५०२७८८९९ / ९४२३६२३९६७ संपर्क साधता येईल.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि. श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२४०१/२०२५
**श्रीमती इरफाना अधिक तीन विरुध्द निरंक**
पुढील ता.२६.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
१. **इरफाना परवीन सय्यद अफसर,** वय ४६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. **फरजाना परवीन जफीउर्ररेमान,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
३. **अनिस अहमद अब्दुल वहाब,** वय ४५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. **शफीक अहमद अब्दुल वहाब,** वय ४१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व रा.पॅराडाईस कॉलनी, अमरावती शहर, ता.अमरावती, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत ताहेरा बी अब्दुल वहाब हया ०८.०१.२०२३** रोजी **अमरावती,ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार इरफाना अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती इरफाना अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, बाळासाहेब सारंगधर बरडे यांनी संजय गोकुलदास अडतिया रा देवीवार्ड पुसद ता. पुसद जि. यवतमाळ यांचे कडून त्यांचे मालकी व ताब्यातील खालील वर्णनाची मालमत्ता विकत घेतली आहे त्याचे वर्णन :- मौजे कसबा पुसद प्र.क. ता. पुसद जि. यवतमाळ जि.प. वि. नो. तु. यवतमाळ प.स. नो. पो. तु. पुसद न. प. पुसदचे हद्दीतील न. प. वार्ड क्र. ९, मालमत्ता क्र. २१३ मधिल नझुल शिट क्र. ६७, नझुल प्लॉट क्र. २७१७ मधिल जागा लांबी रुंदी पूर्व पश्चिम २० फुट ९ इंच (६ मी. ३२ सेमी) आणि उत्तर दक्षिण ११ फुट ६ इंच (३ मी. ५१ सेमी.) एकुण २३९.०० चौ फुट. (२२.३० चौ मी.) व संपूर्ण २२.३० चौ मी. ची जमीन लेव्हल चे पक्के बांधकाम व तळाचे पहीला मजला चे बांधकाम क्षेत्र २२.३० चौ मी. असे एकमजली बांधकाम ज्याची चतु.सिमा पुर्वेस नगीना मस्जीदची जागा पश्चिमेस रस्ता उत्तरेस सुधाकर व्यवहारे चे दुकान व दक्षिणेस कामदार कॉम्पलेक्स.

तरी वरील वर्णनाच्या मालमत्तेची खरेदी बाळासाहेब सारंगधर बरडे यांना संजय गोकुलदास अडतिया यांनी दिली व त्या खरेदी सोबत संजय गोकुलदास अडतिया यांनी श्रीमती शारदाबेन अमृतलाल शाह यांच्याकडून खरेदी केलेले खरेदी खत क्र. १४४६/१९९७ दि. १६.०६.१९९७ रोजी करुन दिली त्या खरेदीची मुळ खरेदी खत बाळासाहेब सारंगधर बरडे यांना खरेदी करुन दिली त्यावेळी दिली होती. परंतु बाळासाहेब सारंगधर बरडे दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांच्या घरापासून त्यांचे दुकानाकडे जात असतांना शिवाजी चौक पुसद येथे त्यांची पिशवी पडली त्या पिशवी मध्ये वरील संजय गोकुलदास अडतिया यांना श्रीमती शारदाबेन अमृतलाल शाह यांनी खरेदी करुन दिलेली मुळ खरेदी खत होते. सदर दस्त गहाळ झाले आहे.

तरी सर्व लोकांना कळविण्यात येते की, कोणालाही वरील संदर्भीत खरेदीखत मिळाल्यास ती बाळासाहेब सारंगधर बरडे यांना परत करावी त्या संबंधी योग्य बक्षीस देण्यात येईल. त्यासंबंधी पोलीस स्टेशन, पुसद येथे तक्रार सुध्दा केली आहे. त्या गहाळ झालेल्या खरेदीखत व मालमत्ते संबंधी कोणाला कोणतीही हरकत, गहाण, बोजा, तारण, सावकारी व्यवहार, वारसा हक्क व इतर अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळविण्याचे करावे, अन्यथा कोणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत / तक्रार नाही असे समजण्यात येईल याची नोंद घ्यावी करीता जाहीर नोटीस.

**ॲड. सतिश एस. भुतडा**
माउली - ११, चतुर्भुज कॉलनी, राम मंदीराजवळ,
अकोला मो. ९८२२१२४३१६

---

## जाहीर नोटीस

[illegible]

**ॲड. सतिश एस. भुतडा**
[illegible]

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२१०५/२०२५
**ज्योती -वि- निरंक**
पुढील ता.२९.१०.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
१. ज्योती कण्णपालसिंग रघुवंशी, वय ५५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. भावना कण्णपालसिंग रघुवंशी (लग्नानंतरचे नांव सौ.भावना सारंग बुंदेले) वय ३२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
दोघे रा.अकोली रेल्वे स्टेशन रोड, नागबाबा मंदिराजवळ, प्रोफेसर कॉलनी साईनगर,अम.
३. पायल सुरेश तवारी, वय ३० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा- द्वारा - सौरभ तवारी, पिंपळगांव काळे, बुलढाणा महा.
४. पियुष कण्णपालसिंग रघुवंशी, वय २७ वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.मराठा कॉलनी नरसिंग सरस्वती नगर, गोपाल नगर, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कण्णपालसिंग शेरबहादुरसिंग रघुवंशी** यांचे दिनांक **१७.०२.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार ज्योती कण्णपालसिंग रघुवंशी व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ज्योती कण्णपालसिंग रघुवंशी व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१७.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४१४/२०२५
**श्री.हरलाल अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२७.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Herlal Berlal Ghosale (Bhosale), Age 47 Yrs. Occu.: Labour
2. Haldiseth Berlal Ghosale (Bhosale), Age 42 Yrs. Occu.: Labour
1 & 2 R/o Bahilolpur, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बेरलाल परशराम घोसले (भोसले)** हे दिनांक 21.10.2024 रोजी **कट आमला, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **हरलाल अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हरलाल अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**(CJJD) दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१३६/२०२५ — ने.ता.०२.०७.२०२५

**राजेंद्र -- वि -- निरंक**

अर्जदार : १. राजेंद्र बाबाराव चावके
रा.खरडगांव, ता.नेर परसोपंत, जि.यवतमाळ

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **बाबाराव मारोती चावके** यांचा मृत्यू दि.**०९.०७.२०१६** रोजी वेणी गणेशपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. अ.नं.१ हा मयत यांचा मुलगा आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १८ जुन सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली (DCPR-२०३४) मधील तरतूद क्र.५५ प्रमाणे मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील (यूडीसीपीआर-२०२० मधील) प्रकरण क.१५ मध्ये तरतूद क्र.१५.५ नव्याने समाविष्ट करण्याकरीता उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(क) व कलम २०(३) अन्वये सूचना...

## सूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक १५.१०.२०२५**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**क्र.टीपीएस-१८२५/३२३/प्र.क्र.९३/२०२५/कलम ३७(१कक)(क) व कलम २०(३) व कलम २०(३) नवि-१३** - ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यूडीसीपीआर) (यापुढे ज्याचा उल्लेख **उक्त यूडीसीपीआर नियमावली** असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख **उक्त अधिनियम** असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र.टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो.व प्रायो./कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२.१२.२०२० अन्वये मंजुरी दिली असून ती दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली (DCPR-२०३४) मधील विनियम क्र.५५ (Alignment of Metro/Mono/Coastal Road/Elevated Corridors/ Corridors of Mass and Rapid Transport System) अन्वये मेट्रो मार्गाच्या संरेखनास व त्यामधील आवश्यक बदलांचा समावेश बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली (DCPR-२०३४) मधील विनियम क्र.५५ (Alignment of Metro/Mono/Coastal Road/Elevated Corridors/ Corridors of Mass and Rapid Transport System) अन्वयेची तरतुद उक्त यूडीसीपीआर नियमावलीमध्ये समाविष्ट करावी, अशी विनंती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी दि.२८.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे उक्त विनंतीस अनुसरुन तसेच सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून उक्त यूडीसीपीआर नियमावलीमधील प्रकरण क्र.१५ मध्ये तरतुद क्र.१५.५ नव्याने समाविष्ट करण्याकरीता (सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार) उक्त यूडीसीपीआर नियमावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याची शासनाची खात्री झाली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख **प्रस्तावित फेरबदल** असा करण्यात आलेला आहे.)

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(क) व कलम २०(३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तीचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना/हरकतीवर सूनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे **अधिकारी** म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख **उक्त अधिकारी** असा करण्यात येत आहे) असे शासनाचे मत झाले आहे.

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती / छत्रपती संभाजी नगर विभाग
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका, (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे
४. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे
५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि., मुंबई
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण
८. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे
९. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हा परिषदा
१०.मुख्याधिकारी (सर्व नगर परिषदा / नगर पंचायती)

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने*

स्वाक्षरी/-
(प्रणव कर्पे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**परिशिष्ट-अ**

**शासन सूचना** क्र.टीपीएस-१८२५/३२३/प्र.क्र.९३/२०२५/कलम ३७(१कक)(क) व कलम २०(३) नवि-१३
दिनांक १५.१०.२०२५ सोबतचे सहपत्र

The following New Provision No.15.5 in the Chapter No.15 of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR-2020), for Maharashtra State is proposed as follows :-

**15.5 Alignment of Metro/Mono/Coastal Road/Elevated Corridors/ Corridors of Mass and Rapid Transport System :**

I. Any alignment modifications introduced in Metro/Mono/Coastal Road/ Elevated Corridors/Corridors of Mass Rapid Transport System, including Bus Raid Transit System (BRTS), by the Appropriate Authority and sanctioned y Government shall stand automatically amended onthe Development Plan as modified.

II. Furthermore, any new "Transport Corridor" such as Metro/Mono/Coastal Road/Elevated Corridors/Corridors of Mass Rapid Transit System, including BRTS, proposed by Appropriate Authority and sanctioned by Government shall stand automatically added on to Development Plan.

III. After finalization of site for Metro Car shed by the Competent Authority, the portionof land reserved/earmarked for the Metro Car Shed in DP, if not required by the Competent Authority subsequently, shall be deemed to be deleted from the said reservation and included in adjoining predominant zone. In such case, the **Metropolitan Commissione / Municipal Commissioner / Chief Officer** shall issue a written, well-reasoned, speaking order modifying the Development Plan to that effect and copy of such order along with certified part plan, shall be forwarded to Government and Director of Town Planning, Maharashtra State, Pune for record.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने*

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

स्वाक्षरी/-
(प्रणव कर्पे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

(वि.मा.का./अम/जाही/६३९/२०२५-२६)

---

## नगर परिषद, अंजनगांव सुर्जी
## सार्वत्रिक निवडणूक-२०२५
## प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्दीबाबत

**जाहीर सुचना**

अंजनगांव सुर्जी क्षेत्रातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करीता प्रभाग-निहाय अंतिम मतदार यादी दिनांक ३१.१०.२०२५ रोजी नगर परिषद कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व नगर परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**टिप -** प्रभाग निहाय अंतिम मतदार यादीवर कोणतीही हरकत अथवा सुनावणी नियमानुसार अभिप्रेत नाही.

**ठिकाण - अंजनगांव सुर्जी**
**दिनांक ३१.१०.२०२५**

स्वाक्षरी/-
**(विजय लोहकरे)**
मुख्याधिकारी गट-अ
नगर परिषद अंजनगांव सुर्जी

---

## दि.अमरावती जि.प.शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती
**कॉंग्रेस नगर रोड, रेल्वे पुलाजवळ, अमरावती**
**फोन नं.०७२१-२६७४६८४, २६७१०४३**

**निविदा सुचना**

दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती येथे अमरावती जिल्ह्यातील सर्व शाखा व यवतमाळ, अकोला व वाशिम शाखा मध्ये संगणकीय प्रणाली करीता निविदा फॉर्म मध्ये दर्शविलेले संगणक साहित्य मागणीनुसार पुरवठा करु शकणाऱ्या नोंदणीकृत प्रतिष्ठानांकडून निविदा मागविण्यात येत आहे. दिनांक ३१.१०.२०२५ ते ०६.११.२०२५ पर्यंत रु.५००/- चा (ना-परतावा) भरणा करुन दुपारी ४.३० वाजेपर्यंत निविदा फॉर्म विकीस उपलब्ध राहील व निविदा दिनांक ०७.११.२०२५ ला अनामत रक्कम रु.५०००/- बँकेत भरणा करुन दुपारी ४.३० वाजेपर्यंत निविदा बँकेच्या मुख्यालयात सादर करावी. निविदेच्या अटी व शर्ती निविदा फॉर्म सोबत जोडल्या आहेत.

निविदा प्राप्त झाल्यानंतर त्यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

**अमरावती**
**दिनांक ३१.१०.२०२५**

सरव्यवस्थापक, — अध्यक्ष,
दि.अम.जि.प.शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२४०८/२०२५
**माया -वि- निरंक**
पुढील ता.२९.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
१. माया ज्ञानेश्वर यादगिरे, वय ७३ वर्षे, व्यवसाय - निवृत्त
रा.निलकमल, रवि नगर अमरावती उकली पो.एच.व्ही.नगर, अमरावती
२. रावसाहेब ज्ञानेश्वर यादगिरे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
रा.निलकमल, रवि नगर अमरावती उकली पो.एच.व्ही.नगर, अमरावती
३. उज्वला ज्ञानेश्वर यादगिरे, वय ४८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
द्वारा- आशिष रमेश लोणकर, ९१३० हिंगणा रोड, वावयसीई कॉलेज श्रीगणेश कॉलनी, व्हीटीसी, नागपूर
४. श्रध्दा ज्ञानेश्वर यादगिरे, वय ४१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.प्लॉट नं.रवि नगर, अमरावती दसरा मैदान रोड, हनुमान मंदिराजवळ, वार्ड नं.५७, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत ज्ञानेश्वर निळकंठराव यादगिरे** यांचे दिनांक **१८.०५.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार माया ज्ञानेश्वर यादगिरे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **माया ज्ञानेश्वर यादगिरे व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४०६/२०२५
**श्रीमती सुलोचना अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०१.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Sulochana Balwant Makeshwar, Age 44 Yrs. Occu.: Housewife
2. Aniket Balwant Makeshwar, Age 24 Yrs. Occu.: Education
3. Pratiksha Balwant Makeshwar, Age 23 Yrs. Occu.: Education
4. Aman Balwant Makeshwar, Age 19 Yrs. Occu.: Education
All R/o at Masod, Wadgaon Mahore, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्री.बळवंत बळीराम मकेश्वर** हे दिनांक 02.05.2025 रोजी **मासोद, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुलोचना अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुलोचना अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २७.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२४०७/२०२५
**पम्मी -वि- निरंक**
पुढील ता.१६.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
१. पप्पी रुपसिंग थापरिया, वय ६७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.निलकमल, रवि नगर अमरावती उकली पो.एच.व्ही.नगर, अमरावती
२. सोनाली रुपसिंग थापरिया, वय ३७ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
दोघेही रा.ठाकुर प्रेमनिवास चपराशीपुरा, कॅम्प, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रुपसिंग चरणसिंग थापरिया** यांचे दिनांक **३०.११.२०१८** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार पप्पी रुपसिंग थापरिया व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पप्पी रुपसिंग थापरिया व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ५४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# जेष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी सदैव कटिबध्द- आ.प्रविण तायडे

## राष्ट्रीय वयोश्री योजनेअंतर्गत जेष्ठ नागरिकांना विविध साहित्याचे वितरण





**अचलपूर/ वार्ताहर**

अचलपूर मतदार संघातील शहरासह ग्रामिण भागातील वृध्द नागरिकांच्या विविध अडचणी निकाली काढण्यासाठी कटिबध्द असल्याचे मत आ.प्रविण तायडे यांनी पंचायत समिती अचलपूर अंतर्गत राष्ट्रीय वयोश्री योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यक उपकरणे वाटप प्रसंगी केले.

या कार्यक्रमा प्रसंगी सुधिर अरबट गटविकास अधिकारी पंचायत समिती अचलपूर, गटशिक्षणाधिकारी खरात, श्रीमती अभिलाषा ढोरे, ज्युनिअर मॅनेजर एलिम्को, मुंबई यांच्या उपस्थितीत या उपक्रमांतर्गत पात्र लाभार्थ्यांना चालण्याची काठी, श्रवणयंत्र, व्हीलचेअर, चष्मे आदी सहाय्यक उपकरणांचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी आमदार प्रविण तायडे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी शासन राबवत असलेल्या विविध योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.कार्यक्रमादरम्यान लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. कार्यक्रमाचे समन्वयक आणि एलिम्कोच्या टीमने उपस्थितांना योजनाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यात पंचायत समिती अचलपूरचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक प्रतिनिधींचा मोठा सहभाग होता.

# अमरावती बस आगारात थरारक प्रकार

## चारचाकी आणि एस.टी. बस आमने-सामने; मोठी दुर्घटना टळली

**अमरावती/का.प्र.**

अमरावती बस आगारात आज सकाळी घडलेल्या एका थरारक प्रकारामुळे काही काळ परिसरात खळबळ उडाली. बस आगाराच्या प्रवेशद्वारातून एक चारचाकी वाहन वेगात बाहेर जात असताना, त्याच वेळी एक एस.टी. बस आत येत होती. त्यामुळे दोन्ही वाहने आमने–सामने आली आणि क्षणभर मोठा अपघात घडण्याची भीती निर्माण झाली.



चारचाकी वाहन चुकीच्या दिशेने म्हणजेच बसांच्या एन्ट्री गेटमधून बाहेर पडत होते. त्याचवेळी आगाराच्या परिसरात प्रवेश करणारी एस.टी. बस अचानक समोर आली. दोन्ही वाहने वेगात असल्याने ब्रेकांचा आवाज दूरवर ऐकू गेला आणि क्षणभर परिसरात गोंधळ उडाला. सुदैवाने चालकांनी वेळेत वाहनं नियंत्रणात घेतल्याने कोणतीही अनुचित घटना घडली नाही.या घटनेमुळे बस आगारातील सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अमरावतीसह परतवाडा आणि जिल्ह्यातील इतर तालुका स्तरावरील बस आगारांमध्ये खाजगी चारचाकी तसेच दुचाकी वाहनांची वर्दळ वाढल्याचे वारंवार दिसून येते. अशा वाहनांना आगारात प्रवेश कसा मिळतो, हा प्रश्न उपस्थित होत आहे.बस आगारात दिवसभर मोठ्या संख्येने एस.टी. बसेस ये-जा करत असतात. अशा परिस्थितीत खाजगी वाहनांची अवाजवी वर्दळ गंभीर अपघाताला आमंत्रण देऊ शकते, अशी चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी वाहतूक विभागाने योग्य ती दक्षता घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# प्राचीन शनी मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूररेल्वे शहरात शंभर वर्षे पुरातन प्राचीन शनी मंदिर सिनेमा चौक येथे असून या मंदिरांचा जिर्णोद्धार करण्याचा संकल्प शासकीय कंत्राटदार तथा सामाजिक कार्यकर्ते राजेश मुंधडा यांनी पुढाकार घेऊन स्वर्गीय पुरुषोत्तमदासजी मुंधडा व लीलाबाई पू. मुंधडा यांच्या स्मृति प्रित्यर्थ करण्याचा मानस करून १ नोव्हेंबर रोजी शनी मंदिराचा जिर्णोद्धार सोहळ्याचे भूमि पूजन सोहळा आयोजीत केला आहे.

चांदुर रेल्वे शहरातील शासकीय तंत्रज्ञान तथा सामाजिक कार्यकर्ते राजेश मुंधडा व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक बंडु मुंधडा यांच्या संकल्पेंतून १०० वर्ष पुरातन असलेले प्राचीन शनी मंदिराचा जीर्णोध्दार करण्याचे मनात ठरवले आणि सदर शनी मंदिराचा जीर्णोध्दार दि.१ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा होणार आहे.सुमेरसिंग भैसे, सुमेरचंद जैन, गोवर्धन रॉय, सत्यनारायण रॉय, रवींद्र भोयर यांच्या हस्ते मंदिराचे भूमी पूजन करून जिर्णोद्धार होणार आहे. सदर मंदिराच्या



जिर्णोद्धार सोहळ्यासाठी शहरातील व तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शासकीय कंत्राटदार राजीव मुंधडा, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी संचालक बंडू मुंधडा, सामाजिक कार्यकर्ते मनीष मुंधडा यांनी केले आहे.

# आपसातील भेदभाव टाळून समतेचा मंत्र जोपासा-

## हभप श्यामसुंदर महाराज

**अमरावती/का.प्र.**

भारताचे संविधान जगात सर्वश्रेष्ठ असून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात महामानव व संत साहित्याचे तत्वज्ञान अंतर्भुत केल्यामुळे समाजाने आपसातील मतभेद टाळून समतेचा मंत्र जोपासणे आज काळाची गरज असल्याचे प्रतिपादन हभप श्यामसुंदर महाराज सोन्नर जि. बिड यांनी केले.



अलुतेदार बालुतेदार भटक्या विमुक्त जनजाती व अल्पसंख्यांक जाती समन्वय समिती जि. अमरावती तर्फे आयोजित संत साहित्यातील संविधान मूल्य या विषयावर व्याख्याना करिता अमरावती येथील संत गाडगे महाराज सभागृहात आले होते.अध्यक्षीय मनोगता मधून इमासचे अध्यक्ष इंजि. वासुदेवराव चौधरी यांनी संत महात्मे यांची व्याख्यानमाला आयोजित करण्याचा उद्देश विशद करून आगामी निवडणुकीत पक्षापलीकडे जाऊन खऱ्या ओबीसीच्या पाठीमागे उभे राहण्याचे आवाहन केले. तर संस्थेचे महासचिव डॉ. श्रीराम कोल्हे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमाचा आढावा दिला. तसेच उत्कृष्ट संचालन केले. दीप प्रज्वलना नंतर हभप श्याम सुंदर महाराज यांचा शाल, पुष्पगुष्य देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.आभार अरुण लवणकर यांनी मानले.व्याख्यानमालेचा लाभ ओबीसी मधील ४४ संघटनेचे प्रतिनिधी सर्वश्री जानराव घटारे, दिलीप अकोटकर, डॉ. अशोक निचत, ॲड. प्रभाकर वानखडे, प्रकाश घाटे, गणेश भोरे, इंजि. सुभाष गोहत्रे, नाना आमले, ॲड. श्रीकांत नागारिकर, गजानन मुदगल, शरद पुसदकर, नाना रमतकर, गणेश मानकर, राजाभाऊ हाडोळे, सुरेश राऊत, ज्ञानेश्वर बनकर, रवींद्र वानखेडे, नरेंद्र पाटमासे, देवयानी कुर्वे, ज्योती सैरिसे, वंदना जामनेकर, विद्या सूर्यकर, शिल्पा मिलके, राखी मेहेंगे, माया नांदूरकर, ज्ञानेश्वर कुर्वे, काशिनाथ फुटाणे, नंदकिशोर नेतनवार, राजू डांगे, शेषराव शिरसाठ, शांताराम होले, सुधीर बोपुलकर, गजानन अंजनकर, डॉ. मोहोड, प्रेमा लव्हाडे, प्रकाश खंडारे, प्रा. सुरेश नांदूरकर, अरुण पोहनकर, सतीश गावंडे, सुरेंद्र सरोदे, मधुकर खांडेकर, विलास धामणकर, राजेंद्र भागवत, शेषराव शिरसाट, सुभाष मानेकर,दिलीप शेलूटकर, सुभाष हिवलेकर, वासुदेव वानखडे, उत्तमराव भैसने, निलेश नागपुरे,आदी मान्यवर उपस्थित होते.

# शनिवारपासून ३८ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

## वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

शहरात ३८ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन शनिवार १ नोव्हेंबरपासून संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आल्याची माहिती वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी श्रमिक पत्रकार भवनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त प्रशासकीय अधिकारी तथा मित्र या राज्य नियोजन संस्थेचे अध्यक्ष व मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी हे राहणार आहेत. या संमेलनाचे उद्घाटन राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. श्रीनिवास रेड्डी यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी मनपा आयुक्त सौम्या शर्मा उपस्थित राहणार आहेत, तसेच मंचावर माजी महापौर व वॅक्सचे सल्लागार मिलिंद चिमोटे उपस्थित राहणार आहेत, तसेच संमेलन स्थळ असलेल्या संत ज्ञानेश्वर



सांस्कृतिक भवन परिसराचे पद्मश्री मारुती चित्तमपल्ली पक्षीमित्र नगरी असे नामकरण करण्यात आले आहे, तर सभागृहाला सालीम अली सभागृह असे नामकरण करण्यात आले आहे.१ आणि २ नोव्हेंबरला आयोजित या संमेलनामध्ये साडेतीनशेपेक्षा जास्त पक्षीमित्र सहभागी होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. पत्रकार परिषदेला वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेचे अध्यक्ष डॉ. अंजली देशमुख, डॉ. जयंत वडतकर, डॉ.गजानन वाघ, डॉ. श्रीकांत वरेकर,किरण मोरे, मनीष ढाकूलकर,ॲड. राजमेहर निशाने उपस्थित होते.

# कॉटन मार्केट परिसरात आयुक्तांची पाहणी

## फुलबाजार स्थलांतरित करण्याचे निर्देश

**अमरावती/का.प्र.**

येथील बाजार समितीमधील फुलबाजार कॉटन मार्केटच्या रस्त्यावर भरत असल्याने त्या परिसरात वाहतुकीसह स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हा बाजार भरवण्यासाठी बाजारसमितीत जागा देऊन त्यांना तेथे स्थानांतरीत करावे व परिसरातील स्वच्छतेसाठी विशेष लक्ष देण्याचे निर्देश मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी दिले आहेत.

मनपा आयुक्तांनी जुना कॉटन मार्केट परिसराची पाहणी केली. या पाहणीदरम्यान आयुक्तांनी परिसरातील फुलविक्रेत्यांशी संवाद साधला व त्यांच्या विक्रीच्या ठिकाणांची पाहणी केली.आयुक्तांनी कृषी उत्पन्न बाजार समितीला सूचना दिल्या की, कॉटन मार्केट परिसरातील फुलवाल्यांच्या विक्रीसाठी योग्य व नियोजित जागा निश्चित करून त्यांना तिथे स्थलांतरित करावे, तसेच परिसरातील स्वच्छतेसाठी विशेष लक्ष देऊन येथून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी. सदर कृषी उत्पन्न बाजारसमितीला भेट देवून आयुक्तांनी समितीच्या सदस्यांना सूचना दिल्या की, या ठिकाणाहून निघणारा कचऱ्यापासून बायोगॅस, खत निर्मिती करणे शक्य आहे. याबाबतीत महापालिका आपल्याला सहकार्य करेल, कृषी उत्पन्न बाजारसमितीत कचऱ्यांचे योग्य नियोजन करावे.परिसरातील फुलवाल्यांना हटविण्याची कार्यवाही तातडीने करण्याचे आदेश अतिक्रमण विभागाला दिले.या पाहणीदरम्यान वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सहायक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहायक आयुक्त भूषण अतिक्रमण पुसतकर,रघटाटे, विभागाचे सहायक आयुक्त अविनाश उपअभियंता प्रमोद इंगोले, दिनेश हंबर्डे, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक प्रशांत गावनेर, धनिराम कलोसे, कृषी उत्पन्न बाजारसमितीचे सदस्य व प्रतिनिधी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# श्री गजानन महाराज मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळसरोहण सोहळा



**बेलोर/वार्ताहर**

श्री संत गजानन महाराज मंदिर, भानगाव बेलोरा येथे श्रींच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळसरोहण सोहळ्याचा पवित्र व ऐतिहासिक उत्सव अत्यंत भक्तिभाव, अध्यात्मिकता आणि श्रद्धेच्या वातावरणात झाला.

भाविक भक्तांनी ओवाळणी, पुष्पार्चन आणि सेवा कार्यातून आपली असीम भक्ती व्यक्त केली. पौरोहित्याची जबाबदारी अजय महाराज जोशी व संच (श्री अंबादेवी संस्थान, अमरावती) यांनी अत्यंत विधिवत, शास्त्रानुसार आणि पारंपरिक पद्धतीने पार पाडली. प्रमुख उपस्थिती निलेश भाऊ शेंडे व परिवार, अमोलभाऊ ढोले व परिवार, श्रीधरराव राऊत व परिवार तसेच संयुक्त ठाकरे परिवार यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा व कळसरोहण कार्यक्रम झाला. या प्रसंगी ह. भ. प. हरिदास महाराज भोयर, ह. भ. प. ब्रम्हानंद गिरी महाराज आणि ह. भ. प. रामेश्वर महाराज इंगळे हे आपल्या संचासह उपस्थित राहून भजन, कीर्तन आणि नामस्मरणाने कार्यक्रम अधिक भक्तिरसपूर्ण केला. तसेच सात दिवस अखंड ज्ञानेश्वरी पारायण सेवा देणारे ह. भ. प. रमेश महाराज अवारे व ह. भ. प. दुर्गाश्री ताई ब्रम्हानंद गिरी (गोस्वामी) यांच्या उपस्थितीने सोहळ्याला आध्यात्मिक पूर्णता आणि संतसाहित्याच्या चिंतनाची गोडी प्राप्त झाली. भक्तगणांनी प्रसादाच्या माध्यमातून श्रींच्या कृपेचा प्रसाद घेतला.

४०० किलो पुरणाच्या पोळीचा महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता, ज्याचा लाभ सुमारे २००० भाविकांनी भक्तिभावाने घेतला. महाप्रसादाच्या आयोजनात सावता गणेश मंडळ आणि बाल युवक गणेश मंडळ या मंडळांच्या कार्यकर्त्यांनी श्रमदान, प्रसाद वितरण, स्वच्छता आणि व्यवस्थापनात अमूल्य योगदान दिले. या प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा प्रतिमा ठाकरे, सचिव अश्विनी ठाकरे, तसेच विश्वस्त योगिता गाडबैल, ज्योत्सर्ना खवले, श्रुतिर्का ठाकरे आणि प्रमोदीनी ठाकरे उपस्थित होत्या.संस्थेचे मार्गदर्शक विस्मय ठाकरे यांनी भाविकांना श्रींच्या कृपेने समाजात श्रद्धा, प्रेम आणि सेवाभाव वृद्धिंगत करण्याचे आवाहन केले.तसेच प्रसिद्धी प्रमुख माधुर्य ठाकरे यांनी सर्व माध्यमांद्वारे या सोहळ्याचे वृत्तांकन करत उपस्थित सर्व सेवेकरी, भाविक व दात्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# संक्षिप्त

## श्री संत आडकुजी महाराज पुण्यतिथी महोत्सव

**तिवसा-** श्री समर्थ आडकुजी महाराजांचा १०४ व्या पुण्यतिथी महोत्सवास श्रीक्षेत्र वरखेड येथे महासमाधीस महाभिषेक व तीर्थस्थापना करून प्रारंभ झाला. याप्रसंगी सुरज विनायकराव बोके यांच्या शुभहस्ते श्री संत सयाजी महाराज, संस्थानध्यक्ष अभिजीत बोके यांच्या प्रमुख उपस्थितीत तिर्थस्थापना, चरण पादुका पूजन व महासमाधी अभिषेकाने जय गुरुदेवाच्या गजरात धार्मिक व विधिवत प्रारंभ झाला. वरखेड येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृह व कार्यक्रमाचे ठिकाणी गुरुदेवाच्या अधिष्ठानाचे पूजन संजय मार्डीकर व मोनिका संजय मार्डीकर (वानखडे) संचालक दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी प्रसाद मार्डीकर,वैष्णवी चौधरी यांची उपस्थिती होती.यावेळी ह भ प गजानन महाराज यांनी सामुदायिक ध्यानाच्या महत्वावर चिंतन प्रस्तुत केले तर गावातून रामधून काढण्यात आली तर गौरव अरुणोदयराव बोके व सुमिरान संजय बोके यांचे कडून अन्नदान पार पडले. सायंकाळी सामुदायिक प्रार्थना व भाषण मुकुंद बा पुनसे यांनी करून राष्ट्रसंताच्या सामुदायिक प्रार्थना मधून सर्वधर्म समभाव या विचारांची महती स्पष्ट केली.



## स्व.रामचंद्रजी पोटे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**अमरावती/का.प्र.**

पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे संस्थापक व आधारस्तंभ स्व.रामचंद्रजी पोटे पाटील यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त संस्थेच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण विचारांचा, समाजासाठीच्या कार्याचा आणि शिक्षणावरील प्रेमाचा उल्लेख करताना संस्थेतील कर्मचारी भावूक झाले. स्व. रामचंद्रजी पोटे पाटील यांनी विदर्भातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे, अत्याधुनिक शिक्षण मिळावे या ध्येयाने आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या या कार्यामुळे आज हजारो विद्यार्थी उच्च पदावर असून आपल्या जीवनात प्रगती करत आहे. त्यांचे विचार, मूल्ये आणि कार्य हेच संस्थेच्या वाटचालीसाठी प्रेरणेचा दीप असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, प्राचार्य, उपप्राचार्य, डीन, सर्व शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी स्व. रामचंद्रजी पोटे पाटील यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले आणि त्यांच्या कार्याला पुढे नेण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.



## स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाच्या बैठकीचे आयोजन

**अमरावती-** स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ अमरावती शाखेच्या वतीने दि. १ नोव्हेंबर २०२५ ला स्थानिक शासकीय विश्राम भवन, कॅम्प अमरावती येथे जिल्यातील पत्रकारांची बैठक जिलाध्यक्ष संजय सरवटकर यांच्या अध्यक्षतेखाली तर स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे संस्थापक अध्यक्ष डी. एस. लोखंडे (पाटील) यांच्या मार्गदर्शनात आयोजित केली आहे. ही बैठक दुपारी एक वाजता सुरु होणार असून या बैठकीत पत्रकार संघाची भूमिका स्पष्ट करून जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष सर्वानुमते करणार आहेत. या बैठकीचे निमंत्रण जिल्ह्यातील असंख्य पत्रकार बांधवाना दिले असून ज्यांना या पत्रकार संघात सहभागी होण्याची इच्छा असेल अशा पत्रकारांनी बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पुष्पा डोंगरे यांचे निधन



**कुऱ्हा -** येथील वयोवृद्ध महिला सौ.पुष्पाबाई पुरूषोत्तमराव डोंगरे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, जावाई नातू, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व.पुष्पाबाई डोंगरे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरांवरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते यावेळी सामुहिक श्रध्दांजली वाहण्यात आली.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वाचनालयाने घेतला पुढाकार

## तहसीलदाराकडे ११ हजार रुपयांच्या धनादेश सुपूर्द



**तिवसा/वार्ताहर**

यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतातून गेलेल्या पुरांमुळे शेतकऱ्यांनी पिकविलेल्या पिकांची मोठी नासाडी झाली आहे,ही नासाडी भरून न निघणारी असून त्यासाठी मदतीचा एक हात म्हणून नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहणाऱ्या तिवसा येथील श्री राजर्षी शाहु महाराज सा. वाचनालयातर्फे पूरग्रस्त लोकांकरिता फुल ना फुलांची पाकळी' म्हणून ११ हजार रुपयांचा धनादेश हा तिवसा तहसीलदार मयुर कळसे यांच्या सुपूर्द करण्यात आला. एक सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या या कार्याने समाजासमोर आदर्श उभा राहिला आहे.धनादेश सुपूर्द करतेवेळी अनिल थुल, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, राजाभाऊ देशमूख,मधुकर पिंगळे,सुरज तंवर, सतीश नंदनवार, अंकुश देशमुख,प्रफुल बनसोड, आकाश बावरी, प्रकाश विजयकर व इतर पदाधिकारी उपस्थित होते तसेच या कार्याला सुनिल बहाद्दरपुरे, हरिष फरकाडे,रोशन राठी, अक्षय गडलिंग, स्वप्नील कुऱ्हेकर, दिपक धानोरकर,भूषण मुंदाणे, सुमित अनासाने, मुकुंद मोहोड,मंगल ठाकूर, राहुल धडांगे आदींनी मदत केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# स्मारक, संदर्भग्रंथाने रा. सू. गवईंच्या कार्याचा गौरव -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## दिवंगत नेते रा. सू. (दादासाहेब) गवई स्मारकाचे उद्घाटन







**अमरावती/प्रतिनिधीः-** रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे कार्य मार्गदर्शक ठरावे, तसेच त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी, यासाठी स्मारक आणि सर्वंकष वाटचालीचा दस्तावेज तयार करण्यासाठी संदर्भग्रंथ प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. या दोन्ही प्रकल्पातून त्यांच्या कार्याचा गौरव राज्य शासनाने केला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अमरावती येथे राज्य शासनाने उभारलेल्या दिवंगत नेते रा. सू. गवई यांच्या स्मारकाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज (दि.३०) करण्यात आले. सरन्यायाधिश न्यायमुर्ती भूषण गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.



यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अॅड. आशिष ☞(पान २ वर)

■सरन्यायाधीश न्यायमुर्ती गवई म्हणाले, रा. सू. गवई यांचे स्मारक पूर्ण होणे ही एक स्वप्नपूर्ती आहे. स्मारकाची पायाभरणी ते उद्घाटन ही कामे गतीने करण्यात आली आहे. या वास्तूचा लाभ नागरिकांना होणार आहे. विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल, हा दृष्टीकोन ठेवून स्मारक उभारण्यात आले आहे. स्मारकात जीवनपट दर्शविताना कल्पकता ठेवली आहे. त्यामुळे स्मारक हे सर्वांग सुंदर झाले आहे. समाजाने दिलेल्या आशिर्वादाने वाटचाल सुरू आहे. सर्वसामान्य घटकांचे प्रश्न सोडवून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

■उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलतांना म्हणाले, रा. सू. गवई यांचे व्यक्तिमत्व बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून घडले आहे. त्यांच्या अंगी विनयशिलता, नम्रता आणि शालिनता होती. त्यांना भेटल्यानंतर ऊर्जा जाणवायची. त्यांनी चळवळ जीवंत ठेवण्याचे काम केले. त्याचमुळे त्यांची तळागाळातील नागरिकांशी नाळ जुळली. सर्वसामान्यांच्या प्रश्नावर त्यांनी सभागृहात आवाज उठविलेला पाहिले आहे. दिक्षाभूमीसोबतच त्यांनी राज्यपाल म्हणून भूषविलेल्या राज्यातील तिर्थस्थळांचा विकास केला. तसेच शिक्षण पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल केला. सामाजिक न्यायाची योजना राबविण्यास सरकारला सूचना केल्यात. त्यामुळे त्यांचे स्मारक हे मानवतेच्या विचारांनी उभे राहिले असल्याचे ते म्हणाले.



## अभिनंदन बँकेच्या 'अभिनंदन हाईट्स' चे भव्य लोकार्पण

# सहकार चळवळीमुळे महाराष्ट्रात उद्योगधंद्यांची वाढ

### - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**अमरावती/प्रतिनिधीः-** सहकार चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रात उद्योगधंदे आणि समृद्धी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. नियम आणि कायद्यांचे पालन करत सहकार क्षेत्रात कार्य केल्यास समाजाची आर्थिक उन्नती साधता येते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि. यांच्या नव्या इमारती'अभिनंदन हाइट्स' च्या लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने ते आज सांस्कृतिक भवन येथे बोलत होते.

या प्रसंगी व्यासपीठावर आमदार सुलमा खोडके, आमदार रवि राणा, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतिलाल मुथा, बँकेचे संस्थापक हुकुमचंद डागा, बँक अध्यक्ष अॅड. विजय बोबरा, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सुदर्शन गांग, बांधकाम समिती सभापती नवीन चोरडिया, उपाध्यक्ष सुरेंद्र बर्डिया आणि संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी बँक भवनाचे फीत कापून लोकार्पण केले तसेच सांस्कृतिक भवनातील शिलालेखाचे अनावरण केले.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सहकार चळवळीमुळे महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही राज्यांनी उद्योग, व्यापार आणि ग्रामीण भागातील आर्थिक प्रगतीचे उत्तम उदाहरण निर्माण केले आहे. सामान्य लोकांचा आर्थिक स्तर वाढविण्यात सहकारितेचा मोठा वाटा आहे.

ते पुढे म्हणाले, 'सहकार क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात प्रथमच स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली. या मंत्रालयाद्वारे या क्षेत्रासाठी सर्वाधिक योजना आणि मदतकार्य राबविण्यात येत आहे. पूर्वी केवळ ५ ते ७ राज्यांत सहकार चळवळ सक्रिय होती, परंतु आता ती देशभर विस्तारत आहे.'

मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन बँकेच्या संचालक मंडळाचे अभिनंदन करत भविष्यातही ☞(पान २ वर)

# तहसिल कार्यालयात जप्त केलेल्या अवैध मिनी ट्रकला फुटले पाय


**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तहसिल कार्यालयाचा भोंगळ कारभार दिवसेंदिवस चव्हाट्यावर येत असून कार्यालयीन दप्तरांमध्ये हेरफेर व बनावट करून एवढ्यावरच मर्यादित राहिले नाही. तहसिल कार्यालयातून अवैद्यरित्या जप्त करण्यात आलेले वाहन परस्पर लंपास होत आहे.

जुलै महिन्यात तहसिल कार्यालय परिसरातून जप्त करण्यात आलेल्या अवैद्य रेतीचे ट्रॉली चोरट्यांनी लंपास केली होती. सदर घटनेला साधारण तीन ते चार महिने होत नाही तोच दि. २९ ऑगस्ट रोजी अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या मिनी ट्रकला नायब तहसिलदार व मंडळ अधिकारी यांनी थिलोरी तालुक्यातील शिरजदा येथिल पूर्णा नदीच्या पात्रातून अवैद्यरीत्या रितीचे उत्खनन करून त्याचे वाहतूक केल्याप्रकरणी एमएच ३०, बिडी ४७१७ या क्रमांकाचा मिनिट ट्रक जप्त केला होता. जप्त करून तो ट्रक तहसिल कार्यालयात जमा करण्यात आला होता. साधारणता दिड महिन्या नंतर सदरचा मिनी ट्रक लंपास करण्यात आला. सीसीटीव्ही कॅमेरे पुरेसे मनुष्यबळ व परिसराचे बंदिस्त दगडी बांधकाम असूनही तहसिल कार्यालयातून मिनी ट्रक लंपास झालाच कसा तसेच जनसामान्यांमध्ये संशयाचे वातावरण असून तहसिल कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांच्या संगणमता शिवाय सदरची कार्यवाही शक्य नसल्याचे☞(पान २ वर)

# दर्यापूर नगर परिषदेच्या मतदार याद्यांमध्ये गोंधळ, ४११ आक्षेप दाखल

**नागरिकांत संभ्रम व पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह**

## अहवाल प्राप्त झाल्यानंतर होणार अंतिम मतदार याद्या



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापर नगर परिषदच्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गोंधळ झाल्याचे उघड झाले असून, एकूण ४११ आक्षेप नगर पालिका प्रशासनाकडे दाखल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आता पर्यवेक्षक नेमणूक करून अंतिम चौकशीची प्रक्रिया सुरू केली आहे. पर्यवेक्षकांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मतदार याद्या अंतिम करण्यात येणार आहेत. नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीस वेग आला असून, नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या आरक्षणासह प्रभाग रचना निश्चित झाल्यानंतर आता मतदार याद्या हा पुढील टप्पा आहे. ८ ऑक्टोबर रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. मात्र, अनेक मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात गेल्याने किंवा काही प्रभागातील मतदार इतरत्र हलवले गेल्याने गोंधळ निर्माण झाला. दरम्यान, नागरिकांमध्ये मतदार याद्यांच्या पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, चुकीच्या प्रभागात नाव गेल्यामुळे भिती व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी मोठ्या संख्येने आक्षेप नोंदवले असून, प्रशासनाकडून १२ प्रभागांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे. प्रत्येक पथकात दोन कर्मचारी आणि एक बीएलओ यांची नियुक्ती करण्यात आली असून,☞(पान २ वर)

# नांदगाव केंद्रावर शासकीय हमी दराने नाफेडतर्फे सोयाबीन खरेदी नोंदणी सुरू



**नांदगाव खंडेश्वर / प्रतिनिधीः-** शासकीय हमीदराने नाफेड तर्फे हंगाम २५ /२६ करिता पुढील आदेशा पर्यंत नांदगाव खंडेश्वर केंद्रावर स्थानिक खरेदी विक्री संस्थेकडे सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया आज दिनांक ३१ ऑक्टोंबर पासून कार्यालयीन वेळात सुरू होत आहे. तरी शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन नाफेडला विक्रीकरिता खालील कागदपत्रासह खरेदी विक्री संस्था नांदगाव खंडेश्वर या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करून आपला अर्ज ऑनलाईन करून घ्यावा. अर्जासोबत नोंदणी करिता सातबारा उतारा तलाठ्याच्या सही शिक्क्यासह बँक पासबुकची झेरॉक्स, आधार कार्डची झेरॉक्स, फार्मर आयडा☞(पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करा



## किसान सभेची तहसिल कार्यालयावर धडक

**नांदगांव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** नागपूर येथे ३ दिवसापासून सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या महाएल्गार आंदोलनातील मागण्या मान्य करा व निवडणूकी दरम्यान शेतकऱ्यांना दिलेले कर्जमाफीचे आश्वासन त्वरीत पूर्ण करा या मागण्या करिता महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी आज नांदगांव तहसिल कार्यालयावर धडक दिली .

सततच्या पावसाने शेतकऱ्यांची अजूनही पाठ सोडली नाही . सोयाबिन / कापसाच्या पिकात शेतकऱ्याचा उत्पादन खर्चही निघणे दुरापास्त झाले आहे . दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात ओला दुष्काळ अनुदान देण्याची मोठा गाजावाजा करून शासनाने केलेली घोषणा हवेत विरली . अजूनही शेतकऱ्यांना एक दमडी ही मिळाली नाही . गेल्या तीन दिवसापासून☞(पान २ वर)

# सुजात आंबेडकर यांच्या संदर्भात आक्षेपार्ह पोस्ट


**चांदूर रेल्वे शहरातील घटना**

## वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते धडकले पोलिस स्टेशनवर



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात प्रकाश आंबेडकर यांच्यावर चांदूर रेल्वे शहरातील एका कार्यकर्त्याने फेसबुकवर खालच्या भाषेत आक्षेपार्ह पोस्ट टाकली.हे वृत्त समजताच वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते २९ ऑक्टोबर रोजी दुपारी चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनवर धडकले.त्यांची तक्रार चांदूर रेल्वे पोलिसांनी घेतली नाही.त्यामुळे त्यांनी तिथेच ठिय्या आंदोलन केले आणि पोलिस अधीक्षक यांच्याशी फोनवर बोलल्यानंतर आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.☞(पान २ वर)

# नुकसान भरपाईसाठी जिल्ह्याला १११७ कोटींचा मदतनिधी



**अमरावती :** सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील झालेल्या शेतीच्या नुकसानीपोटी ५७० कोटी आणि शासनाने मदतीचा निकष दोन हेक्टरवरून तीन हेक्टर मर्यादा वाढ केल्यामुळे ५४७ कोटी रूपयांचा निधी देण्याचा निर्णय आज घेण्यात आला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या पाठपुराव्यामुळे राज्यात केवळ अमरावती जिल्ह्याला हा निधी प्राप्त झाला आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दोन स्वतंत्र शासकीय निर्णय जाहीर झाले आहे. अतिवृष्टी, पूर आणि सततच्या पावसामुळे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी हा निधी वितरित☞(पान २ वर)

# किरीट सोमय्यांची महानगरपालिकेत आयुक्तांशी अर्धा तास चर्चा

## बोगस जन्म व मृत्यू दाखले मृत्यू दाखले प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** बोगस जन्म व मृत्यू दाखले मृत्यू दाखले प्रकरणात महानगरपालिकेच्या वतीने कोतवाली पोलीस ठाण्यात ५०५ लोकांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहे. बुधवारी सायंकाळी ही तक्रार दाखल करण्यात आली. त्यानंतर आज गुरुवार ३० ऑक्टोबर रोजी पुन्हा भाजप नेते किरीट सोमय्या अमरावतीत दाखल झाले आणि महानगरपालिकेमध्ये पोहोचले. त्यांनी मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्याशी अर्धा तास बंदद्वार चर्चा केली. मनपा आयुक्तांनी त्यांना ५०५ लोकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची ☞(पान २ वर)

# पोलीस हेड कॉन्स्टेबलला लाच घेताना अटक

## भातकुली ठाण्यात एसीबीचा ट्रॅप



**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत हेड कॉन्स्टेबल अब्दुल रहीम अब्दुल कदीर (५४,असोरिया पेट्रोल पंप, जाकिर कॉलनी ) यांना २० हजार रुपयांची लाच घेताना एसीबीच्यावतीने अटक करण्यात आली. माहिती नुसार तक्रारदारच्या भावाविरुद्ध भातकुली ठाण्यात कलम १०९,२२९(३),३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान तक्रारदाराच्या भावाला अटक करण्यात आली होती. न्यायालयातून अटक पूर्व जामीन घेतला आहे.☞(पान २ वर)